राजा रघुनाथराव

अथवा

आठवा हेन्री.

RAJA RAGHUNATHRAV

OR

SHAKESPEARE'S HENRY VIII

Translated into Marathi

BY

H. B. ATRE, B. A.

Marathi Translator, H. H. the Nizam's Legislative Department and Chairman of Examiners in Marathi, Madras University.

1904.

राजा रघुनाथराव

अथवा

आठवा हेन्‌री

या

महाकवि शेक्सपीयरनें रचलेल्या इंग्रजी
नाटकाचें मराठी भाषांतर.

हें

हणमंत बापूराव अत्रे, बी. ए.

मराठी ट्रान्स्लेटर, इलाके लेजिस्लेटिव्ह कौंसिल, निजामसरकार
व मद्रास युनिव्हर्सिटीचे मराठी भाषेचे मुख्य परीक्षक

यांनीं केलें.

हें पुस्तक

पुणें येथें, रावजी श्रीधर गोंधळेकर यांचे "जगद्धितेच्छु" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

OPINIONS.

Dear Mr. Atre,

I have carefully gone through some passages in your Marathi Translation of Shakespear's Henry VIII. I particularly noted the speeches of Buckingham, Wolsey and Catherine. You have done well in rendering rather a free translation to suit the idiom of the Marathi language. Henry's marriage with his brother's widow, and the subsequent divorce on the score of illegality, are ideas foreign to the Marathi literature. I believe this must have induced you to retain the original names of the actors. The language is grammatically correct and idiomatic. The style is easy. ***

On the whole I feel sure that the book will be a valuable addition to the Marathi literature.

Dated 20 th.
January 1904
Hyderabad-Deccan.

D. K. Hardikar, B. A.
Professor of Màthematics,
Nizam College.

Chadarghat Residency.
31-1-04.

Dear Mr. Atre,

I have read some of the passages of your translation of Shakespear's king Henry VIII and I found them most interesting. I took care to compare the translation closely with the original text and I was highly pleased to find that you have succeeded in clearly expressing the original ideas in happily selected Marathi words. You have been able to adopt a purely

vernacular style and all that remains to be done is to find out suitable oriental names to replace the ones in the English drama. The book is obviously worth publishing and deserves support.

K. S. Jathar,
District Magistrate and Superintendent,
Residency Bazaars, Hyderabad-Deccan.

(Extract from letter No. 236 Dated 5th April 1904 from G. R. Kale, Esq. B. A. Inspector of Schools, Gulbargah Soobah to the Director of Public Instruction, H. H. the Nizam's Dominions, Hyderabad-Deccan.)

*** I have the honour to inform you that I have read through the greater portion of the book and on the whole I find it to be an excellent adaptation of the original. Mr. Atre must have had considerable difficulty in translating certain passages in the original but I am glad to say that in this task which often severely taxes the translator's powers and resources, Mr. Atre has generally succeeded well. The Queen's touching appeal to the King in the Second Act is very effectively rendered into Marathi bnt I think this and other similar passages are capable of further improvement in point of conciseness. A few touches in other places are also necessary to make the book pleasant reading to one who does not know English. *** With the few changes suggested herein the translation would be an excellent one and I would strongly recommend it for the patronage of Government. ***

प्रस्तावना.

शेक्सपीअरनें इंग्रजी भाषेंत पुष्कळ नाटकें लिहिलीं आहेत. त्याचीं नाट्यकलाप्राविण्याबद्दल इतकी कीर्ति झाली आहे कीं त्याच्या तोडीचा कवि व नाटककार आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंही कदाचित् लवकर होईल असाही रंग दिसत नाहीं. त्याच्या बऱ्याचशा नाटकांचीं भाषांतरें व रूपांतरें महाराष्ट्र वाचकांच्या हातीं पडून त्याच्या कृतीची थोरवी, मराठी भाषा जाणणाऱ्या रसिक व मार्मिक वाचकांस कळून चुकली आहे. " आठवा हेन्री " हें नाटकही त्याच्या नाटकांपैकीं एक असून त्याचें भाषांतर " राजा रघुनाथराव " या नांवानें मराठी वाचकांच्या करमणुकीकरितां प्रसिद्ध केलें आहे.

हें नाटक प्रथमतः सन १६२३ सालीं " आठव्या हेन्रीचा जीवनवृत्तान्त " या नांवानें प्रसिद्ध झालें. हें नाटक कोणत्या सालीं लिहिलें गेलें याविषयीं अगदीं निश्चयात्मक मत जरी देतां येत नाहीं तरी नाईट, व्हाईट, आणि हडसन या सर्वांचें मत असें आहे कीं, हा शेक्सपीअरचा शेवटचा ग्रंथ होय, व हा सन १६१२ अथवा १६१३ मध्यें स्ट्राटफर्ड येथें लिहिला गेला. " ग्लोब " नांवाच्या नाटकगृहास १६१३ सालीं जून महिन्याच्या २९ व्या तारखेस आग लागून तें जळून फस्त झालें. त्यावेळीं (६ जुलै १६१३) सर हेन्री वाटसननें आपल्या पुतण्यास त्या प्रसंगाचें वर्णन लिहून पाठविलें. त्यावरून असें कळतें कीं, हेन्री राजा (राजा रघुनाथराव) आपला वेष बदलून वूलसेच्या (गुंडाचार्यांच्या) घरीं मेजवानीस गेला असतां त्यावेळीं जे बंदुकीचे आवाज केले, त्यांची ठिणगी त्या नाटकगृहाच्या छतास लागून तें पेटलें, पण लोकांचीं मनें खेळांत इतकीं गढून गेलीं होतीं कीं, त्याकडे कोणाचेंही लक्ष्य गेलें नाहीं, व तें नाटकगृह अग्नि-

नारायणानें तेव्हांच भस्म करून टाकलें. या पत्रावरून व त्यावेळीं लिहिलेलीं आणखी दुसरीं पत्रें सांपडतात त्यांवरून तें नाटकगृह याच नाटकाचा प्रयोग चालला असतां जळून फस्त झालें हें समजतें. याच नाटकाचें पहिलें नांव " सर्व खरी गोष्ट " हें होतें, व याविषयींचा दाखला, त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत व इतर ठिकाणीं जागोजाग दृष्टीस पडतो.

या खेळाची भाषा व रचना हीं अशा प्रकारचीं आहेत कीं त्यावरूनही ही कवीच्या शेवटच्या कृतींपैकीं कृति असावी असें दृष्टोत्पत्तीस येतें. या नाटकावर ज्या ज्या मार्मिक विद्वानांनीं टीका केली आहे त्यांपैकीं बहुतेकांचें मत असें आहे कीं या नाटकाचे कांहीं भाग, त्यावेळीं प्रसिद्ध असलेल्या फ्लेचरनें लिहिले असावेत. जर्मन मार्मिकांचे अभिप्रायही अशाच आशयाचे आहेत. त्यांच्यापैकीं मुख्य जो जर्व्हीयनस् याचें असें मत आहे कीं शेक्सपीअरनें या खेळाची आंखणी करून दिली व फ्लेचरनें तें पूर्ण केलें. त्या वेळच्या कवींत शेक्सपीअरसारखा मुख्य भूमिकेच्या मनोवृत्तींची बाह्यरेषा दाखविणारा दुसरा कवि नव्हता. तसेंच, या नाटकांत संविधानकाचें ऐक्य नसल्यामुळें, या प्रख्यात नाट्याचार्यानें आखलेल्या बाह्यरेषा त्याच्याहून कमी योग्यतेच्या कारागिरानें भरून काढल्या असाव्या असें स्पष्ट नजरेस येतें. या नाटकाच्या रचनेसंबंधानें असा मतभेद आहे तरी याची मांडणी शेक्सपीअरनेंच केली असल्यानें व या त्याच्या शेवटच्या कृतींत त्याची परिपक्व बुद्धि व विचार हीं ठिकठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत असल्यानें त्यास जागोजागीं रमणीयता आली आहे.

या नाटकांतील मुख्य पात्रें ह्मटलीं म्हणजे राजा, राणी पद्मावती व गुंडाचार्य हे होत, व हे ऐतिहासिक पुरुष असल्याकारणानें यांच्यासंबंधाची थोडी माहिती देणें फार अगत्याचें आहे. सातवा हेन्री हा इंग्लंडचा मोठा बलाढ्य राजा होऊन गेला. त्याप्रमाणेंच काथराईन (राणी पद्मावती) ही आरागानच्या राजाची चवथी मुलगी होती. या दोन्ही राजांना, त्या वेळच्या राजकारस्थानासंबंधानें एकमेकांचा स्नेह फार इष्ट होता. याच कारणावरून काथराईन १७

वर्षांची व सातव्या हेन्रीचा मुलगा आर्थर १५ वर्षांचा असतांनाच त्यांचा विवाह झाला. विवाह झाल्यावर ५ महिन्यांनीं आर्थर मरण पावला, तरी ते दोघेही राजे पराक्रमी व महत्वाकांक्षी होते व त्यांनीं हा संबंध फक्त एकमेकांच्या फायद्याकरितां केला होता झणून आर्थ-रच्या मरणानंतर त्यांनीं, त्या वेळच्या पोपचें (ख्रिस्ती लोकांच्या मुख्य धर्मगुरूचें) व इतर धर्माधिकाऱ्यांचीं मतें गोळा करून, काथ-राईनचें (पद्मावतीचें) आर्थरच्या धाकट्या भावाशीं झणजे आठव्या हेन्रीशीं (राजा रघुनाथरावाशीं) लग्न लावून देणें सशास्त्र आहे असें ठरवून त्या उभयतांचा विवाह करून टाकला. ज्या वेळीं हा पुनर्विवाह झाला त्या वेळीं काथराइनचें वय २४ वर्षांचें व आठव्या हेन्रीचें १८ वर्षांचें होतें. इंग्रज लोकांत मुलांनीं व मुलींनीं वयांत आल्यावर आपआपले जोडीदार निवडून काढण्याची चाल असूनही या राजघराण्यांतील आईबापांनीं हा विवाह, एकमेकांची आवड निवड लक्षांत न आणतां मुलगी वयानें मोठी व मुलगा लहान अ-सतां, मनुष्यस्वभावास अनुसरून केवळ आपआपल्या महत्वाकांक्षे-च्या तृप्त्यर्थ केला हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

राणी पद्मावती मोठी सद्गुणी व धर्मशील होती तरी हट्टी व मानी होती. तिचें भाषण व वागणूक मोठी साधी होती व राजानें तिच्या-शीं इतकें क्रूरतेचें वर्तन केल्यावरही तिनें आपलें दुःख मोठ्या धैर्यानें व निमुटपणानें सहन केलें हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. बापूसा-हेब जहागीरदारासंबंधानें तिनें केलेली राजाची विनवणी, गुंडाचार्या-च्या मसलतीनें लढाईच्या खर्चाबद्दल लोकांवर बसविलेल्या कराच्या बोजासंबंधानें तिनें सदय अंतःकरणानें केलेली राजाची प्रार्थना, व बापूसाहेबाच्या कारभाऱ्याची तिनें केलेली कानउघाडणी यांवरून तिचा उदारपणा, दयाळूपणा, व सत्यप्रियता हीं व्यक्त होतात. दोन आचार्य तिला भेटावयास आले असतां त्यांच्याशीं जें तिनें भाषण केलें त्यावरून तिचें पातिव्रत्य, मानी स्वभाव, व थोरपणा पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येतो, व राजकुलांत जन्मलेल्या व चोंहीकडून दुःखानें

असलेल्या या राणीचें शुद्ध वर्तन व पतिप्रेम पाहून मनास मोठा चटका लागतो. या राणीचें लग्न सशास्त्र झालें कीं नाहीं या संबंधानें झालेल्या चौकशीस ऐतिहासिक आधार आहे व बहुतेक भाषणें मळाप्रमाणेंच शब्दशः उतरलीं आहेत, परंतु कवीच्या जादूगिरीनें त्यांतील शुष्कपणा जाऊन तो प्रवेश मोठा हृदयंगम झाला आहे. चौकशी करण्याकरितां भरविलेल्या दरबारांतून ती जात असतांना गिरजेनें तिला बोलाविलें त्या वेळचें तिचें भाषण, व ती गेल्यावर राजानें तिच्या संबंधानें काढलेले उद्गार किती चटकदार आहेत ! पद्मावतीचा शेवट ज्या प्रवेशांत वर्णिला आहे तो वाचून डाक्टर जान्सनूसारखा मार्मिक विद्वान् अगदीं विव्हळ होऊन गेला यावरून तो किती शोकरसपूर्ण आहे याची साक्ष पटत आहे.

राजाची विषयलोलुपता व आपल्या वासनेच्या तृप्त्यर्थ धर्माच्या नांवावर लग्नाच्या अशास्त्रतेची सबब काढणें, व अशा शुद्धान्तःकरणाच्या व सुशील स्त्रियेशीं क्रूरतेनें वागून केवळ पद्मिनीच्या इच्छेनें तिचा त्याग करणें, या गोष्टी कोणत्याही देशांतील विषयलोलुप राजाच्या अंगीं दृष्टीस पडण्यासारख्या आहेत. तसेंच, विद्यासंपन्न व धार्मिक वृत्तीचा माणुसही आपल्या महत्त्वाकांक्षेच्या तृप्त्यर्थ कसकशा क्लृप्तींची योजना करतो हें गुंडाचार्यांच्या भूमिकेवरून लक्षांत येण्यासारखें आहे. याशिवाय बापूसाहेबाचा मानी स्वभाव, पद्मिनीचा गोड स्वभाव, कोंवळें अन्तःकरण, आपल्या यजमानिणी संबंधानें तिनें काढलेले उद्गार, सरदारांच्या आंगीं खिळून गेलेला हांजी हांजीपणा या गोष्टीही मोठ्या खुबीदार रीतीनें कवीनें जागोजाग वर्णिल्या आहेत. सारांश, आपल्या इकडच्या पुष्कळशा गोष्टींचें प्रतिबिंब या नाटकांत अगदीं हुबेहुब वठलें आहे आणि ह्मणूनच हा ग्रंथ वाचून अथवा या नाटकाचा प्रयोग पाहून महाराष्ट्र वाचकांची करमणूक होईल असें समजून त्यांस हें भाषांतर अर्पण केलें आहे.

हें शेक्सपीअरच्या नाटकाचें भाषांतर आहे असें ह्मटल्यावरून तें शब्दशः भाषांतर आहे असा समज होण्याचा संभव आहे तो न

व्हावा ह्मणून एक दोन गोष्टींसंबंधानें खुलासा करणें जरूर आहे. पहिली गोष्ट इंग्रजी चालीरीती संबंधानें. ज्या ज्या गोष्टी अथवा रीतीभाती इंग्रज लोकांत व आमच्यांत सर्वसाधारण आहेत त्यासंबंधानें वादविवाद नाहींच, पण ज्या रीती भिन्न आहेत त्या तशाच मराठींत उतराव्या किंवा त्यांस मराठी पेहेराव द्यावा याबद्दल मतभेद आहे. या नाटकांत " स्त्रीपुरुषांचें नृत्य, " "भावाच्या मरणानंतर त्याच्या बायकोशीं लग्न, " "मेजवानींत स्त्रीपुरुषांनीं मद्य प्राशन करणें " व इतर बारीक सारीक इंग्रजी रिवाजाच्या गोष्टी बहुतेक जशाच्या तशाच ठेवल्या आहेत. याचें पहिलें कारण हें कीं त्या गोष्टी निव्वळ मराठी वाचकांस समजाव्या, व दुसरें हें कीं त्या बदलणें ह्मणजे मूळ नाटकाचें हृद्य नाहींसें करणें आहे, आणि ह्मणूनच त्या बदलल्या नाहींत. तशांत, आमच्या समाजाची स्थितीही या शंभर वर्षांत अशी बदलत आली आहे कीं आतां सर्व जातीच्या लोकांनीं सरबतें वगैरे पेयें बहुतेक उघड रीतीनें पिणें, शास्त्राधार काढून पुनर्विवाह करणें, निरनिराळ्या धर्मपंथांची उत्पत्ति व प्रसार, टेनिस क्रिकेटसारख्या खेळांचा उपक्रम व तो खेळ खेळतांना इंग्रजी पोषाखाचा उपयोग, साधारणतः इंग्रजी पोषाखाचा पुरुषापासून तों थेट बायकांपर्यंत प्रवेश, सोशल ग्यादरिंगसारख्या सर्व जातींच्या लोकांचीं आहारविहारयुक्त संमेलनें, इत्यादि प्रकार क्षणोक्षणीं दृष्टोत्पत्तीस येतात तेव्हां या पुस्तकांतील इंग्रजी रिवाजाच्या गोष्टी महाराष्ट्र वाचकांसही केवळ असह्य होतील किंवा अगदीं परकीय वाटतील अथवा प्रयोग पहाणाऱ्याच्या दृष्टीला अप्रिय वाटतील असें मला वाटत नाहीं. दुसरी गोष्ट पात्रांचीं नांवें बदलण्यासंबंधानें. इंग्रजी चालीरीती बदलल्या तर पात्रांचींही नांवें बदलावीं, न बदलल्या तर तशींच ठेवावी अशा अर्थाच्या सूचना माझ्या कांहीं विद्वान् मित्रांनीं केल्या व त्यांत पुष्कळ तथ्यही आहे, पण दुसऱ्या कांहीं सद्गृहस्थांनीं नांवें बदलावीं ह्मणून आग्रहपूर्वक सूचना केल्या, व दोन्ही सूचनांचा विचार करतां, नाटकाचा प्रयोग करतां यावा, व पात्रांचीं अवघड इंग्रजी नांवें कायम ठेवल्यानें वाचकांचा व प्रेक्षकांचा पदोपदीं रसभंग होईल तो न व्हा-

वा ह्मणून नांवें बदलणें हेंच अधिक चांगलें असें मला वाटलें. असो, ही कृति निर्दोष आहे अथवा सदोष आहे हें सर्वथा वाचकांच्या मतांवर अवलंबून आहे व " भिन्नरुचिर्हि लोकः " या न्यायानें एकाचें मत दुसऱ्यास सर्वांशीं ग्राह्य होईलच असें नाहीं तथापि या भाषांतरापासून यत्किंचित्‌ही उपयोग झाला तरी मी आपले श्रम सफल झाले असें समजेन.

दक्षिण हैदराबाद.
२३ मे १९०४.

हणमंत बापूराव अत्रे.

पात्रें.

पात्रांचीं मूळचीं नांवें. मराठी नांव.

राजा, आठवा हेन्री ......राजा रघुनाथराव.

कार्डिनल वूलसे ....गुंडाचार्य (मुख्य धर्माधिकारी)

कार्डिनल कांपिअस ......श्रीनिवासाचार्य (मुख्य पीठाचा प्रतिनिधि.)

क्याप्युशिअस पांचव्या चार्लसचा वकील } ......काशिनाथपंत (वकील.)

क्रान्मर, कांटरबरीचा आर्च बिशप } ...काशिराय (धर्माधिकारी.)

डयूक आफ् नारफाक ......नानासाहेब (सरदार)

,, बकिंगहॅम ...बापूसाहेब (,,)

,, सफाक् ......तात्यासाहेब (,,)

अर्ल आफ् सरे ....सखारामपंत (,,)

लार्ड चेंबरलेन ....रावसाहेब (,,)

लार्ड चांसेलर ....कोषाध्यक्ष.

गार्डिनर, उंईचेस्टरचा बिशप गोवर्धनाचार्य (एक आचार्य)

लिंकनचा बिशप ....एक सरदार.

लार्ड अँबरग्याव्हनी.........आण्णासाहेब. (सरदार)

लार्ड सँडस् ....मोहनराय (,,)

सर हेनरी गिल्डफर्ड ......राय गोविंदराय. (,,)

सर टामस् लव्हेल ....सर वासुदेवराव. (,,)

सर अंटनी डेनी............सर दिनकरराव. (,,)

सर निकोलस व्हाक्स ...एक सरदार.

वूलसेचा सेक्रेटरी ....गुंडाचार्यांचा चिटणीस.

क्रामवेल ………………त्रिविक्रमाचार्य. (एक आचार्य)
ग्रिफिथ…………………गिरजा (राणीची दासी)
डाक्टर बट्स्……………डाक्टर बळवंतराव.
काथराईन राणी…………पद्मावती (राणी)
आन बुलेन ……………पद्मिनी (,,)
पेशन्स …………………शांति (राणीची दासी)

प्रार्थना.

महाजनहो, आज हास्यरस उत्पन्न करावा या हेतूनें मी येथें आलों नाहीं; तर उद्वेग उत्पन्न करणाऱ्या, अत्यंत महत्त्वाच्या व शोकरसपूर्ण अशा गोष्टी—कीं ज्या पहातां पहातां तुमच्या डोळयांतन अश्रुचे पाटचे पाट वाहतील–तुमच्यापुढें आज आह्मी मांडणार आहोंत. जे दयार्द्र अंतःकरणाचे असतील ते, त्यास योग्य वाटल्यास अश्रुपातच करतील, कारण प्रकार अश्रुपात करण्यासारखाच आहे. ज्या सत्यप्रिय पुरुषांनीं आपले पैसे कांहीं खऱ्या गोष्टींचें ज्ञान व्हावें म्हणून दिले असतील त्यांचीही निराशा होणार नाहीं. जे केंवळ तास दोन तास मजा पहावी, व एक दोन प्रवेश पहावे एवढ्याच उद्देशानें आले असतील, ते जर स्वस्थपणें बसतील तर त्यांचाही हेतू सफल होईल. कारण हा खेळ तशा प्रकारचा आहे. परंतु जे केवळ विदूषकाचा चित्रविचित्र पेहेराव पहावा, किंवा लढाईच्या ललकाऱ्या ऐकाव्या, किंवा प्रहसनांतील प्रकार दृष्टिगोचर व्हावा एवढाच हेतू मनांत धरून आले असतील त्यांची मात्र निराशा होईल; कारण सभ्यगृहस्थहो, जो सत्यतेचा प्रकार तुह्मांस दाखवावयाचा आहे, त्याची बरोबरी विदूषकाच्या अचरट वर्तनाशीं अथवा लढाईच्या धांगडधिंग्याशीं केल्यास, आमच्या मेंदूस व्यर्थ शीण होऊन, जी सत्य हकीकत तुमच्यापुढें मांडण्याचा आह्मी विचार करतों, तिच्यांतील सत्याचा अपलाप होऊन तुमचा आमचा बेबनाव होईल; याकरितां सद्गृहस्थहो, ज्याअर्थी हा प्रयोग प्रथमतःच तुमच्या दृष्टीस पडत आहे त्याअर्थी क्षणभर, सद्गुणी पुरुषांच्या सन्मानार्थ आमच्या मर्जीप्रमाणें उदासीन व्हा. ज्या उदार पुरुषांचें चरित्र तुह्मांस नाटक-

रुपानें करुन दाखवितों, ते तुमच्यापुढें जीवंत आहेत असें समजा; व क्षणभर असेंही मनांत आणा कीं ते मोठ्या कुळांतले पुरुष आहेत, व त्यांच्या भोंवतीं हजारों मित्र गोळा झाले आहेत. लागलींच या थोर पुरुषांचा विपत्काळही पहा. आणि इतकें पाहूनही जर तुमच्या अंतःकरणांत आनंदाचे कल्लोळ उठतील तर असें ह्मणायास हरकत नाहीं कीं मनुष्य आपल्या लग्नप्रसंगींही रडूं शकतो !

———

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

विजयपुरी. राजवाड्यांतील एक दिवाणखाना (एक्या बाजूनें नानासाहेब, व दुसऱ्या बाजूनें बापूसाहेब व आण्णासाहेब प्रवेश करतात.)

बापू—नमस्कार! नमस्कार! बरी गांठ पडली. तुमची आमची शेवटची मुलाकत झाल्यादिवसापासून विदर्भ देशांतील काय हालहवाल?

नाना—ठीक आहे! तेथें पाहिलेल्या वस्तूंचें अगदीं पदोपदीं आश्चर्य वाटत आहे.

बापू—ज्यावेळीं त्या दैदीप्यमान व भाग्यशाली सूर्यांच्या 'अंधेरी'च्या मैदानांत भेटी झाल्या, त्यावेळीं हिंवतापानें मी अगदीं बिछान्यास खिळून राहिलों होतों.

नाना—आमच्या आणि त्यांच्या सरहद्दीच्या दरम्यान त्यांच्या गांठी पडल्या, त्या वेळीं मी हजर होतों. मीं त्यांना घोड्यांवरून एकमेकांना सलाम करतांना पाहिलें, ते खालीं उतरले तेव्हांही त्यांना पाहिलें, व ज्यावेळीं त्यांनीं एकमेकांना आलिंगन दिलें त्यावेळीं जणू काय ते दोघे मिळून एकच मूर्ति आहे असा भास झाला त्यावेळींही पाहिलें. आणि खरेंच, त्या दोघांची मिळून जर एकच मुर्ति असती तर तिची बरोबरी करण्याची कोणत्या वीर्यशाली राजबिंड्याची छाती होती?

बापू—या प्रसंगीं मी अगदीं निजून होतों.

नाना—तर मग तुह्मीं इहलोकचें वैभव पाहण्याची एक मोठी संधि गमावली. आजपर्यंत लोकांच्या ह्मणण्यांत डामडौलाची व वैभवाची कांहीं विवक्षित कल्पना असे, पण आतां त्या कल्पनेवरही ताण झाली. प्रत्येक दिवशीं नवा थाट व तोही केवळ अप्रतिम! आज विदर्भदेशच्या लोकांनीं देवाप्रमाणें तेजःपुंज जरीचे पोषाख करून आ-

मच्या लोकांना लाजविलें कीं उद्यां आमच्या मंडळीनें येथून तेथून अगदीं सुवर्णभूमीचा भास करून द्यावा. प्रत्येकाचे पोषाख येथून तेथून रत्नखचित; त्यांच्या त्या खुज्या खिदमदगारांचे देखील देवदूताप्रणें जरतारी पोषाख ! स्त्रिया तर उंची उंची वस्त्रप्रावरणांच्या भारानें अगदीं घामाघुम होऊन गेल्या व त्यांच्या गालावर लाली चढली ! आज हा पोषाख अवर्णनीय असा ठरला कीं दुसऱ्या दिवशीं तोच अगदीं भिकारडा ह्मणून त्याची किंमत व्हावी. ते दोघेही राजे तेजःपुंज व अगदीं समसमान होते. घटकेंत हा अत्युत्तम ह्मणून वाटावें व घटकेंत तोच गचाळ ह्मणून वाटावें. डोळ्यांपुढें जो असेल त्याची स्तुति केल्याशिवाय राहवत नसे, पण जर दोघेही एकदम दृष्टिसमोर आले तर दोन मूर्ति दिसूंच नयेत—ते एकच आहेत असा भास व्हावा; व याची किंवा त्याची निंदा करण्याची कोणाची ह्मणून छाती होत नसे. आणि जेव्हां ह्या प्रतिसूर्यांनीं आपापल्या चोपदारांच्या हातीं पराक्रम करून दाखविण्यासंबंधाचे इशारे केले, तेव्हां त्यांनीं इतका अलौकिक पराक्रम करून दाखविला कीं भीमसेनाच्या पराक्रमाच्या व शौर्याच्या गोष्टी अगदीं अक्षरशः खऱ्या असतील असें लोक ह्मणूं लागले.

बापू—तुह्मी अतिशयोक्ति करून सांगतां.

नाना—मी मोठ्या घराण्यांतला आहें, व सत्याकडे माझी नैसर्गिक प्रवृत्ति आहे. फार काय सांगूं. अगदीं कुशल वक्त्यानें जरी या गोष्टींचें वर्णन केलें तरी तेंही यथातथ्य होणार नाहीं. तो प्रसंग दृष्टीनेंच पाहिला पाहिजे होता.

बापू—सर्व श्रीमंती थाट ! त्यांत कांहीं कमी होतें ? हुकूम झाला कीं ती गोष्ट झालीच. ज्याला जें सांगितलें तें त्यानें हुकुमाप्रमाणें करायाचेंच. या सर्वांचा नायक कोण होता ? या बड्या तमाशाचा चालक व प्राण कोण होता ?

नाना—तुमच्या लक्षांत आलाच असेल. असा एक मनुष्य होता कीं ज्याचें अशा कृत्यांत कोणत्याही तऱ्हेचें अंग असण्याचा संभव नाहीं.

बापू—कोण, कोण तो ?

नाना—हें सर्व त्या आचार्यांच्या मसलतीनें झालें होतें.

बापू—आग लागो त्याला ! अहो तो इतका महत्त्वाकांक्षी आहे कीं कोणी म्हणून त्याच्या तडाक्यांतून सुटला नाहीं. याला या जगांतील घडामोडीशीं काय करावयाचें आहे ? हे लक्षनिरंजन राजाचे परोपकाररूपीं किरण स्वतः पिऊन टाकतात व पृथ्वीवर त्याचा यत्किंचित्ही प्रकाश पडूं देत नाहींत याचें मला मोठें नवल वाटतें.

नाना—खरेंच, त्यांच्या अंगीं अशी कांहीं हातोटी आहे कीं या सर्व गोष्टी त्याला करतां येतात. तो कांहीं मोठ्या कुळांत जन्मला नाहीं कीं ज्याच्या योगानें त्याला एवढें महत्त्व प्राप्त व्हावें. त्यानें राजाची एखादी मोठी कामगिरी बजावून मोठेपणा मिळविला म्हणावा तर तसेंही नाहीं; बरें मोठ्या लोकांशीं याचा आप्तपणा आहे म्हणावें तर तसेंही नाहीं; कोळ्याप्रमाणेंच याचें याला जाळें तयार करावें लागलें. अहो ! तो केवळ आपल्या गुणांच्या जोरावर एवढ्या योग्यतेस चढला हें अगदीं स्पष्ट आहे. ही ईश्वरी देणगी ! तिच्या प्रभावानें तो थेट राजाच्या खालोखालच्या दर्जाला जाऊन पोंचला आहे.

अण्णा—ईश्वरी देणगी कोणती हें मला तर सांगतां येत नाहीं ! माझ्यापेक्षां जास्ती अकलेच्या मनुष्याला ती दिसेल. मला तर त्याच्या प्रत्येक रोमरंध्रांतून गर्व दिसतो. हा इतका गर्व त्याला आला कोठून ? सैतानापासून जर हा त्याला प्राप्त झाला नाहीं तर सैतान महाराज मोठे चिकू असले पाहिजेत, किंवा याच्यापूर्वीच त्यांनीं सर्व गर्व दुसऱ्या कोणाला तरी देऊन टाकला असावा व या राजश्रींनीं हा नवा नरक स्वतः निर्माण केला असावा !

बापू—अहो आग लागो त्या विदर्भदेशच्या सफरीला ! राजाच्यावरोबर कोण कोण जावयाचे याची व्यवस्था राजाला न विचारतां यानेंच केली नाहीं काय ? यानेंच सर्व सरदारांची यादी केली, व तीही अशाच लोकांची कीं त्यांना एवढा खर्च होऊनही मानपानाच्या नांवानें शून्य ! यानें पत्र लिहावें व त्याची कौंसिलला दादही नाहीं— व त्यांत मजकूर हा कीं सर्व पत्रव्यवहार माझ्याशीं करावा !

अण्णा—मला ठाऊक आहे कीं माझ्या तिघां नातेवाईकांच्या इस्टेटीवर इतका जबर वोझा बसला कीं त्यांना पूर्वीप्रमाणें मजेनें आतां कधींही राहतां येणार नाहीं.

बापू—अहो, या सफरीमध्यें पुष्कळांची अशी दुर्दशा झाली. एवढ्या तमाशाचा परिणाम काय झाला ह्मणाल तर त्याच्या योगानें सगळे भिकारी झाले !

नाना—विदर्भदेशच्या लोकांत व आमच्यांत एवढ्या खर्चानें जो तह झाला त्याची तितकी किंमत नाहीं हें पाहून मला फार वाईट वाटतें.

बापू—परवांचें भयंकर वादळ झाल्यावर प्रत्येक मनुष्याला प्रेरणा झाल्यासारखें होऊन गेलें. कोणाशीं सल्लामसलत न करतां प्रत्येकजण आपला भाकित करित सुटला. आणि तें भाकित हेंच कीं या तहनाम्याच्या चिंध्या चिंध्या होतील.

नाना—तसें झालेंच ! कारण विदर्भदेशच्या राजानें तहनामा मोडला आणि वृंदावन येथील आमच्या व्यापाऱ्यांचा मालही जप्त केला.

अण्णा—आणि ह्मणूनच त्यांच्या वकीलानें ब्र देखील उच्चारला नाहीं !

नाना—हं, आणखी काय ?

अण्णा—खासा तहनामा ! आणि इतके पैसे खर्चून केलेला !

बापू—अहो ! हें सर्व कृत्य आमच्या आचार्यांचें.

नाना—तुमचें व आचार्यांचें मन एकमेकांविषयीं शुद्ध नाहीं हें राजे साहेबास ठाऊक आहे. तुमचा अधिकाधिक उत्कर्ष व्हावा अशी माझी मनापासून इच्छा आहे आणि ह्मणूनच माझें तुह्माला सांगणें आहे कीं आचार्यांची द्वेषबुद्धि व त्याची शक्ति या दोन्ही गोष्टी ध्यानांत ठेवा. तसेंच हेंही ध्यानांत ठेवा कीं त्यानें द्वेषबुद्धीनें एखादी गोष्ट करावयाची मनांत आणली तर त्याला साधनांची अनुकूलता आहे. तो खुनशीस्वभावाचा आहे हें तुह्मास ठाऊक आहेच. त्याच्या तरवारीची धार मोठी तीक्ष्ण आहे व ती तरवार लांबलचक असून तिचा पल्ला दूरवर पोंचण्यासारखा आहे हेंही मला ठाऊक आहे. एखाद्या

ठिकाणीं त्या तरवारीचा प्रवेश होण्यासारखा नसला तरी तो जोरानें ती त्या ठिकाणीं भोसकतो. हा माझा उपदेश लक्षांत ठेवा; तुम्हाला तो हितकरच होईल. पहा, आला तो खडक, हाच टाळण्याबद्दल मी तुम्हाला सांगत होतों.

(लवाजम्यासह गुंडाचार्य, त्याचे परिजन, व हातांत कागद घेतलेले त्याचे दोघे चिटणीस प्रवेश करतात. जातां जातां आचार्य बापूसाहेबाकडे तिरस्कारयुक्त मुद्रेनें पहातो, व बापूसाहेबही त्याप्रमाणेंच त्याच्याकडे पहातात).

गुंडाचार्य—बापूसाहेबाचा कारभारी ? हं. कोणत्या ठिकाणीं त्याची जबानी व्हावयाची ?

१ ला चिटणीस—येथेंच, महाराज.

गुंडा०—तो स्वतः हजर आहे काय ?

१ ला चिटणीस—होय, महाराज.

आचार्य—बरें तर, आपल्याला आणखी कांहीं गोष्टी समजतील, आणि मग बापूसाहेबाचा नूरच उतरून जाईल.

(गुंडाचार्य व त्याचा परिवार जातात.)

बापू—या खाटकाच्या बच्चाचें तोंड मोठें विषारी आहे व तें बंद करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. याला जागें न करणें हेंच उत्तम. भिकाऱ्याच्या विद्येनें खानदानी लोकांवर वरचष्मा केला !

नाना—काय, तुमचें मन अगदीं खवळून गेलें ? मन ताळ्यावर येण्यासाठीं तुम्ही देवाची प्रार्थना करा. तुमच्या रोगाला हेंच औषध.

बापू—माझ्याविरुद्ध कांहीं तरी चाललें आहे असें त्याच्या चेहेऱ्यावरून मला दिसत होतें. तो किती तिरस्कारयुक्त मुद्रेनें मजकडे पहात होता ! माझा पाडाव करण्याची त्यानें यावेळीं कांहीं शकल काढली आहे व तो राजाकडे गेला आहे. मीही मागोमाग जातों व त्याच्या टवकारण्याचा समाचार घेतों !

नाना--तसें करूं नका. या रागाच्या सपाट्यांत तुम्ही काय करतां याचा शांतपणें विचार करा. एखाद्या उभ्या कड्यावर चढतांना पहिल्यांदां हळूहळू पाऊल टाकिलें पाहिजे. ' संताप ' हा भरधांव

निघालेला घोडा आहे; त्याला जर तसेंच जाऊं दिलें तर त्याचा तोच दमून जाईल. तुमच्यासारखा हितवाद सांगणारा या देशांत दुसरा कोणी नाहीं. तुमच्या मित्राला जसें तुह्मीं करायला सांगितलें असतें तसें तुह्मी करा ह्मणजे झालें.

बापू—मी आतां राजाकडे जाणार व त्याच्या उद्धटपणाची खोड मोडणार, अथवा रावांत व रंकांत बिलकुल फरक नाहीं अशी चोहोंकडे द्वाही फिरवणार !

नाना—माझें ऐका. आपल्या शत्रूकरतां अशी भट्टी पेटवितां कामा नये कीं त्यांत आपलीच आहुति पडेल. अतित्वरेनें आपण धांवलों तर आपण निशाणाच्यापुढें निघून जाऊं, आणि तसें झालें ह्मणजे आपण हरूं. विस्तवानें दुधाला ऊत आला व तें वर आलें ह्मणजे तें वाढतें असें वाटतें, पण खरोखर तें उतास येऊन भांड्या-खालीं वाहत जातें, हें तुह्माला ठाऊक नाहीं असें नाहीं. माझें पुनः हेंच सांगणें आहे कीं माझें ऐका. तुह्मांला उपदेश करण्याला तुम-च्यापेक्षां शहाणा असा दुसरा कोणी या देशांत नाहीं. या तुमच्या संतापाग्नीला विचाररूपी उदकानें अजीबात विझवून तरी टाका किंवा अमळ शांत तरी करा !

बापू—मी तुमचा मोठा आभारी आहें व तुह्मी सांगतां त्याप्र-माणेंच मी वागेन. परंतु मला ठाऊक आहे—आणि हें मी द्वेषबु-द्धीनें ह्मणत नाहीं, तर माझा अंतरात्मा कळकळतो ह्मणून ह्मणतों—कीं हे राजश्री लांचखाऊ व राजद्रोही आहेत, व एखाद्या तलावांतील पाणी शांत असतांना जसा खडान् खडा दृष्टी पडतो, तसाच या गो-ष्टीबद्दल मजजवळ स्पष्ट पुरावा आहे.

नाना—तो राजद्रोही आहे असें ह्मणूं नका.

बापू—राजाला तर मी असें सांगणारच आणि भला भक्कम असा पुरावाही देणार. पहा, हा पवित्र कोल्हा आहे अथवा लांडगा आहे अथवा कोल्हाही आहे व लांडगाही आहे, कारण हा जसा लुच्चा तसाच लोभीही आहे. लोकांस दुःख देण्याची ज्या मानानें याच्या मनाची प्रवृत्ति आहे त्या मानानेंच दुःख देण्याचें सामर्थ्यही आहे.

याच्या अधिकारानें याचें मन कलुषित झालें आहे व मनानें अधिकार कलुषित झाला आहे. हा ज्याप्रमाणें येथील लोकांत आपली प्रतिष्ठा मिरवित असतो त्याप्रमाणेंच विदर्भदेशांतही आपली प्रतिष्ठा मिरवावी ह्मणून यानें आमच्या राजेसाहेबास भर दिली व इतक्या खर्चाच्या मुलाकती, व तहनामे केले व तेही इतक्या वसुलाचे होते कीं जसें कांचेचें भांडें घासतां घासतां फुटतें तसेंच त्या तहनाम्याचेही तुकडे तुकडे झाले.

नाना--झाले खरेच !

बापू—अहो ! आणखी हें पहा, ह्या तहनाम्याच्या शर्ती या कावेबाज आचार्यानें आपल्यास वाटतील तशा तयार केल्या, व त्यानें अशा शर्ती असल्याच पाहिजेत असें ह्मणतांच मंजूरही झाल्या मेल्या माणसाला दिलेल्या टेंक्याची जितकी योग्यता तितकीच या तहनाम्यांतील शर्तींची योग्यता ! परंतु आमच्या आचार्य महाराजानें हें केलें आणि तें सर्व चांगलेंच आहे; कारण कीं परमपूज्य गुंडाचार्य कीं ज्यांच्या हातून कधीं चूक व्हावयाचीच नाहीं त्यांनीं हें केलें ! आतां याचा परिणाम असा झाला—आणि हें त्याच्या राजद्रोहीपणाचें पिल्लूंच आहे—कीं बिदरचा बादशाहा आपल्या आतेला ह्मणजे राणी साहेबाला भेटण्याच्या मिषानें—कारण तें मिषच होतें, खरा उद्देश गुंडाचार्याला भेटण्याचा होता—येथें आला. विदर्भदेशच्या राजाचें व आमच्या राजाचें सख्य झालें ह्मणजे आपल्याला अपाय होईल अशी त्याला भीति उत्पन्न झाली; कारण हा जो तहनामा झाला त्यापासून त्याचें नुकसान होतें. ह्मणूनच त्यानें गुंडाचार्याशीं आंतून संधान बांधलें. आणि माझा तर्क आहे व तो अगदीं बरोबर आहे—कीं गुंडाचार्यानें तुझें काम करून देतों असें वचन देण्याच्या पूर्वीच त्या बादशहानें याची मूठ दाबली, आणि ह्मणून त्यानें गोष्ट काढण्याच्या पूर्वीच तुझ्या मनाजोगतें करतों असें गुंडाचार्य त्याला ह्मणाला. परंतु याप्रमाणें जेव्हां सोनेरी फरसबंदी रस्ता तयार झाला त्यावेळीं तो बादशहा गुंडाचार्यास ह्मणाला कीं तुमच्या राजेसाहेबांच्या मार्गक्रमणाची दिशा बदलून टाक व झालेला तहनामा रद्द होईल अशी

तजवजि कर. आतां राजेसाहेबांला समजूं द्या—आणि मी तर त्यांस तें समजून सांगणारच—कीं हे राजश्री आपल्यास वाटेल तेव्हां व केवळ आपल्या फायद्याकरितां आमच्या राजेसाहेबांची अब्रू विकतात व विकत घेतात !

नाना—गुंडाचार्यांनें असें केलें हें ऐकून मला फार वाईट वाटतें, व तुह्मी सांगतां यांत कांहीं तरी चूक झाली असावी.

बापू—नाहीं ! मी सांगतों यांतील एक अक्षरही चुकलें नाहीं. त्यानें हें सर्व असें केलें असें ह्मणण्याला मजजवळ पुरावा आहे.

(बलदेवसिंग, एक फौजदार व दोन किंवा तीन शिपाई प्रवेश करतात.)

बलदेव—फौजदार ! आपल्या हुकुमाची बजावणी करा.

फौजदार-(बापूसाहेबाला) महाराज जाहागिरदार साहेब, राजेसाहेबाच्या हुकुमानें मी तुह्मास राजद्रोहाच्या आरोपावरून पकडतों.

बापू—सरदारहो, हें पहा, मी आतां जाळ्यांत सांपडलों. यांच्या कुटिल प्रयोगांनीं माझा नाश होणार !

बलदेव—तुमचें स्वातंत्र्य काढून घेऊन तुह्माला हें काम करावयाला सांगावयाचें मला वाईट वाटतें. राजेसाहेबाची अशी आज्ञा आहे कीं तुह्मी बंदीशाळेंत चलावें !

बापू—मी निरपराधी आहे असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कारण कीं माझ्या हातून फासा पडून गेला व माझ्या शुभ्र कीर्तीला कलंक लागणार. जशा इतर सर्व गोष्टी ईश्वराच्या इच्छेनें होतात तशीच हीही होणार ! बरें आहे, अण्णासाहेब, नमस्कार !

बलदेव—नाहीं ! त्यांनाही तुमच्याबरोबर आलें पाहिजे. (अण्णासाहेबास) राजेसाहेबांची अशी इच्छा आहे कीं दुसरा हुकूम होईतोंपर्यंत तुम्हींही बंदिशाळेंत रहावें.

अण्णा—बापूसाहेब ह्मणतात त्याप्रमाणें ईश्वराची जशी इच्छा असेल तसें होईल. राजेसाहेबांची आज्ञा मी मान्य करतों.

बलदेव—बापूसाहेबांचे उपाध्ये कृष्णंभट, त्यांचा कारभारी गि-

रराव, व मानवीचे देशमुख या सर्वांना पकडण्याकरितां राजेसाहेबांनीं मजजवळ हुकूम दिला आहे.

बापू—हं ठीक; हे सर्व कटाचे अवयव. यांच्याशिवाय दुसरें तर कोणी नाहींना ?

बलदेव—दहिगांवचे आचार्य.

बापूसा०—नारायणाचार्य !

बलदेव—हं, तोच.

बापू—माझ्या कारभाऱ्यानें लबाडी केली. त्या महत्त्वाकांक्षी आचार्यानें त्याला सोन्याची लालूच दाखविली. माझ्या आयुष्याचे आतां थोडे दिवस राहिले आहेत. माझ्या गतवैभवाची आतां छाया मात्र उरली आहे, व तिनें माझ्या भावी वैभवरूपी सूर्याला ग्रासून टाकलें आहे. सरदारहो, या !

(**पहिला प्रवेश समाप्त.**)

अंक १ ला. प्रवेश २ रा.

[कायदेकौंसिलचा दिवाणखाना]

(वाद्यें वाजतात. राजा, गुंडाचार्य, कौंसिलचे सभासद, सर वासुदेवराव, अधिकारी, आणि चाकरमाणसें प्रवेश करतात. राजा आचार्यांच्या खांद्यावर टेकलेला असा प्रवेश करतो.

राजा—तुमच्या अश्रांत श्रमानेंच माझा जीव आणि माझ्या आयुष्याचा उत्तम भाग हीं बचावलीं. मी त्या कटाला बळीच पडलों असतों, व तुह्मीं त्याचा विध्वंस केला म्हणून मला तुमचे आभार मानले पाहिजेत. बापूसाहेबांच्या मनुष्यानें तुमच्याजवळ कबूल केलेल्या गोष्टी आह्मीं प्रत्यक्ष ऐकाव्या अशी आमची इच्छा आहे. तर त्याला आमच्यासमोर आणवा ह्मणजे तो आपल्या धन्याच्या राजद्रोहाच्या गोष्टी एकामागून एक आमच्यापुढें पुनः सांगेल.

[राजा तख्तावर बसतो—सभासद आपापल्या जागेवर बसतात—आचार्य राजाच्या उजव्या बाजूस त्याच्या पायापाशीं बसतो—पडद्यांतून अवाज होतो कीं ." चला रस्त्यांतून एकीकडे व्हा. राणीसाहेबांस रस्ता द्या, " नानासाहेब व तात्यासाहेब यांसह राणी प्रवेश करत्ये. राणी गुडघे टेंकते. राजा तख्तावरून खालीं उतरतो, तिला उठवितो, तिचें चुंबन घेतो, व तख्तावर आपल्या बाजूस बसवून घेतो]

राणी—नाहीं, मला आणखी कांहीं वेळ गुडघे टेकले पाहिजेत, कारण मला विनंती करावयाची आहे.

राजा—उठा, आमच्या बाजूस येऊन बसा. तुमच्या विनंतीपैकीं अर्धी तर आह्मांला सांगण्याची जरूरच नाहीं, कारण आमच्या अधिकारांतील अर्धा अधिकार तुह्मांला आहेच. बाकी राहिलेला अर्धा भाग तुह्मी मागण्याच्या पूर्वींच देऊन टाकला आहे. तुमची इच्छा काय आहे ती कळूं द्या ह्मणजे त्याप्रमाणें करूं.

राणी—मी आपली फार आभारी आहें. आपण आपल्यावर प्रीति करावी व तसें करतांना आपल्या उच्चस्थानाची योग्यता व सन्मान यांची हांनि न होऊं द्यावी हाच माझ्या विनंतीचा मुख्य मुद्दा आहे.

राजा—हें तर आम्हास मान्यच आहे. पुढें ?

राणी—मला पुष्कळ लोकांनीं—व ते सगळे राजनिष्ठ आहेत—असें कळविलें आहे कीं तुमची प्रजा दुःखार्णवांत अगदीं बुडाली आहे. कामिशनर लोकांस असें हुकूम सुटले आहेत कीं त्यांच्यामुळें प्रजेचीं राजनिष्ठ अंतःकरणें अगदीं सोलून निघालीं आहेत. या जुलमी कृत्यांचे चालक जरी हे भले आचार्य आहेत—आणि ह्मणून ते यांची निंदाही करतात—तरी, राजाधिराज—ईश्वर करो आणि आपली कीर्ति सदैव उज्ज्वल राहो—आपणही त्यांच्या तडाक्यांतून सुटलां नाहीं. अहो ! अशीं कठोर वचनें त्यांच्या तोंडांतून निघत आहेत कीं त्यांच्या राजनिष्ठेचा चुराडा होऊन ते आतां बंड करतील कीं काय असें वाटतें !

नाना—करतील कीं काय अशी शंका कां ? बंड केलेंच; कारण या जुलमी करांच्या बोझ्यानें, आपआपला कारखाना चालविण्याचें सामर्थ्य, कोष्टयांत न राहिल्यानें, त्यांनीं सर्व विणणारे, रुई साफ करणारे, व कातणारे लोकांस रजा दिली. या लोकांस निर्वाहाचें दुसरें साधन नसल्यानें, व हे दुसऱ्या कामास निरुपयोगी असल्यानें त्यांनीं भुकेनें व्याकुल व निराश होऊन, " आह्मी उपाशी मरतों " ह्मणून मोठी आरडाओरड मांडली आहे !

राजा—कर ? आणि कोणांवर ? कोणांवर करांचा बोझा ? आचार्य आमच्याबरोबर तुह्मांलाही लोक दूषण देतात. तुह्मांला या कराची कांहीं हकीकत माहित आहे काय ?

आचार्य—महाराज, या राज्याच्या व्यवस्थेचा मला एक भाग ठाऊक आहे. माझ्याबरोबर असणाऱ्या दुसऱ्या व्यवस्थापक मंडळींत मी पुढच्या अंगास आहें येवढेंच कायतें.

राणी—नाहीं, आचार्य, दुसऱ्यापेक्षां तुह्माला जास्ती माहिती नाहीं. परंतु तुह्मी अशा कांहीं गोष्टी करतां कीं त्या ज्यांना समजून घेण्याची इच्छा नसते, त्यांना त्या हितकर नसूनही समजून घ्याव्या लागतात. हें तुह्मांलाही ठाऊक आहे व लोकांनाही ठाऊक आहेच. हा जुलमाचा प्रकार असा आहे कीं महाराजास तो ऐकतांना देखील त्रास होईल. ज्यांच्यावर साक्षात् प्रसंग आहे त्यांची पाठ त्या जुलमाच्या भारानें अगदीं वांकून गेली आहे लोक ह्मणतात कीं हें सर्व तुमचें कृत्य व तसें नसेल तर मग ते तुमची व्यर्थ निंदा करतात.

राजा—पुनः तेंच ! जुलुम ? कोणत्या प्रकारचा ? हें आम्हांला कळेल तर खरें ?

राणी—मी अगदीं महाराजांच्या धैर्याची सीमाच पाहत्यें. परंतु महाराजांनीं दिलेल्या आश्वासनामुळें मला बोलण्यास थोडा धीर येतो. लोकांच्या दुःखाचें कारण कमिशनर लोकांचा हुकूम. प्रत्येकानें आपआपल्या उत्पन्नाचा ६ वा हिस्सा एकदम दिला पाहिजे, असे हुकूम त्यांनीं सोडले आहेत व याचें कारण ते असें सांगतात कीं तुमच्या विदर्भदेशांतील लढायांचा खर्च ! अशा जुलमानें लोक

उघडपणें बोलूं लागले, व त्यांनीं आपल्या कर्तव्यकर्माचा त्याग केला. त्यांची राजनिष्ठा मनांतल्या मनांत थिजून गेली. जे पूर्वी तुमच्याबद्दल ईश्वराची स्तुति करीत होते तेच आतां शाप देऊं लागले आहेत. गोष्ट इतक्या थराला येऊन पोंचली आहे कीं कोणी एखाद्यानें जर हा हुकूम ऐकला तर तो गुलाम आहे असें या बिथरलेल्या लोकांस वाटतें. तर माझी अशी विनंती आहे कीं आपण दुसऱ्या सर्व गोष्टींच्या आधीं या गोष्टीचा विचार करावा.

राजा—अलबत्—हें सर्व आमच्या मर्जीविरुद्ध आहे.

गुंडा०—माझ्यासंबंधानें ह्मणाल तर या बाबतींत जें मीं आपलें मत दिलें असेल त्याच्या शिवाय म्यां कांहीं एक अधिक केलें नाहीं; व जे जाहिरनामे प्रसिद्ध केले गेले ते देखील विद्वान् न्यायाधिकाऱ्यांनीं पसंत केल्यावर प्रसिद्ध केले गेले. ज्या अज्ञानी लोकांस मी कोण आहें व माझी योग्यता काय आहे हें ठाऊक नाहीं, त्यांनीं माझ्या कृत्यावर टीका केली तर मला असें ह्मटलें पाहिजे कीं सद्गुणाची वाट मोठी बिकट आहे व अधिकारापन्न लोकांचें हें दुर्दैवच आहे. मत्सरी लोकांच्या निंदेला भिऊन आपण आपलीं कर्तव्यकर्में करायाचीं सोडूं नयेत; कारण कीं अधाशी मासे ज्याप्रमाणें नव्या शृंगारलेल्या जहाजाभोंवतीं जमतात तसेंच हेही एखाद्याच्या मागें लागतात. त्यांना व्यर्थ आशा मात्र असते, पण त्यापासून त्यांस दुसरा कोणताही फायदा नाहीं. आह्मी ज्यावेळीं एखादी चांगली गोष्ट करतों त्यावेळीं हे असंतुष्ट लोक ती गोष्ट आह्मीं केली नाहीं असें तरी ह्मणतात, अथवा त्यांना ती पसंत तरी पडत नाहीं; व ज्यावेळीं आमच्या हातून एखादी वाईट गोष्ट होते, व तींत कांहीं गोम असते त्यावेळीं, आह्मीं मोठें चांगलें काम केलें अशी आमची वाखाणणी करतात. अशा लोकांच्या निंदेला भिऊन जर आह्मी आपले स्तब्ध बसलों, आणि कांहीं हालचाल केली नाहीं तर आह्मी बसल्या जागींच स्थिर होऊं अथवा आमची स्थिति दगडी पुतळ्याप्रमाणें होईल.

राजा—आपण जेव्हां एखादें काम मोठ्या काळजीनें करतो त्यावेळीं आपल्याला भिण्याचें कारण नाहीं. ज्या गोष्टीं आपण आजपर्यंत

केल्या नाहींत त्यांच्या परिणामाबद्दल मात्र आपल्यास भीति बाळग-ली पाहिजे. अशा प्रकारचे हुकूम मागें सुटले होते अशाबद्दलचा जुना दाखला आहे काय ? मला वाटतें नाहीं. आपल्या प्रजेशीं आपल्याला, आपल्या मनास वाटेल त्याप्रमाणें नव्हे, तर कायद्याप्रमाणें वागलें पाहिजे. प्रत्येकाच्या प्राप्तीचा ६ वा भाग ! भयंकर जुलूम ! जर आपण प्रत्येक झाडाची साल व कांहीं शाखा तोडून टाकल्या आणि फक्त मुळ्या ठेवल्या तर हवेनें तें झाड तेव्हांच सुकून जाईल. ज्या ज्या जिल्ह्यांत लोकांनीं हुकूम मानण्याचें नाकबूल केलें आहे त्याठिकाणीं आमच्या माफीचीं पत्रें, ताबडतोब पाठवा. हें काम तुमच्यावर सोंपवितों; याची अम्मलबजावणी लवकर करा.

गुंडा— [चिटणीसास] अहो, हें बघा, राजेसाहेबांच्या माफीचीं पत्रें प्रत्येक जिल्ह्यांत पाठवा. लोकांचा माझ्याबद्दल मोठा वाईट ग्रह झाला आहे. ही माफी आमच्या मध्यस्थीनें सर्व लोकांस मिळाली अशी दवंडी पिटवा. पुढें काय करावयाचें हें मी लवकरच कळवीन.

[चिटणीस जातो.] (कारभारी येतो.)

राणी—मला फारच वाईट वाटते कीं बापुसाहेबांवर तुमची अवकृपा झाली.

राजा—जसें तुह्माला वाईट वाटतें तसेंच पुष्कळांना वाटतें. तो मोठा विद्वान् असून अप्रतिम वक्ता आहे. तो स्वभावतःच मोठा बुद्धिमान् आहे व त्यास शिक्षणही असें मिळालें आहे कीं तो मोठमोठ्या पंडितांसही शिकवूं शकेल, पण त्याला मात्र दुसऱ्याच्या मदतीची जरूर पडावयाची नाहीं. पण पहा ! अशा सद्गुणांची जर नीट व्यवस्था लागली नाहीं, व मन एकदां दूषित होऊन दुर्गुणाकडे त्यांची प्रवृत्ति झाली कीं तेच गुण कीं जे पूर्वीं इतके मनोरम दिसत होते—दसपट भयंकर अशा दुर्गुणांचें स्वरूप धारण करितात. तो इतका गुणी आहे कीं त्याची गणना मोठ्या अलौकिक पुरुषांत करीत असत. त्याचें मोहक भाषण आह्मीं तासतासभर जरी ऐकलें तरी आम्हांला असें वाटावें कीं ते आम्हीं क्षणभरच ऐकलें. त्याच पुरुषाच्या सर्व

गुणांनीं आतां इतकें भयंकर स्वरूप धारण केलें आहे कीं त्याच्या सर्व गुणांस कालिमा येऊन त्यांची माती झाली—या येथें बसा. हा त्याचाच विश्वासू चाकर. याच्या तोंडून मनाला उद्वेग उत्पन्न करणाऱ्या अशा गोष्टी तूं ऐकशील. यानें पूर्वीं सांगितलेलें बापुसाहेबाचे कैटाळ त्यास पुनः सांग ह्मणून ह्मणा—या गोष्टी कितीवेळां जरी ऐकल्या तरी त्या पुष्कळदां ऐकल्या असें कधींही वाटणार नाहीं व त्याबद्दल कितीही वाईट वाटलें तरी तें थोडेंच.

आचार्य—ये असा पुढें ये. इमानी प्रजाजनाप्रमाणें बापुसाहेबाच्या ज्या गोष्टी तुला ठाऊक असतील त्या निःशंकपणें बोलून दाखीव.

राजा—निर्भयपणें सांग.

कारभारी—पहिल्या पहिल्यांदां नेहमीं त्यांच्या भाषणांत हें येत असे कीं राजाचा संततीशिवाय अंत झाला तर मी अशी व्यवस्था करीन कीं हें राज्य माझ्या ताब्यांत येईल. हेंच शब्द ते आपल्या जांवयाजवळ ह्मणजे अण्णासाहेबाजवळ बोलतांना मीं ऐकलें आहे. त्याजजवळ ते असेंही बोलले कीं आचार्यांचाही सूड मी खात्रीनें घेईन.

आचार्य—महाराज, पहा किती भयंकर विचार हे. आपला अंत संततीशिवाय व्हावा येवढ्यानें त्याचें समाधान होत नाहीं. त्याच्या दुष्टविचारांची आपल्या शरीरावर नजर आहे, व ते तेथेंच थांबणार नाहींत, तर तुमच्या स्नेह्यालाही सर करणार.

राणी—हे विद्वान् आचार्या, जो मजकूर खरा असेल तोच सांगा.

राजा—सांग, सांग, पुढें सांग. आह्मांला संतती झाली नाहीं तर आमच्या राज्यावर त्याचा हक्क कसा पोंचतो ? याविषयीं त्यास बोलतांना तूं कधीं ऐकलेंस काय ?

कारभारी—नारायणाचार्यांनें एक खोटेंच भाकित केलें व त्यामुळें हें विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले होते.

राजा—हा कोण ?

कारभारी—हा एक भिक्षुक आहे, व त्यांचा उपाध्याय आहे. तो

क्षणोक्षणीं ' तूं राजा होणार. ' ' तूं राजा होणार ' ! असें ह्मणत असे.

राजा—तुला हें कसें कळलें ?

कारभारी—आपण विदर्भदेशाला जाण्याच्या पूर्वी थोडे दिवस, या सफरीसंबंधानें विजयपुरीच्या लोकांचे काय विचार आहेत ह्मणून बापुसाहेबानीं मला विचारलें. तेव्हां मी ह्मणालों कीं, विदर्भदेशचे लोक बेइमानी करतील व राजाच्या जिवाला एखादा अपाय होईल अशी लोकांना भीति वाटते. मी असें ह्मणतों तोंच बापूसाहेब ह्मणाले, " हं भीति तर खरीच; माझा असा तर्क आहे कीं एका पवित्र आचार्यानें केलेलें भाकित खरें होणार. त्या आचार्यानें नेहमीं मला निरोप पाठवावा कीं एखाद्या योग्य वेळीं मी आपल्या उपाध्यायाला कांहीं महत्त्वाची गोष्ट ऐकण्याकरितां त्याजकडे पाठवावें. त्याप्रमाणें मीं आपल्या उपाध्यायास तेथें पाठविलें, व मीं सांगितलेली गोष्ट बापूसाहेबांशिवाय दुसऱ्या कोणालाही सांगणार नाहीं अशी त्याजकडून शपथ घेऊन तो त्याला ह्मणाला, कीं बापूसाहेबांला सांगावें कीं राजा किंवा त्याची संतति या कोणाचाही उदय होणार नाहीं—बापूसाहेबांनीं लोकांची प्रीति संपादन करावी, ते खास राज्यारूढ होणार ! "

राणी—मी तुला ओळखतें. तूं बापूसाहेबांचा खानगी कारभारी होतास नाहीं ? तुझ्याविरुद्ध लोकांच्या फार तकरारी आल्या ह्मणून त्यांनीं तुला काढून टाकलें. संभाळ, बापूसाहेबांचा सूड उगवावा ह्मणून खोट्यानाट्या गोष्टी सांगून पापांत पडूं नकोस ?

राजा—त्याला पुढें बोलूं द्या; चल पुढें सांग.

कारभारी—मी अगदीं खरें असेल तेंच सांगतों. मीं खुद्द बापूसाहेबांला सांगितलें कीं त्या आचार्यांच्या मनांत सैतानानें प्रेरणा केली व त्याला भुरळ घातली. या गोष्टीचें इतकें चर्वितचर्वण केल्यानें व या भाकितावर इतका विश्वास ठेवल्यानें एखादी भयंकर गोष्ट कदाचित् हातून घडून येईल. मीं असें ह्मणतांच ते ह्मणाले " छीः माझें काय नुकसान होणार ? " व पुढें असें ह्मणाले कीं परवांच्या

दुखण्यांत राजेसाहेबांचें कांहीं बरें वाईट झालें असतें तर आचार्यांचा व सर वासुदेवरावाचा शिरच्छेद केलाच असता.

राजा—हं, इतकें केलें असतें काय ? हा मनुष्य भयंकर खराच. आणखी कांहीं सांगूं शकतोस काय ?

कारभारी—होय महाराज.

राजा—सांग तर मग.

कारभारी—आपण बागेंत राहत असतांना, सरदार मानसिंगाबद्दल बापूसाहेबांची आपण कानउघाडणी केल्यावर—

राजा—होय तें मला आठवतें. पुढें, पुढें काय झालें ?

कारभारी—ते आणखी असें ह्मणाले कीं या गोष्टीबद्दल जर मला कैदेंत टाकलें असतें तर गादी बळकावणाऱ्या राजाची जी अवस्था माझ्या वडिलांनीं करण्याचें मनांत आणलें होतें तीच अवस्था मीं राजाची केली असती–माझ्या वडिलांनीं राजास समक्ष कांहीं प्रार्थना करावयाची आहे अशी विनंति केली होती व ती मान्य झाल्यावर, प्रार्थना करतां करतां राजाच्या पोटांत चाकू भोसकावा असा त्यांचा बेत होता!

राजा—मोठा बिलंदर राजद्रोही !

आचार्य—कां बाईसाहेब, या मनुष्यानें तुरुंगाच्या बाहेर राहून राजेसाहेबांनीं स्वातंत्र्याचा अनुभव घ्यावा हें शक्य आहे काय ?

राणी—ईडापीडा टळो, अमंगळ पळो !

राजा—आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय ? सांग पाहूं ?

कारभारी—" आपल्या वडिलाचें नांव घेतल्यावर " व "चाकू भोसकणार होता " हें सांगत असतां ते सावरून बसले, व त्यांनीं एक हात छातीवर ठेवून, व दुसऱ्या हातांत खंजीर घेऊन, डोळे वर करून, मोठी भयंकर प्रतिज्ञा केली त्याचें तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं त्यांनीं जर एखादी वाईट गोष्ट केलीच तर त्या बाबतींत ते आपल्या वडिलांवरही ताण करणार व ती अशा तऱ्हेनें कीं डळमळीत बेत व कृति यांत जितका फरक तितकाच वडिलाच्या बेतांत व यांच्या कृतींत राहणार!

राजा—आमच्या उरांत सुरी खुपसावी हें सगळ्या गोष्टीचें सार

त्याला कैद केद केलें आहे. त्याची तावडतोब चौकशी करा. कायद्याला जर त्याची दया आली तर तिचा त्यानें खुशाल फायदा घ्यावा. आमच्यापासून मात्र त्यानें दयेची आशा धरूं नये. निःसंशय, हा महान् राजद्रोही !

(दुसरा प्रवेश समाप्त.)

अंक १ ला प्रवेश ३ रा.

(रावसाहेब व मोहनराय प्रवेश करतात.)

रावसा०—विदर्भदेशाच्या मोहनीनें आमच्या लोकांची इतकी विलक्षण स्थिति व्हावी हें संभवतें तरी का ?

मोहन—अहो नव्या चाली रीती कितीही हास्यास्पद व स्त्रैण असल्या तरी लोक त्यांचें अनुकरण करणारच !

राव०—माझ्या बुद्धीनें, परवांच्या सफरीपासून आमच्या लोकांचें काय कल्याण झालें ह्मणाल तर ते नवीन तऱ्हेचा पोषाख करायाला शिकले. पण आमचे लोक किती तरी हुशार ! जेव्हां ते नटूं लागतात तेव्हां असें वाटतें कीं या विलक्षण पेहरावाचे उत्पादक राजे यांच्यापासून नटायाला शिकले; हे त्यांच्यापासून शिकले नाहींत.

मोहन—त्या सर्वांचे पाय नवे झाले आहेत, व तेही लंगडे. ज्यांनीं ज्यांनीं त्यांना पूर्वी चालतांना पाहिलें असेल त्यांना खास असें वाटेल कीं यांच्या पायांला कांहीं तरी विकार झाला असावा व ह्मणून हे असें चालतात.

राव०—अहो त्यांचा पेहेराव किती बदलला आहे? देशी पोषाखाचा मागमूस ह्मणून राहिला नाहीं—कसें काय ? काय बातमी आहे, सर वासुदेवराव ? (सर वासुदेवराव प्रवेश करतात)

सर वासु०—दरबारच्या दरवाज्यावर लावलेल्या नव्या जाहिरनाम्याशिवाय दुसरें नवल विशेष मीं कांहीं ऐकलें नाहीं.

राव०—जाहिरनामा कशाबद्दल ?

सर वासु०—सफर करून आलेल्या आमच्या शूर सरदारांच्या सुधारणेबद्दल. ते येथें आल्यापासून दरबारांत जिकडे तिकडे पोषाखासंबंधानें भांडणेंच सुरू झाली.

राव०—झालें हें बरें झालें! आतां तरी आमच्या दरबारचे लोक कीं ज्यांनीं अजून विदर्भ देश पाहिला नाहीं ते यांच्यापेक्षां शहाणे आहेत असें त्यांचें त्यांनाच वाटेल.

सर वासु—जाहिरनाम्याच्या शर्ती अशा आहेत कीं त्यांनीं ते पायमोचे, नव्या तऱ्हेचे जोडे, टेनिस खेळण्याचे पोषाख, आणखी दुसऱ्या विदर्भ देशांतल्या पोषाखाच्या वेड्यावांकड्या तऱ्हा कीं ज्यांच्या संबंधानें त्यांची माहिती बेताबाताचीच आहे—या सर्व गोष्टींचा त्यांनीं तावडतोब त्याग करावा, नाहीं तर त्या देशांतल्या लोकांत जाऊन मिसळावें. मला वाटतें ही छचोर तऱ्हा आतां नाहींशी होईल.

मोहन—रोगाची सांथ इतक्या जोरानें फैलावली आहे कीं आतां औषध दिलेंच पाहिजे.

राव०—ही नखरेबाज तऱ्हा बंद झाली तर आमच्या बायकांना किती तरी वाईट वाटेल पण !

सर वासु०—वाईट ह्मणजे, हें त्यांच्यावर मोठेंच संकट आलें ह्मणायचें !

मोहन—मला फार संतोष वाटतो कीं आतां ही तऱ्हा बंद होणार. अशा उपायाशिवाय ही चाल कधींही बंद न पडती. आतां आमच्यासारख्या जुन्या दरबारी लोकांनीं कीं ज्यांची आज इतके दिवस चहा नव्हती–एखादी मेजवानी दिली व गाणें केलें तर लोक ऐकतील व वाहवा करून माना डोलवतील.

राव०—असें खरें; तुमचा उत्साह अझून तरतरीत आहे.

मोहन—अहो तरतरीत ह्मणजे? जीवांत जीव आहे तोंपर्यंत तो असाच राहणार !

राव० सर वासुदेवराव, तुह्मी कोणीकडे निघालां ?

सर वासु०—आचार्यांच्या घरीं; तुम्हालाही निमंत्रण आहे.

राव०—हं; आहे; आज रात्रीं ते सरदारांस व त्यांच्या स्त्रियांस

एक वडी मेजवानी देणार आहेत. मी खात्रीनें सांगतों कीं आपल्या राज्यांतील उत्तम उत्तम स्त्रीरत्नें तेथें जमतील.

सर वासु०—त्या आचार्यांचें मन मोठें उदार. आपला देश जसा अत्यंत सुपीक तसाच तो दानशूर आहे. त्याच्या दयेचा वर्षाव चोंहींकडे होत आहे.

राव०—तो उदार आहे यांत संशय नाहीं. तो असा नाहीं असें ह्मणणारा केवळ कृष्णमुखीच !

मोहन—त्यानें उदार कां असूं नये ? त्याला साधनांची अनुकूलता तशीच आहे. त्याच्यासारख्यांनीं असें न करणें हें पाखंडी मताचा स्वीकार करण्यापेक्षांही अधिक पातक आहे. त्याच्या वृत्तीच्या माणसाच्या अंगीं औदार्य पाहिजेच, कारण त्याचाच कित्ता लोक गिरवणार.

राव०—आपण ह्मणतां तें खरें आहे. पण अशीं मोठीं उदाहरणें फारच थोडीं. चला माझी नाव सिद्ध आहे, मजबरोबर चला. सर वासुदेवराव मजबरोबर चला. आपल्याला उशीर होईल आणि मला तर उशीर होतां कामा नये; कारण मला राय गोविंदरायला मदत करायाला सांगितलें आहे.

मोहन—चला तर चला. (जातात).

तिसरा प्रवेश समाप्त.

अंक १ ला. [प्रवेश ४ था.]

आचार्यांच्या वाड्यांतील दिवाणखाना.

(तुताऱ्या वाजतात. आचार्यांकरितां एक वेगळी जागा, व इतर पाव्हण्याकरितां वेगळी जागा. एकीकडून पद्मिनी, व पुष्कळसे सरदार, मानकरी, व त्यांच्या स्त्रिया प्रवेश करतात; व दुसरीकडून रायगोविंदराय हे प्रवेश करतात.)

राय गोविंद—सभ्य स्त्रियांनों ! आचार्य महाराज तुह्मा सर्वांचें आगत स्वागत करीत आहेत. आजच्या प्रसंगीं तुह्मा सर्वांचा संतोष

व्हावा, व येथें जमलेल्या सभ्य स्त्रियांनीं यत्किंचित्‌ही चिंताक्रांत असूं नये अशी त्यांची इच्छा आहे. त्यांची आणखी अशीही इच्छा आहे कीं येथें जमलेल्या सर्व लोकांनीं उंची उंची पक्वान्नें व उत्तम उत्तम पेयें यांचा यथेच्छ स्वीकार करून सुखाचा अनुभव घ्यावा. या, तुह्मी फार उशीर केलात.

(रावसाहेब, मोहनराय, व सर वासुदेवराव प्रवेश करतात.)

अहो, आज येथें एवढा समारंभ व्हायचा हा विचार मनांत येतांच मी पंख लावून उडून आलों!

राव०—अहो तुह्मी तरणेताठे! सभ्य स्त्रियानों बसा. राय गोविंदरायसाहेब, तुह्मी इकडच्या लोकांचा समाचार घ्या, मी इकडच्यांचा घेतों. आचार्य महाराज येताहेत-नका, तुह्मी संकुचित होऊं नका; दोन स्त्रिया एके ठिकाणीं असल्यावर संकोचाशिवाय दुसरें काय असणार? मोहनराय तुह्मी यांचें मनोरंजन करा व समाचार घ्या. मेहेरबानी करून यांच्याजवळ बसा.

मोहन—मी तुमचा फार आभारी आहें. सभ्य स्त्रियानों, बसूं येथें?

(पद्मिनी व दुसरी एक स्त्री यांच्या जवळ बसतो)

माझ्या तोंडांतून एखादा वेडावांकडा शब्द निघाला तर संभाळून घ्या. हा स्वभाव आमच्या घराण्यांत वाडवडिलांपासून चालत आला आहे.

पद्मिनी—काय तुमचे वडील वेडे होते?

मोहन—अहो वेडे, अति वेडे होते-कामशास्त्राचें तर त्यांना अति वेड होतें. पण त्यांनीं कोणास इजा दिली नाहीं. माझी वागणूक जशीं या प्रसंगीं आहे तशीच त्यांचीही होती.

राव०—किती गोड भाषण? आतां तुह्मी मोठ्या मजेदार ठिकाणीं बसला आहांत. या स्त्रियांचा योग्य आदरसत्कार झाला नाहीं व त्या रुसल्या तर त्याचें पातक तुमच्या माथीं आहे.

सर वासु०—माझ्याकडचा समाचार मी एकटा घेतों.

(तुताऱ्या वाजतात. आचार्य सहपरिवार प्रवेश करतात व आसनावर बसतात.)

आचार्य—सर्व स्त्रियांचें स्वागत असो. येथें जमलेल्या मंडळीपैकीं पुरुष असो कीं स्त्री असो-जो ह्मणून सुखाचा अनुभव घेणार नाहीं तो माझ्या कृपेस पात्र होणार नाहीं. हें पहा, हें पेय तुमच्या आरोग्यार्थ मी प्राशन करतों.

मोहन—आचार्यमहाराज मोठे उदार आहेत. मी यथेच्छ भोजन करतों, ह्मणजे मला निराळे आभार मानण्याची व बोलण्याची जरूर पडणार नाहीं.

आचार्य—ठीक; मोहनराय, आपल्या जवळच्या लोकांचा समाचार घ्या. या स्त्रिया नीट जेवीत नाहींत, हा कोणाचा दोष, सरदारहो ?

मोहन—उत्तम उत्तम पेयें प्राशन करून त्यांच्या गालांवर अम्मळ लाली चढूं द्या ह्मणजे त्या इतक्या खुष होतील व बोलत सुटतील कीं, तुह्मा आह्मांला अगदीं 'अळीमिळीचेंच' व्रत धरून बसावें लागेल !

पद्मिनी—तुह्मी मोठी मजा करता, मोहनराय.

मोहन—होय, पण माझा खेळ साधेल तर मजा ह्मणायाची. हं, हें मी तुमच्या आरोग्यार्थ पितों, आतां तुह्मी प्या. [आंत वाद्यें वाजतात, व बार सुटतात].

आचार्य—काय, काय तें ?

राव०—पहा, पहा, कोणी पुढें होऊन पहा. [चाकर जातो].

आचार्य—मोठा वीरघोष ऐकूं येतो. हा कशाचा, व कशाकरितां असावा बरें ? स्त्रियानों, तुह्मी भिऊं नका. कसलाही वीर असला तरी तुमच्या केंसाला देखील धक्का लावणार नाहीं. [चाकर परत येतो.]

राव०—काय, काय आहे तें ?

चाकर—कोणी परकी लोक असावेत असें वाटतें. ते नावेंतून उतरून जमिनीवर आले, व कोणी परकीय राजाचे वकील जशा थाटानें यावेत तशा थाटानें ते इकडेच यायला निघाले आहेत.

आचार्य—रावसाहेब, जा त्यांचा आदरसत्कार करा, तुह्माला

उडदू भाषा येत आहेच. जा त्यांचा मानमरातब योग्य रीतीनें ठेवा, व त्यांना या सुंदर समाजांत घेऊन या. जा, कोणी तरी यांच्याबरोबर जा. [रावसाहेब व चाकर जातात. सर्व उठतात व दिवाणखान्यांत जमतात.]

मेजवानीचा विरस झाला; आपण पुनः रंग आणूं. आजची रात्र मोठी सुखाची होवो; मी पुनः एकदां तुमचें सर्वांचें आगतस्वागत करतों.

[वाद्यें वाजतात. पोषाख बदललेला राजा व आणखी १२ असामी व ६ मशालजी, रावसाहेब पुढें, व हे सर्व मागून असे प्रवेश करतात. ते थेट आचार्यापर्यंत जाऊन त्यास नमस्कार करतात.] कोणी तरी मोठ्या घराण्यांतील मंडळी आहे! त्यांची काय मर्जी आहे?

राव—त्यांना मराठी येत नाहीं, परंतु त्यांची आचार्यमहाराजांस अशी विनंति आहे कीं आज रात्रीं या ठिकाणीं मोठमोठी व सुंदर मंडळी जमणार आहे असें ऐकून व रूपवती स्त्रियांचा बहुमान करावा ह्मणून आपण आपआपलीं कामें सोडून मुद्दाम येथें आलों आहोंत; तर या सुंदर समाजांत दाखल होण्याची आपल्याला परवानगी असावी.

आचार्य—रावसाहेब, त्यांना सांगावें कीं त्यांनीं मजवर मोठा अनुग्रहच केला व त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. इच्छेनुरूप या मेजवानीचा स्वीकार करा म्हणून त्यांस प्रार्थना करा. [नाचण्यासाठीं स्त्रिया निवडून काढतात. राजा पद्मिनीला पसंत करतो.]

राजा—अहा, किती सुकुमार हात! आजपर्यंत अशी सुंदर स्त्री मीं कोठेंही पाहिली नाहीं. [बाजा वाजतो व नाचूं लागतात.]

आचार्य—रावसाहेब!

रावसा०—महाराज.

आचार्य—त्यांना माझ्या वतीनें अशी विनंती करा कीं त्यांच्या मंडळींत असा कोणी पुरुष असावा कीं जो या स्थानावर बसण्यास मजपेक्षां अधिक योग्य आहे. हें जर मला कळलें तर मी मोठ्या खुषीनें व मनापासून त्यास या स्थानावर बसवीन.

राव—बरें आहे; मी जाऊन विचारतों. [रावसाहेब मंडळीकडे जाऊन परत येतो.]

आचार्य—काय ह्मणतात ते ?

राव—ते सर्व ह्मणतात कीं असा एक त्यांच्यामध्यें आहे; परंतु त्यांची अशी इच्छा आहे कीं आपण त्या मनुष्यास ओळखून काढावें आणि मग तो हें स्थान घेईल.

आचार्य—मग मला पाहूं या तर ! [आसनावरून खालीं उतरतो] सभ्यगृहस्थ हो, हें पहा या मंडळींत राजेसाहेबाची स्वारी आहे !

राजा—आचार्यमहाराज, तुह्मीं ओळखलेंत. [तोंडावरील बुरखा काढून] फारच नामी समाज ! आपण फार चांगली गोष्ट करता महाराज. तुमची धार्मिक वृत्ति आहे, नाहीं तर तुह्मी असें करतां ह्मणून तुह्मांस मीं दोष दिला असता.

आचार्य—तुमची मर्जी इतकी सुप्रसन्न झाली आहे हें पाहून मला मोठा संतोष होतो.

राजा—रावसाहेब, जरा इकडे या. ही सुंदर स्त्री कोणाची आहे?

राव०—महाराज, रांजणगांवचे सरदार राजा श्यामलालची मुलगी ही राणीसाहेबांच्या सखींपैकीं एक सखी आहे.

राजा—खरोखरी, हें फारच उत्कृष्ट पक्वान्न आहे. हे रूपवति स्त्रिये, तुझ्याबरोबर नृत्य करून तुझा समाचार न घेणें ही सभ्यपणाची रीत नाहीं. मद्याचा पेला चोंहीकडे फिरवा.

आचार्य—सर वासुदेवराव, आंत उपहाराची तयारी आहे ?

सर वासु०—होय महाराज.

आचार्य—महाराज मला वाटतें कीं नाचून नाचून आपलें रक्त तापून गेलें असेल.

राजा—तापून गेलें ? फारच तापलें.

आचार्य—या पलीकडच्या खोलींत ताजी हवा आहे.

राजा—प्रत्येकानें आपआपल्या जोडीदारणीला वाट दाखवावी. हे लावण्यवति जोडीदारणी, मला तुला सोडतां कामा नये. चला

आपण मजा मारूं या—आचार्य मला सर्व स्त्रियांच्या आयुर्वेधनार्थ मद्य प्राशन करूं द्या--व पुनः एकवार नृत्य करूं द्या, आणि मग कोण सुंदर आहे तें पाहूं या. चला, बाजे वाजवा [वाद्यें वाजत वाजत जातात.]

(अंक १ ला, प्रवेश ४ था समाप्त.)

अंक २ रा. (प्रवेश १ ला) रस्ता.

[दोन गृहस्थ प्रवेश करतात. व एकमेकाला भेटतात.]

१ ला गृहस्थ—अहो इतक्या घाईनें कोणीकडे ?

२ रा गृहस्थ—हो, हो बरी गांठ पडली, त्या थोर जहागिरदाराचें-बापूसाहेबाचें-काय झालें हें समजण्यासाठीं मी दरबाराकडे चाललों होतो.

१ ला गृहस्थ-तें तुमचे श्रम मी वांचवितों तर. सर्व कांहीं होऊन चुकलें आहे. आतां फक्त त्या कैद्याला परत आणण्याचा सोहाळा व्हायचा आहे.

२ रा गृ०—तुह्मी तेथें होता काय?

१ ला गृ०—होय, मी होतों.

२ रा गृ०—तर मग सांगा काय काय झालें तें ?

१ ला गृ०—तुह्मी चटदिशीं लक्ष्यांत आणूं शकता?

२ रा गृ०—काय, त्याला दोषी ठरविलें?

१ ला गृ०—होय, आणि त्याला शिक्षाही दिली.

२ रा गृ०— अरेरे, फारच वाईट झालें.

१ ला गृ०—दुसऱ्या पुष्कळांना वाईट वाटलें, त्यांत आणखी तुह्मी एक.

२ रा गृ०—पण सांगा पांहू असें कसें झालें?

१ ला गृ०—मी तें थोडक्यांत तुह्माला सांगतो. त्या जहागिर-

दाराला कोटांत आणलें, व त्याच्यावर जे जे आरोप ठेवण्यांत आले होते त्या सर्वांचा त्यानें निषेध करून कायद्याच्या तडाख्यांत न सांपडावें ह्मणून पुष्कळ वादाविवाद केला; पण सरकारी वकिलानें असा आग्रह धरला कीं निरनिराळ्या साक्षिदारांनीं दिलेल्या जबान्यांचा नीट विचार व्हावा. त्याचा असा आग्रह पाहून त्या जहागिरदारानें असें ह्मटलें कीं त्यांच्या जबान्या माझ्यासमक्ष झाल्या पाहिजेत. तेव्हां त्याचाच कारभारी पुढें आला व त्यानें त्याच्या विरुद्ध साक्ष दिली. पुढें त्याचा खाजानची व कृष्णंभट त्याचा उपाध्या हेही त्याचे विरुद्ध बोलले. शेवटीं तो पिशाच नारायणाचार्य–ज्याचा हा सर्व खेळ–पुढें आला व त्यानेंही त्याच्याविरुद्ध साक्ष दिली.

२ रा गृ०—त्यानेंच खोटीं भाकितें करून बापूसाहेबाला भुरळ पाडली.

१ ला गृ०—तोच तो. या सर्वांनीं बापूसाहेब दोषी आहे असें स्पष्ट सांगितलें. बापूसाहेबानें त्या सर्वांचा प्रतिकार केला असता, पण तें त्याला करतां येईना. आणि ह्मणून जूरीनें या पुराव्यावरून राजद्रोहाचा आरोप त्याच्यावर ठेवला. बापूसाहेबही पुष्कळ बोलले, व मोठ्या मुद्देसूद रीतीनें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. झालाच असल्यास त्याच्यामुळें लोक मात्र हळहळ करूं लागले!

२ रा गृ०—हें सगळें झाल्यावर तो कशा तऱ्हेनें वागला?

१ ला गृ०—शिक्षा ऐकण्यासाठीं पुनः जेव्हां त्याला कोर्टांत आणलें तेव्हां त्याचें अंतःकरण इतकें विव्हळ झालें कीं त्याच्या सर्व अंगाला घाम सुटला व रागाच्या सपाट्यांत घाईघाईनें वेडेवांकडे चार शब्द बोलला. पण इतक्यांत त्याचें मन स्थिर झालें व तो फारच मोठा व अलौकिक धैर्यवान् पुरुष आहे असें दिसून आलें.

२ रा गृ०—मला नाहीं वाटत तो मरणाला भितो.

१ ला गृ०—छेः तो कांहीं स्त्रैण नाहीं. पण अशा कारणांनीं आपला मृत्यु होणार हें पाहून त्याला वाईट वाटतें.

२ रा गृ०—खरोखरी, हें सर्व घडवून आणण्यांत त्या आचार्याचा कांहीं तरी हेतु असावा.

१ ला गृ०—बहुशा असावा असा पुष्कळांचा तर्क आहे. त्यानें प्रथमतः सरदारसिंगाला दोषी ठरवलें व त्याला काढून त्याच्या जागीं सखारामपंताला पाठविलें व तें ही इतक्या घाईनें कीं त्याला आपल्या सासऱ्याला मदत करतां येऊं नये.

१ ला गृ०—या मुत्सद्दीपणाचें बीज मत्सर आहे. तो परत आला ह्मणजे निःसंशय सूड घेईल. एवढें मात्र अगदीं खरें कीं ज्याच्या ज्याच्यावर ह्मणून राजाची मर्जी बसते त्या सर्वांना हा आचार्य कांहीं तरी काम शोधून काढतो, व तेंही राजदरबारापासून दूरच्या पल्ल्यावर असेल तें.

२ रा गृ०—सर्व लोक त्याचा मनापासून द्वेष करतात व अशी इच्छा करतात कीं हे राजश्री समाधिस्थ होतील तर बरें. बापुसाहेब जहागिरदार त्यांचा जीव कीं प्राण आहे. तो मोठा उदार आहे व जणूं काय सद्गुणाची खाणीच आहे!

[चौकशी होऊन बापुसाहेब परत येतो. त्याच्यापुढें फौजदार, व नागव्या तरवारी घेतलेले शिपाई व दोनी बाजूला दोन शिपाई उभे आहेत. सर वासुदेवराव, मोहनराय, व इतर लोक प्रवेश करतात.]

१ ला गृ०—त्या तेथें उभे राहू चला, आणि जो थोर पुरुष अगदीं रसातळाला जाऊन पोंचला असें तुह्मी ह्मणत होता त्याला पाहू या.

२ रा गृ०—चला नीट उभे राहून त्याला पाहू या.

बापु०—सद्गृहस्थहो! तुह्मांस मजविषयीं कळवळा येऊन तुह्मी मजबरोबर एथवर आलां; कृपा करून मी ह्मणतों तें लक्ष्यपूर्वक ऐका, नंतर माझा त्याग करून आपापल्या घरीं जा. मी राजद्रोही ठरून मला त्या अपराधाबद्दल देहांत शासन होणार; असें आहे तरी, ईश्वर सर्वसाक्षी आहे आणि सद्बुद्धीचा लवलेश जरी माझ्यामध्यें अझूनही कायम असेल तर माझ्या शिरावर, कुऱ्हाडीचा घाव पडण्याचा ऐन सुमारास ती मला जाळून भस्म करो! मला देहान्तशासन होणार ह्मणून मी कायद्याला दूषण देत नाहीं, कारण कायद्याकडे काय आहे? जशा तऱ्हेचीं प्रमेयें पुढें मांडून ठेवलीं त्याप्रमाणें मला न्याय मिळाला. मला म्हणायाचें ह्मणून इतकेंच कीं ज्यांचा हेतु मला न्याय

मिळावा असा होता ते अधिक दयार्द्र अंतःकरणाचे असते तर बरें होतें. ते कशाही तऱ्हेचे असोत, मी त्या सर्वांस मनापासून क्षमा करतो. तथापि मला त्यांस एवढेंच सांगावयाचें कीं त्यांनीं कुटाळ्या करण्यांत प्रतिष्ठा मानूं नये व आपल्या दुष्ट मसलतींनीं थोर पुरुषांस त्यांच्या मरणानंतर त्रास देऊं नये. तसें जर ते करणार नाहींत तर माझें निष्कलंक आचरण बोभाटा केल्यावांचून कधींही राहणार नाहीं. या जगांत आणखी कांहीं दिवस रहावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. माझ्या हातून जितके अपराध होतील त्यांच्या शतपट जरी दयेचा सांठा आमच्या राजाच्या दयार्द्र अंतःकरणांत आहे तरी मी आतां या जगांत राहण्याची खटपट करणार नाहीं. तुमच्यापैकीं कांहीं मजवर लोभ करीत होता, इतकेंच नाहीं तर मनाचा मोठा हिय्या करून मजकरितां ढळढळा रडला देखील माझ्या उदार मित्रानों ! तुमचा वियोग मला इतका दुःसह वाटतो कीं तुमचा वियोग होणें आणि मला मरण येणें हीं दोन्ही एकच. माझा अंत होईतोंपर्यंत मजबरोबर देवदूताप्रमाणें या, आणि कुऱ्हाडीचा घाव मजवर पडतो न पडतो तोंच मोठ्या आनंदानें ईश्वरास मजविषयीं प्रार्थना करा व माझ्या आत्म्यास उन्नत पद दे ह्मणून करुणा भाका. चला तर मित्रानों, ईश्वराची लीला अगाध आहे !

सर वासु०—महाराज माझी हात जोडून आपल्यास विनंति आहे कीं जर आपल्या मनांत माझ्याविषयीं राग असेल तर मला मोकळ्या मनानें या वेळेस क्षमा करा.

बापू०—सर वासुदेवराव, मला जसें यावेळीं वाटतें कीं माझ्या अपराधांची सर्वांनीं क्षमा करावी, त्याप्रमाणेंच मीही तुह्मांस क्षमा करतों, व दुसऱ्या सर्वांसही क्षमा करतों. असे कोणीही माझे अपराध केले नसतील कीं त्यांस मी क्षमा करूं शकणार नाहीं. मी मेल्यावर लोकांनीं मी मत्सरी होतों असें ह्मणूं नये. राजाचें मी फार फार स्मरण केलें होतें ह्मणून सांगा. माझ्या संबंधानें जर त्यानें विचारपूस केली तर असें सांगा कीं माझा अंत होईपर्यंत तुह्मी मजजवळ होतां. अझून राजाचा उदय व्हावा ह्मणून मी ईश्वराची प्रार्थना करीन, व

माझा आत्मा या शरीराला सोडून जाईतोंपर्यंत ईश्वराच्या करुणेचा वर्षाव राजावर व्हावा म्हणून मी विनंति करीन. मला सांगण्यास आतां जी थोडी फुरसत आहे तितक्यांत जितके दिवस त्यानें राज्य करावें ह्मणून सांगूं शकेन त्यापेक्षांही जास्त दिवस तो सुखानें राज्य करो ! लोक त्याच्यावर सतत प्रीति करोत ! त्याच्या राज्यव्यवस्थेची सदैव प्रशंसा होवो ! जेव्हां वयातीत होऊन सृष्टिनियमानुसार त्याचा शेवट होईल त्यावेळीं तो अत्युत्तम राज्यकर्ता होता अशी सर्व लोक त्याची वाखाणणी करोत !

सर वासु०—मला तुह्मास नदीच्या तीरापर्यंत घेऊन गेलें पाहिजे. नंतर फौजदारसाहेबांच्या ताब्यांत तुह्मांस जावें लागेल. ते तुह्मांस वध्यस्थानीं घेऊन जातील.

फौज०—अरे, तयार असा, बापूसाहेब येताहेत, होडी तयार असूं द्या. अशा थोर पुरुषास योग्य अशा वस्तूंनीं ती सजवा.

बापू०—नको, नको, सजवणें नको ! ती आहे तशीच राहूं द्या. माझ्या मोठेपणाच्या चिन्हांनीं माझा उपहास मात्र होईल. जेव्हां मी या नगरास प्रथमतः आलों त्यावेळीं " बापूसाहेब जाहगीरदार " अशी पदवी धारण करीत होतों. आतां मी गरीब " बापू " आहें. तथापि माझ्या नीच प्रतिपक्ष्यांपेक्षां व निंदकांपेक्षां अति थोर आहें. सत्य ह्मणजे काय पदार्थ आहे हें त्यांच्या स्वप्नीं देखील नाहीं. हें सत्य माझ्या रक्ताच्या छटांनीं दूषित झालें आहे व त्याचा परिणाम कधींना कधीं तरी असा होईल कीं त्यांस दुःखें भोगावीं लागतील ! माझ्या उदार पित्यानें राज्य बळकावणाऱ्या राजाविरुद्ध आपलें डोकें वर उचललें, व साहाय्य मिळावें ह्मणून आपल्या चाकराकडे धांवत गेला, कारण त्याची तशीच दुःखद अवस्था त्यावेळीं होती, पण त्या अधमानें आपल्या धन्याशीं विश्वासघाताचें वर्तन केलें. याप्रमाणें माझ्या पित्याचा अंत चौकशी वगैरे कांहींएक न होता झाला ! ईश्वर त्याच्या आत्म्यास शांति देवो ! पुढें कांहीं काळानें आपल्या राजेसाहेबाचे वडील राज्यारूढ झाले. माझ्या पित्याचा असा शेवट झाला ह्मणून त्यास मनापासून वाईट वाटलें व अतिशय कळवळा आला. त्या उदरा-

मनाच्या राजानें माझा मोठा बहुमान केला व आमचें घराणें जें अगदीं नष्ट होत चाललें होतें त्यास पुनः उदयास आणलें. आतां त्याच्याच पुत्रानें माझी संपत्ति, माझा नांवलौकिक, माझे प्राण, किंबहुना माझें सर्वस्व कीं ज्याच्या योगानें मला सुखाची प्राप्ति होती—तें सर्व एका क्षणांत हिरावून घेतलें. एवढें खरें कीं माझी चौकशी झाली व असेंही ह्मटलें पाहिजे कीं योग्य तऱ्हेनें झाली. एवढ्यानेंच मी आपल्या हतभाग्य बापापेक्षां किंचित् अधिक सुखी आहें. परंतु माझ्या बापाची व माझी एका गोष्टींत मात्र अगदीं बरोबरी आहे. आह्मी दोघेही, ज्यांच्यावर प्राणांहूनही अधिक प्रीति करीत होतों अशा आमच्या चाकरांच्या हातून स्थानभ्रष्ट झालों. किती अघटित व बेइमानीचें चाकरांचें वर्तन! परंतु असें ह्मणून उपयोग नाहीं. ईश्वराचा असें करण्यांत कांहींना कांहीं तरी हेतु असतो. तथापि मित्रानों! मी मरतां मरतां जो तुह्मांस उपदेश करीत आहे तो लक्ष्य देऊन ऐका व नीट ध्यानांत ठेवा. ज्या ठिकाणीं तुह्मी अत्यंत प्रीति करतां व आपलें मनोगत कळवितां, त्याठिकाणीं बोलतांना फार जपून बोलत जा, कारण ज्यांची ज्यांची मैत्री संपादन कराल, व ज्यांस आपले प्राण अर्पण कराल, ते सर्व, तुमचें दैव तुह्मांस पाठमोरें झालें असें पाहतांच, पाण्याप्रमाणें सोडून जातील, आणि पुनः ते तुमच्या जवळ आलेच तर तुमचा नाश करण्याच्या वेळेला मात्र हजर होतील. हे सद्‌गृहस्थहो! मजविषयीं प्रार्थना करा! माझ्या लांबलचक व कंटाळवाण्या आयुष्याचा शेवटचा क्षण येऊन पोंचला. मला आतां तुमचा निरोप घेतला पाहिजे. या तर आतां. ज्या ज्या वेळेस तुह्मांस एखाद्या दुःखाच्या प्रसंगाचें वर्णन करण्याची पाळी येईल त्यावेळीं माझें पतन कोणत्या रीतीनें झालें याचाही उच्चार करा. झालें, मला जें सांगायाचें होतें तें सर्व संपलें—ईश्वर मला क्षमा करो ह्मणजे झालें! (बापूसाहेब व त्याबरोबरची मंडळी जातात).

१ ला गृ०—अरेरे, हा वृत्तान्त गहिवर आणणारा आहे. ज्यां-

नीं ज्यांनीं या जहागिरदाराचा नाश व्हावा ह्मणून खटपट केली असेल त्यांच्यावर शापांचा वर्षावच होईल !

२ रा गृ०—हा जर खरोखरीच निरपराधी आहे तर त्याचें फारच हाल झाले यांत संशय नाहीं. मी तुह्मांला आणखी एका गोष्टीची खबर देतों, ती जर घडून आली तर ती यापेक्षांही अधिक दुःखप्रद आहे.

१ ला गृ०—असें आहे तर ती न घडून येईल तर बरें. ती आहे तरी काय ? मजवर तुमचा बेभरवसा तर नाहींना ?

२ रा गृ०—ही गोष्ट इतकी महत्त्वाची आहे कीं ती अगदीं बाहेर फुटतां कामा नये.

१ ला गृ०—सांगा, मला सांगा; मी पुष्कळ बोलणारा नाहीं.

२ रा गृ०—मला तुमचेबद्दल खात्री आहे, ह्मणून ती मी तुह्मांला सांगणारही. राजा राणीचा घटस्फोट करणार असा बूट निघाला आहे, तो तुमच्या कानीं पडला नाहीं काय ?

१ ला गृ०—होय, पण त्या बातमींत तथ्य नाहीं, कारण जेव्हां ही गोष्ट राजाच्या कानीं आली तेव्हां त्याला अतीशय राग येऊन त्यानें कोतवालास अशी सक्त ताकीद दिली कीं ही बातमी ताबडतोब बंद करावी आणि जे कोणी ही गोष्ट बोलतील त्यांचीं तोंडें बंद करून टाकावीं.

२ रा गृ०—पण तीच बातमी खरी असें आतां सर्व लोक ह्मणू लागले. कारण पहिल्यापेक्षांही अधिक जोरानें त्याबद्दल पुकारा झाला आहे आणि असेंही खात्रीपूर्वक म्हणतात कीं राजा तसें करणारच. आचार्यानें, अथवा राजाजवळ असणाऱ्या दुसऱ्या कोणीं, केवळ द्वेषबुद्धीनें राणीसंबंधानें राजाचें कान फुंकले व तिचा आतां नाश होणार. नुकतेच श्रीनिवासाचार्यही येथें आले आहेत, यावरून तर ही गोष्ट अगदीं खरी असें सिद्ध होतें; कारण सगळ्यांच्या मतें ते याच कामाकरितां आले असें आहे.

१ ला गृ०—अरे, हें सर्व त्या आचार्याचें कृत्य. त्या वादग्रहानें

या आचार्यांनें इच्छिलेली अधिकाराची जागा दिली नाहीं ह्मणन त्याचा सूड उगवावा या हेतूनें ही तजवीज केली.

२ रा गृ०—मला वाटतें तुह्मी ह्मणता हें अगदीं बरोबर आहे. पण याचें प्रायश्चित्त राणीला भोगावयाला लावावें हा क्रूरपणा नव्हे काय ? पण तो आचार्य आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडवून आणणार व राणीचा नाश होणार !

१ ला गृ०—अरेरे, फारच वाईट. आपण अशा गोष्टी सडकेवर बोलत आहोंत हें चांगलें नाहीं. चला, एखाद्या निवांत ठिकाणीं जाऊन याबद्दल आणखी बोलूं. [जातात.]

अंक २ रा. (प्रवेश २ रा.)

राजवाड्यांतील एक महाल.

(रावसाहेब पत्र वाचीत प्रवेश करतात.)

राव०—

" विनंती विशेष–तुह्मीं मागविलेलीं घोडीं मी स्वतः निवडून काढलीं, त्यांवर स्वारी करून पाहिली, व त्यांच्या सामानाची व्यवस्था केली. तीं छानदार, तरुण, व उत्तरेकडील उत्तम जातीपैकीं होतीं. मी त्यांस विजयपुरीस पाठविणार इतक्यांत आचार्यांचा एक माणूस आला व त्यानें तीं बळजबरीनें मजजवळून घेतलीं; आणि असें ह्मणाला कीं राजेसाहेबाच्या आधीं नाहीं तरी एखाद्या प्रजाजनाच्या आधीं आमच्या मालकास असलीं घोडीं असलींच पाहिजेत. तो असें बोलल्यावर मग आमचीं तोंडेंच बंद झाली. कळावें. "

मला वाटतें कीं तो घेईलच. असो घेऊं द्या त्याला. मला वाटतें तो सगळें घेईल !

[नानासाहेब व तात्यासाहेब प्रवेश करतात]

नाना०—बरी गांठ पडली, रावसाहेब.

राव०—तुह्मा दोघांनाही नमस्कार.

तात्या०—राजेसाहेब काय करीत आहेत ?

राव०—ते एकटेच आहेत, पण त्यांचें मन स्वस्थ नाहीं.

नाना०—कारण ?

राव०—आपल्या भावाच्या बायकोशीं आपण लग्न लावलें ही गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली आहे असें मला वाटतें.

तात्या०—नाहीं हो, त्यांचें मन दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर जडलें आहे !

नाना०—असें खरें; हें त्या आचार्याचें, राजाच्या आचार्याचें कृत्य. हा अंध आचार्य, लक्ष्मीच्या ज्येष्ठ पुत्राप्रमाणें, मनास वाटतील त्या उलाढाली करतो. पण राजाला एखाद्या दिवशीं तरी याचा खरा स्वभाव कळून येईल.

तात्या०—ईश्वर करो आणि तसेंच होवो, तसें झाल्याशिवाय तो आपल्या स्वतःला ओळखणार नाहीं.

नाना०—प्रत्येक कृत्यांत त्याचें आचरण किती शुद्ध ह्मणून सांगूं! व तें तरी किती धार्मिकतेचें ! आमच्यामध्यें व राणीचा पुतण्या जो वादशहा यांच्यामध्यें जो तहनामा झाला होता तो मोडून टाकून त्यानें आपला अम्मल थेट राजाच्या अन्तःकरणापर्यंत नेऊन पोहोंचविला, व तेथें त्याच्या लग्नासंबंधानें नानाप्रकारच्या भीति, शंका, संकटें व निराशा हीं पसरून दिलीं. नंतर राजानें या संकटांतून पार पडावें ह्मणून त्यास घटस्फोट करण्याचा सल्ला दिला. घटस्फोट तरी कोणत्या स्त्रियेचा ? जी आज वीस वर्षें राजाच्या गळ्याभोंवतीं एखाद्या दैदीप्यमान रत्नाप्रमाणें लपेटून राहून जिच्या कांतीचा लवलेशही कमी झाला नाहीं, जिनें देवदूत सज्जनांवर ज्याप्रमाणें प्रेमाचा वर्षाव करितात त्याप्रमाणें आजपर्यंत आपल्या पतीवर प्रीतीचा वर्षाव केला, व कालगतीनें अगदीं निकृष्ट स्थितींत जाऊन पोंचली तरी जी सदैव राजाचे अभीष्टचिंतन करीत राहील तिचा ! सांगा हा सर्व धार्मिकपणा आहे कीं नाहीं ?

राव०—देव करो आणि अशा मनुष्याच्या सल्लामसलतीची मला कधींही गरज न पडो ! तुह्मी ह्मणतां तें अगदीं खरें आहे. ही बातमी अगदीं सगळ्या गांवभर पसरली आहे. प्रत्येकाच्या तोंडीं हाच

मजकूर. प्रत्येक चांगल्या माणसाला वाईट वाटतें. ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून या गोष्टीचा नीट विचार करून पाहिला आहे त्यांना याचें मुख्य बीज राजाचें लग्न विदर्भदेशच्या राजाच्या बहिणीशीं व्हावें हें आहे हें तेव्हांच दिसून येईल. राजाला या उद्धट व वाईट मनुष्यासंबंधानें अगदीं गाढ निद्रा लागली आहे. पण एखादे दिवशीं तरी देवें त्यास जागें करील !

तात्या०--आणि तुह्मांआह्मांला त्याच्या दास्यत्वांतून मुक्त करील.

नाना०—आपली सुटका होण्यासाठीं आपल्याला ईश्वराची मनापासून प्रार्थना केली पाहिजे—नाहींतर हा उद्धत पुरुष आपल्याला रावाचे रंक करून टाकील. सर्व लोकांच्या सन्मानाच्या राशीचा ढीग याच्यापुढें आहे व त्याला वाटेल तो आकार तो त्याला देतो.

तात्या०—मला तो आवडत नाहीं, व त्याची भीतिही वाटत नाहीं. मला या स्थितींत येण्यास त्याची कधींही जरूर पडली नाहीं, व राजाच्या कृपेनें मी अशाच स्थितींत राहीन. त्याचे आशीर्वाद व शाप हीं दोन्ही मला सारखींच आहेत. या दोहोंवरही माझा भरंवसा नाहीं. तो मला पूर्वींहि माहित होता व आतांही माहीत आहे. ह्मणूनच ज्या जगद्गुरूच्या कृपेनें तो इतका उन्मत्त झाला तोच त्याचें काय पारिपत्य करील तें करील.

नाना०—चला आपण आंत जाऊं आणि दुसरें कामकाज काढून ज्या विचारांनीं राजाचें मन इतकें उद्विग्न झालें आहे ते विचार त्याच्या मनांतून काढून टाकूं. तुह्मी माझ्या बरोबर येताना ?

राव०—मला माफ करा; मला राजेसाहेबांनीं दुसरें कांहीं काम सांगितलें आहे. शिवाय यावेळीं राजेसाहेबांला त्रास देणें हें योग्य नाहीं.

नाना०—बरें आहे. (रावसाहेब जातात.)

[नानासाहेब दरवाजा थोडा उघडतो. राजा बसलेला आहे व मोठ्या विचारयुक्त मुद्रेनें कागद वाचीत आहे.]

तात्या०—त्याचा चेहरा किती चिंताक्रान्त दिसतो ! खरोखरी त्याच्या मनाला फार दुःख होत असावें.

राजा—अरे ! कोण आहे ? हं:

नाना०—राजेसाहेब न रागावोत ह्मणजे झालें !

राजा—अरे कोण आहे ? कोण ? मी एकांतांत विचार करीत बसलों असतां कोण आला आहे येथें ? मी कोण आहें ? हं:

नाना०—राजाधिराज, आपण फार दयाळू अहांत, व सर्व अपराधांची क्षमा करण्यास समर्थ आहांत. मत्सरबुद्धीनें आह्मी येथें आलों नाहीं. सरकारी कामाकरितां व सरकारचा हुकूम घ्यावा ह्मणून आह्मी येथें आलों आहोंत.

राजा—तुह्मी फार धीट आहां. जा. तुह्मांला सरकारी कामाची वेळ कोणती हें मला शिकविलें पाहिजे. ही सरकारी कामाची वेळ ! हं:

(गुंडाचार्य, व श्रीनिवासाचार्य प्रवेश करतात.)

कोण आहे तें ? आचार्यमहाराज ! माझ्या दुखावलेल्या मनाचें शांतिस्थान. राजाच्या दुःखाला बरें करणारें औषध तुह्मीच-या, तुमचें स्वागत असो.

(श्रीनिवासाचार्यांस.)

हे विद्वन्मणि आचार्या, तुमचेंही स्वागत असो. मी व माझें राज्य हीं तुमच्या सेवेंत तत्पर आहेत. (गुंडाचार्यास.)

महाराज ! मी बोलतों अशी व्यवस्था ठेवा, नाहीं तर मीं व्यर्थ बडबड केली असें होईल.

गुंडा०—नाहीं, असें कां होईल. आपण आमच्याशीं एक तासभर एकांत करावा अशी आमची इच्छा आहे.

राजा—(नानासाहेब व तात्यासाहेब यांस) आम्ही आतां कामांत आहों, जा.

नाना०—या आचार्याला गर्व ह्मणून नाहींच ?

तात्या०—ह्मणण्यासारखा नाहीं. त्याची जागा जरी मला दिली तरी मी त्यासारखा वागणार नाहीं. पण हें कांहीं फार दिवस टिकणार नाहीं.

(एकीकडे.)

नाना०-जर अशीच स्थिति राहिली तर मी एकदां प्रयत्न करणार. } (एकीकडे).

तात्या०—मीही एकदां करीन.

[नानासाहेब व तात्यासाहेब जातात.]

गुंडा०—आपल्या मनांतील शंका मोकळ्या मनानें आपण धर्मसभेपुढें मांडल्या व त्यांचा विचार घेतला येवढ्यानें आपण इतर राजपुत्रांपेक्षां विशेष दूरदर्शीपणा दाखविला. आतां आपल्यावर कोण रागावणार आहे ? कोण मत्सरभाव प्रगट करील ? जर त्यांच्या अंगीं कांहीं भलेपणा असेल तर खुद्द राणीच्या नातलगांनींही असें ह्मटलें पाहिजे कीं या वादाची चौकशी मोठ्या निःपक्षपातानें झाली. निरनिराळ्या राष्ट्रांतील सर्व विद्वान् धर्माधिकाऱ्यांचीं स्वतंत्र मतें आपण गोळा केलीं, व मुख्य पीठास निमंत्रण केल्यावरून श्रीनीं या अति विद्वान्, निःपक्षपाती, श्रेष्ठ आचार्यांस आपलें मत कळविण्यासाठीं आपलेकडे पाठविलें असून हे येथें हजर झाले आहेत.

राजा—यांचें आगत स्वागत मी आणखी एकवार करतों. जशा मनुष्याची या कामीं योजना व्हावी ह्मणून माझी इच्छा होती तशाच मनुष्याची योजना धर्मसभेनें केली ह्मणून मी तिचा फार आभारी आहें.

श्रीनिवास०-आपण इतके योग्य आहां कीं सर्व परकीयांच्या प्रीतीस पात्र आहां. श्रींची आज्ञा मी आपल्यास निवेदन करतों. आचार्य, या वादाचा विचार योग्यरीतीनें व निःपक्षपातानें व्हावा ह्मणून तुह्मींही याकामीं मला साहाय्य करावें अशी श्रींची आज्ञा आहे.

राजा—अशीं दोन निःपक्षपाती माणसें ! आपण कोणत्या कारणाकरितां येथें आलां हें राणीला कळवलें पाहिजे. गोवर्धनराय कोठें आहे ?

गुंडा०—महाराज आपलें राणीसाहेबांवर अत्यंत प्रेम आहे. हें मला ठाऊक आहे, ह्मणून राणीसाहेबांपेक्षां कमी दर्जाच्या स्त्रीनेंही कायदेशीर रीतीनें ज्याकरितां आपणास विनंती केली असती अशा गोष्टीची मदत—ह्मणजे राणीसाहेबांच्यातर्फे वादविवाद करण्याची विद्वान् लोकांस परवानगी-देण्याचे आपण नाकारणार नाहींत अशी आशा आहे.

राजा—अलवत्–तिला उत्तम उत्तम लोकांची मदत मिळेल व जो तिच्यातर्फे उत्तम रीतीनें वादविवाद करील तो आमच्या प्रीतीस पात्र होईल. आचार्य, माझ्या नव्या चिटनिसाला–त्या गोवर्धनरायला–बोलवाहो. फारच चांगला माणूस ! [गुंडाचार्य जातो] [गुंडाचार्य व गोवर्धनराय प्रवेश करतात.]

गुंडा०—तुझ्यावर सुखाची व आनंदाची वृष्टि होवो. तूं तर आतां खुद्द राजेसाहेबांचा माणूस!

गोवर्ध०—परंतु ज्यांच्या कृपेनें मला हें पद प्राप्त झालें त्यांचे आज्ञेबाहेर मी कधींही जावयाचा नाहीं.

राजा—गोवर्धनराय ये, जरा इकडे ये. (एकीकडे जाऊन बोलतात.)

श्रीनिवासाचार्य—या मनुष्याच्या जागेवर पूर्वीं डाक्टर प्रियालाल नांवाचा मनुष्य होता नाहीं ?

गुंडा०—होय, होता.

श्रीनि०—तो विद्वान् ह्मणून त्याची ख्याति होती नाहीं ?

गुंडा०—होय, होती.

श्रीनि०—तर मग मी सांगतों त्यावर भरंवसा ठेवा; तुमच्यासंबंधानें थोडा लोकापवाद आहे.

गुंडा०—काय, माझ्यासंबंधानें ?

श्रीनि०—तुह्मी त्याचा मत्सर करीत होतां, येवढेंच ह्मणून लोक राहिले नाहींत. ते असेंही ह्मणतात कीं तो मोठा सद्गुणी होता, आणि त्याचा उदय होईल अशी तुह्मास भीति पडल्यावरून तुह्मी त्यास नेहेमीं दूर देशीं पाठवीत होतां. यामुळें त्यास वेड लागलें व पुढें तो मेलाही !

गुंडा०—ईश्वर त्याच्या आत्म्यास शांति देवो. हें सद्गुणाचें फळ! जिवंतपणीं जे कुरकुर करतात त्यांच्या शिक्षेचीं स्थानें आहेत. तो मूर्ख होता. सद्गुणानें वागेन असाच त्याचा आग्रह असे. हा भला मनुष्य मी सांगेन तें ऐकतो. याच्याशिवाय मी दुसऱ्या कोणालाही जवळ

येऊं द्यावयाचा नाहीं. आचार्य, हलक्या प्रतीच्या लोकांनीं आम्हांस धाकांत ठेवावें हें आम्ही तरी होऊं देणार नाहीं!

राजा—हें राणीस मोठ्या मर्यादेनें नेऊन दे (गोवर्धनराय जातो). अशा विद्वान् लोकांच्या वादविवादाला योग्य जागा म्हटली म्हणजे " नीलोद्यान " आहे, तर तेथें तुम्ही या महत्वाच्या गोष्टींचा विचार करण्याकरतां जमा. गुंडाचार्य, तुम्ही तेथील सर्व व्यवस्था नीटनेटकीं ठेवा. अशा सद्गुणी स्त्रियेचा त्याग करतांना कोणत्या सभंजस पुरुषास दुःख होणार नाहीं ? परंतु मन-मन-तें एक मोठें नाजुक स्थान आहे, आणि मला तिचा त्याग केलाच पाहिजे ! (सर्व जातात).

प्रवेश ३ रा.

राणीच्या वाड्यांतील एक दिवाणखाना.

(पद्मिनी व एक वृद्ध स्त्री प्रवेश करतात).

पद्मिनी—नाहीं, तेवढ्याकरितां देखील नाहीं. हाच तो दुःखाचा कांटा–ती राजेसाहेबांजवळ आज इतके दिवस राहून तिचें असें व्हावें—आणि ती तरी किती तरी सज्जन, तिच्याविरुद्ध ' ब्र ' देखील काढण्याची कोणाची छाती नाहीं. तिनें कधीं कोणाचें वाईट म्हणून केलेंच नाहीं. अरेरे, आज इतकीं वर्षें सुखांत घालविल्यानंतर तिला आतां जा म्हणून सांगावें ! ही सुखें प्रथमतः प्राप्त होतांना तिला जितकें बरें वाटलें असेल त्याच्या हजारपटीनें तिला आतां दुःख होत असेल ! ह्या दुःखानें एखाद्या राक्षसाच्या मनाला देखील पाझर फुटेल !

वृद्ध स्त्री—पाषाणहृदयाच्या माणसांला देखील वाईट वाटतें, व त्यांचीं अंतःकरणें विरघळून जातात!

पद्मिनी—ईश्वरी इच्छा ! तिला हीं सुखें कधीं न मिळती तर बरें होतें. दुर्दैवाच्या कुऱ्हाडीचा घाव पडून तिच्या सुखाचा ज्यावेळीं अंत होईल तेव्हां गळा कापला असतां मनुष्याला ज्या वेदना होतात त्यांच्याहीपेक्षां अधिक वेदना तिला होतील!

वृद्ध स्त्री—हरहर! ती पुनः आतां परकी स्त्री होणार!

पद्मिनी—आणि ह्मणूनच तिच्याबद्दल अधिक वाईट वाटलें पाहिजे. खरेंच गरीब स्थितींत उत्पन्न होऊन सुखासमाधानानें राहावें हें अशा सोनेरी दुःखापेक्षां फार चांगलें.

वृद्ध स्त्री—समाधानवृत्तीसारखी दुसरी संपत्ति नाहीं.

पद्मिनी—मी नाहीं राणी होऊं इच्छित बाई!

वृद्ध स्त्री—कांहींही होवो, मी तर होणार. मी खरेंच सांगतें कीं इतका दांभिकपणा करूनही तूं होशील. स्त्रियांना शोभणारें सौंदर्य तुझ्या अंगीं आहे व बायकांचें मन जसें असतें तसेंच तुझेंही आहे. बायकांना नेहेमीं वाटत असतें कीं उच्चपद असावें, संपत्ति असावी, राज्यपद असावें, आणि खरेंच ह्मटलें तर हीं सारीं सुखें आहेत. तुझें कोंवळें मन आतां जरी नको नको ह्मणत आहे आणि आकुंचित झालें आहे तरी त्याला जेव्हां वाटेल तेव्हां तें त्या सर्व गोष्टींचा स्वीकार करील व मोठें विस्तृतही होईल!

पद्मिनी—छेः तसें नाहीं होणार.

वृद्ध स्त्री—होय, होणार, तूं राणी होऊं इच्छित नाहींस?

पद्मिनी—नाहीं, जगांतली सगळी संपत्ति जरी मला दिली तरी देखील मी होणार नाहीं.

वृद्ध स्त्री—फारच विलक्षण. मी जरी ह्मातारी झालें आहे तरी मला जर कोणी राणी केलें तर मी मोठ्या खुषीनें होईन. बरें तुला 'जाहगीरदारणीचा' मान दिला तर? तें ओझें सहन करण्याची शक्ति आहे काय?

पद्मिनी—नाहीं.

वृद्ध स्त्री—तर तूं फारच अशक्त आहेस. बरें त्यांतलें थोडें ओझें कमी केलें तर? अरे हिच्या गालावर लाली चढली? मी कांहीं 'मानकरी' होऊन तुझ्या वाटेंत येत नाहीं!

पद्मिनी—हें काय बोलतेस तूं? मी पुनः एकवार सांगतें कीं सगळें जग जरी मला दिलें तरी मी राणी होऊं इच्छित नाहीं.

वृद्ध स्त्री—सगळें जग कशाला? नुसता आपला देश दिला

तरी तूं राणी होशील. मी देखील होईन, मला कोणी एक सुभा, फक्त एक सुभा दिला तर. पहा, कोण आलें आहे तें ? (रावसाहेब प्रवेश करतात.)

रावसा०—काय बायानों, तुमची गुप्त मसलत आह्मांला कळण्यासारखी आहे काय?

पद्मिनी—तुह्मी सांगा ह्मणून ह्मणण्याजोगें तिचें महत्व नाहीं. आमच्या मालकिणीबद्दल आह्मी हळहळ करीत होतों.

राव०—चांगल्या स्त्रियांस योग्य अशाच सौम्य कामांत तुह्मी गुंतलां होतां. या गोष्टीचा शेवट चांगला होईल अशी आशा आहे!

पद्मिनी—तथास्तु. ईश्वर करो आणि तसेंच होवो !

राव०—तुमचें अंतःकरण फार कोंवळें आहे आणि ईश्वर अशाच प्राण्यावर सुखांचा वर्षाव करतो. मी हें अगदीं मनापासून बोलतों. राजेसाहेबांनीं तुमच्या सद्‌गुणांची पारख केली हें तुह्मास कळावें ह्मणून माझा हातीं असा निरोप पाठविला आहे कीं, त्यांनीं ' पातूरची ' जाहगीर देऊन तुमचा बहुमान केला. वर्षाचें १५००० रुपयांचें उत्पन्न, शिवाय तुमचा सगळा खर्च सरकारांतून!

पद्मिनी—राजेसाहेबांचे आभार मी कोणत्या तऱ्हेनें मानूं हें मला सुचत नाहीं. माझ्याजवळ कांहीं नाहीं, परंतु आहे त्यापेक्षांही जरी मजजवळ पुष्कळ असतें व तें सर्व अर्पण केलें असतें तरी तेंही शून्यवत्‌च. मी स्तुति करीन ह्मटलें तर तिच्या अंगींही तितकी योग्यता नाहीं. माझ्या इच्छा ह्मणजे पोकळ डौल. तथापि चांगल्या इच्छा, व राजेसाहेबांबद्दल ईश्वराची स्तुति याशिवाय मी दुसरी कोणती भेट पाठवूं ? कृपा करून राजेसाहेबांस माझ्यावतीनें असें कळवा कीं ही लज्जावनत झालेली दासी तुमच्या सेवेंत तत्पर आहे व तुमचे फार फार आभार मानून तुमच्या आयुरारोग्याची वृद्धि व्हावी व तुमच्या राज्याचा उत्कर्ष व्हावा ह्मणून ईश्वराची प्रार्थना करत्ये!

राव०—बाईसाहेब, तुमच्याबद्दल राजेसाहेबांचें जें चांगलें मत आहे तें दृढ होईल अशीच मी तजवीज करीन. (एकीकडे) आतां मी हिला पूर्ण तऱ्हेनें जाणतों. हिच्या सौंदर्यानें राजाचें मन वेधून

गेलें आहे. कोणास ठाऊक हिच्याच पोटीं असा एखादा दैदीप्यमान् पुतळा होईल कीं ज्याचें तेज या सर्व राष्ट्रावर पसरेल ! (उघडपणें) मी राजेसाहेबांकडे जाऊन तुह्माला निरोप पोंचता केला असें कळवितों.

पद्मिनी—ठीक आहे, महाराज. [रावसाहेब जातात]

वृद्ध स्त्री—हें पाहिलें, असें असतें. मी आज १६ वर्षें या दरबारांत आहें. इतकें होऊनही आपली गरीब मानकरीण. जेव्हां जेव्हां एखादी ' पदवी ' रिकामी होते, तेव्हां मी फार आधीं तरी जाऊन पोंचतें, नाहीं तर फार उशीरानें तरी; पण अगदीं वेळेवर पोंचलें असें कधीं झालें नाहीं. हें पहा नशीब ! तूं अगदीं नुकती आलीस, आणि लक्ष्मी आपली घर बसल्या तुझ्या घरीं चालत येते. तोंड उघडण्यापूर्वीं घास आपला तयार !

पद्मिनी—मलाही याचें मोठें आश्चर्य वाटतें !

वृद्ध स्त्री—कसें वाटतें आतां ? अगदीं कडूना ? दहा रुपयांची पैज मारतें. एक जुनी गोष्ट आहे. एक बाई होती व ती ह्मणाली कीं मला मिसरदेशांतली सर्व संपत्ति दिली तरी मी राणी होणार नाहीं. ती गोष्ट तुला ठाऊक आहे काय ?

पद्मिनी—पुरे, मोठी मजा करत्येस तूं.

वृद्ध स्त्री—मी तुझ्या स्थितीत असतें तर राजहंसापेक्षांही अधिक उंच भरारी मारली असती. " पातुरची जाहगिरदारीण, "वर्षाचें १५००० रुपयांचें उत्पन्न; हा फक्त बहुमान, उपकार बिपकार नव्हे. मी खात्रीनें सांगतें कीं तुझें दैव आणखी फळफळणार. सुदैव कधीं एकटें येत नाहीं. मला वाटतें, आतां जहागिरीचा बोझा सोसण्याचें सामर्थ्य तुझ्या आंगीं आलें आहे. सांग, तूं होतीस त्यापेक्षां अधिक बळकट झालीस कीं नाहीं ?

पद्मिनी—बाई तुला वाटतील तशा मौजा मार, पण मला मोकळी सोड. यामुळें माझ्या वागणुकींत जर रतिभर अंतर पडलें तर मी या जगांत न जगलें तर बरें. आतां यापुढें काय होईल याचा विचार देखील मला करवत नाहीं. राणीचें मन अस्वस्थ आहे; आपल्याला इकडे येऊन फार वेळ झाला व आपण अगदीं विसरून

गेलों. कृपा करून तूं येथें काय ऐकलेंस त्याचा उच्चार तिच्याजवळ करूं नकोस !

वृद्ध स्त्री—तूं मला काय समजलीस ?

[जातात.]

प्रवेश ४ था.

नीलोद्यानांतील दिवाणखाना.

[तुताऱ्या व शिंगें वाजतात. चांदीच्या काठ्या हातांत घेऊन दोन भालदार प्रवेश करतात, मागून शुभ्र पोषाख केलेले दोन कारकुन, नंतर विजयनगरीचा धर्माध्यक्ष एकटाच, व मागून आणखी ४ धर्माध्यक्ष, नंतर शिक्कामोर्तब घेतलेले दोन गृहस्थ, नंतर गुंडाचार्य व श्रीनिवासाचार्य व नंतर दोन सरदार हे प्रवेश करतात.] [नंतर राजा, राणी व त्यांचा परिवार प्रवेश करतात.] [राजा उच्चस्थानीं बसतो, दोघे आचार्य न्यायाधीश या नात्यानें त्याच्या जवळच बसतात. राणी राजापासून कांहीं अंतरावर बसते. न्यायाधीशांच्या प्रत्येक बाजूस दोन दोन धर्माध्यक्ष बसतात, व त्यांच्याजवळ कारकुन बसतात. सरदार धर्माध्यक्षांच्या जवळच बसतात. भालदार व इतर नौकर आपआपल्या दर्जाप्रमाणें रंगभूमीवर उभे राहतात.]

गुंडा०—जगद्गुरूचें आज्ञापत्र वाचतांना जिकडे तिकडे शांतता असूंद्या.

राजा—त्याची काय जरूरी आहे आतां ? तें एकदां प्रसिद्धपणें वाचून दाखविलें आहे व सर्वांस मान्यही झालें आहे. उगीच वेळ कां घालवितां ?

गुंडा०—बरें, पुढें.

कारकुन—राजेसाहेबानीं दरबारांत यावें ह्मणून विनंती करा.

भालदार—[त्याप्रमाणें करतो.] राजेसाहेबानीं दर०

राजा—हा मी येथें आहें.

कारकुन—राणी पद्मावतीनीं दरबारांत यावें ह्मणून विनंती करा.

भालदार—राणी पद्मावतीनीं दरबारांत यावें.

[राणी उत्तर देत नाहीं; आपल्या खुर्चीवरून उठून दरबारांत इकडे तिकडे फिरते, राजापाशीं येते व त्याच्या पायाशीं गुडघे टेंकून बसते, नंतर बोलूं लागते.]

राणी—महाराज, आपण माझ्याशीं योग्य तऱ्हेनें आणि न्यायानें वागाल, व मजवर दया कराल अशी मी आशा करितें. कारण मी अत्यंत गरीब स्त्री आहें. माझी जन्मभूमि आपल्या राज्याच्या बाहेर आहे व या ठिकाणीं मी अगदीं परकी आहें. येथें माझा न्याय निवडणारा कोणी निःपक्षपाती न्यायाधीश नाहीं. तसेंच माझ्याशीं मित्रत्वाचें वर्तन ठेवलें जाईल अशाबद्दलची खात्रीही नाहीं. शिव शिव, मीं कधीं तरी तुह्मांस दुखवलें आहे काय ? माझ्या वागणूकींत असें काय दृष्टीस पडलें कीं त्यामुळें तुमची इतराजी व्हावी, तुह्मीं मला आपल्यापासून दूर करावें, व तुमचें मजवरचें सर्व प्रेम नाहींसें व्हावें? मी तुमची पत्नी या नात्यानें सदासर्वकाळ खरेपणानें व नम्रतेनें वागलें कीं नाहीं याला एक परमेश्वर साक्षी आहे. नेहेमीं तुमच्या मर्जीप्रमाणें वागलें, व तुमचा रोष होईल अशी मीं भीति बाळगली; इतकेंच नाहीं, तर तुह्मांला सुख अथवा दुःख होई त्याप्रमाणें मींही सुख अथवा दुःख प्रगट केलें. कोणत्या प्रसंगीं मी तुमच्या इच्छेच्या विरुद्ध गेलें, अथवा तुमची जी इच्छा तीच माझी इच्छा असें दाखविलें नाहीं ? असा कोणता तुमचा मित्र आहे कीं तो माझा शत्रु असें मला माहीत असूनही त्यावर मीं प्रीति केली नाहीं. माझ्या मित्रावर तुमचा रोष झाला आहे असें कळतांच त्याच्याशीं मी स्नेहभावानें वागलें नाहीं इतकेंच नाहीं तर त्याला मीं घरांतून मुद्दां घालवून दिलें. महाराज, मीं सारखीं वीस वर्षें याप्रमाणें तुमची पत्नी या नात्यानें मनोभावानें सेवा केली, व मला पुष्कळ मुलेंही झालीं; इतक्या अवकाशांत माझ्या अब्रूस बट्टा आणणारी, माझ्या पत्नीधर्माचा नाश करणारी, तुमच्या पवित्र देहावर जी मी प्रीती करीत होते तिचा अंत करणारी व माझ्या कर्तव्यकर्माला कालिमा आणणारी अशी एक जरी गोष्ट तुह्मीं ऐकली असेल, अथवा तुह्मांला सिद्ध करून दाखवितां येईल, तर तुह्मी मला घराबाहेर घालवून द्या. लोक माझा अत्यंत ति-

रस्कार करोत व मला अत्यंत तीक्ष्ण वेदना देणाऱ्या न्यायदेवतेच्या स्वाधीन करा. महाराज, तुमचे पिते अत्यंत न्यायी व दूरदर्शी राजे होते; त्यांची विद्वत्ता व बुद्धिमत्ता अलौकिक होती; त्याप्रमाणेंच माझा बापही त्या देशांत होऊन गेलेल्या शहाण्या राजांत अत्यंत शहाणा होता. त्यांनीं सर्व राष्ट्रांतील विद्वान् लोक जमा करून या गोष्टीची पूर्ण वाटाघाट करून आपलें लग्न सशास्त्र आहे असें ठरविलें, आणि ह्मणून आतां त्यासंबंधानें शंका घेणें अगदीं अप्रशस्त आहे. म्हणून मी प्रार्थना करतें कीं मला माझ्या वडिलांच्या देशांतील लोकांची संमति व सल्ला मिळेपर्यंत तुह्मी माझा छळ होऊं देऊं नका. ही विनंति जर आपल्यास मान्य नसेल तर आपण आपल्या इच्छेप्रमाणें करण्यास मुखत्यार आहांत !

गुंडा०—राणीसाहेब, तुह्मी ज्यांस पसंत कराल असे हे विद्वान् व पवित्र आचार्य तुह्मांजवळ आहेत. हे विद्वान् व फारच प्रामाणिक आहेत इतकेंच नाहीं, तर या देशांतील निवडक लोकांपैकीं हे असून तुमच्यावतीनें वादविवाद करावा म्हणून येथें जमले आहेत. ह्मणून या चौकशीचें काम यापुढें कांहीं दिवस तहकूब ठेवणें अगदीं अयोग्य आहे; कारण तसें केल्यानें तुमच्या मनाला शांति प्राप्त होणार नाहीं व राजाच्या मनांतील किंतूही दूर होणार नाहीं.

श्रीनिवासाचार्य—यांनीं ह्मटलें हें अगदीं योग्य आहे, आणि ह्मणून या गोष्टीचा विचार करावयास लागणें व विलंब न करतां निरनिराळ्या मुद्याची वाटाघाट करणें व दोन्ही पक्षांचें ह्मणणें ऐकून घेणें हें अगदीं रास्त आहे.

राणी—गुंडाचार्य, माझें ऐका.

गुंडा०—काय आज्ञा आहे, राणीसाहेब.

राणी—महाराज, माझ्या डोळ्यांतून आतां अश्रुपात होईल. परंतु मी राणी आहें असें मनांत आणिलें,—अथवा मी राणी आहें ही गोष्ट स्वप्नवत् होऊनही फार वेळ झाला—मी राजाची मुलगी खास आहें हें मनांत आणिलें ह्मणजे माझ्या अश्रूंच्या बिंदूंच्या विस्तवाच्या ठिणग्या होतील !

गुंडा०—जरा शांत व्हा.

राणी—तुम्ही नम्र व्हाल तेव्हांच मी शांत होईन; अथवा नाहीं, आधींही होईन, नाहीं तर ईश्वर माझें शासन करील. माझ्याजवळ बळकट पुरावा आहे त्यावरूच तुह्मी माझें शत्रु आहांत हें मी जाणतें, आणि ह्मणूनच माझ्या बावतींत तुह्मीं न्याय देऊं नये. तुम्हींच माझ्यामध्यें व राजामध्यें वितुष्ट पाडले नाहीं काय ? ईश्वर मजवर दया करो. येवढ्याचसाठीं मी पुनः ह्मणतें कीं तुह्मीं मला न्याय देणें याचा मला मनापासून तिट्कारा आहे. तुह्मी माझे हाडवैरी आहांत असें मी समजतें व तुमची सत्यावर लवलेशही प्रीति नाहीं हें मला ठाऊक आहे !

गुंडा०—मला असें ह्मटलें पाहिजे कीं तुह्मी आपल्याला योग्य असें भाषण करीत नाहीं; कारण तुह्मीं आजपर्यंत सदैव सद्धर्माचरण केले, व स्त्रियांच्या अंगीं असणारें स्वाभाविक शहाणपण व सौम्य वृत्ति यापेक्षांही जास्ती शहाणपण व सौम्य वृत्ति प्रगट केली. राणीसाहेब, तुह्मी असें बोलून खरोखरीं मला जखमी करतां. माझा तुमच्याशीं कोणत्याही तऱ्हेचा वैरभाव नाहीं, व तुमच्याशीं अथवा दुसऱ्या कोणाशीं अन्यायानें वागावें अशी माझी इच्छा नाहीं. माझें आतांपर्यंतचें व यापुढें होणारें आचरण जगद्गुरूच्या आज्ञेबाहेर यत्किंचितूही नाहीं. म्यां आगींत तेल ओतलें असा आपल्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. मी खात्रीनें सांगतों कीं म्यां कांहींएक केलें नाहीं. राजेसाहेब येथें बसले आहेत. मी एखादी गोष्ट करून नाकबूल जातो असें त्यांच्या लक्षांत येतांच माझ्या कपटवर्तनाबद्दल ते किती योग्य तऱ्हेनें माझें पारिपत्य करूं शकतील ? माझ्या संबंधानें सत्याचा अपलाप करून तुह्मीं जितकी माझी निर्भत्सना केली त्याहूनही अधिक प्रमाणानें तीव्र शासन करून ते मला ग्रासून टाकतील. परंतु त्यांची जर खात्री झाली कीं तुह्मी माझी व्यर्थ निंदा करतां तर तुमच्यापासून अपाय होण्याची मला भीति नाहीं. तर आतां माझें रक्षण करणें सर्वथैव त्यांच्या स्वाधीन आहे, आणि माझें रक्षण ह्मणून एवढेंच कीं माझ्यासंबंधानें तुमच्या मनांत घोळत असलेल्या कुविचारांचें निरसन करावें. परंतु राजेसाहेबांनीं तसें करण्यापूर्वींच तुह्मी ह्मटलेल्या गोष्टी

परत घ्याल व अशा गोष्टीं पुनः बोलणार नाही अशी माझी प्रार्थना आहे.

राणी—आचार्यमहाराज, मी आपली भोळीं बायको आहें. व तुमच्या पाचपेंचांचा प्रतिकार करण्यास असमर्थ आहें. तुमचें भाषण नम्रतादर्शक आहे. बाह्यात्कारें तुह्मी सर्व गोष्टी अशा तऱ्हेनें करतां कीं, तुमची सभ्यता व नम्रता प्रत्येकाच्या नजरेस पडतात. परंतु महाराज, तुमचें अंतःकरण मत्सर, गर्व व अभिमान यांनीं ओतप्रोत भरलें आहे. सुदैवानें व राजकृपेनें तुम्ही अनायासानें उच्चपदास जाऊन पोंचलां. आतां अशी स्थिति प्राप्त झाली आहे कीं मोठे मोठे सरदार लोक तुमची आज्ञा झेलण्यास तत्पर आहेत. तुमचे शब्द—जणूं काय ते तुमचे चाकरच आहेत—तुमच्या मनांत येतील त्या गोष्टी तत्काळ घडवून आणतात. मी स्पष्टपणें सांगत्यें कीं तुमचें लक्ष तुमच्या पवित्र व अत्युच्च वृत्तीपेक्षां ऐहिक मानापमानांवर जास्त आहे. तुह्मीं माझा न्याय निवडणें हें मला संमत नाहीं; आणि तुह्मा सर्वांपुढें माझी अशी विनंति आहे कीं हें सर्व प्रकरण परम पवित्र जगद्गुरूकडे न्यावें, व ते करतील तो न्याय मला सर्वांशीं मान्य आहे.

[राजापुढें गुडघे टेंकते व निघून जात्ये.]

श्रीनिवास०—राणीसाहेब फार दुराग्रही पडल्या; न्याय मिळावा ह्मणून त्यांची अत्युत्कट इच्छा आहे, पण दोष काढण्यांत त्यांचा पाय पुढें आहे व इतकें करूनही आपल्याबद्दलची चौकशी व्हावी या गोष्टीचा त्यांना तिरस्कार आहे. त्या निघून चालल्या हें ठीक नाहीं.

राजा—बोलवा, तिला पुन्हां बोलवा.

भाल०—राणी पद्मावतीनें दरबारांत यावें.

गिरजाबाई—राणीसाहेब, तुम्हांला फिरून बोलावित आहेत.

राणी—तूं त्याकडे लक्ष कां देतेस ? आपली पुढें पाहून नीट चल. तुला जेव्हां हाक मारतील तेव्हां तूं परत जा. देवा, आतां तूं मला संभाळ. त्यांनीं माझा असा छळ मांडला आहे कीं मला सोसवेनासा झाला आहे. चल, चलग बाई, मी नाहीं आतां थांबणार.

छेः नाहीं मी या कामासाठीं या दरबारांत कधींही येणार नाहीं!

[राणी, गिरजाबाई व दुसरे चाकर जातात]

राजा—प्रिये, जा तुला वाटेल तिकडे जा. या जगांत जर असें कोणी ह्मणेल कीं आपली बायको माझ्या बायकोपेक्षां अधिक चांगली आहे तर त्यावर कोणीही विश्वास ठेवूं नये. तुझें अनुपम गुण, तुझा मोहक स्वभाव, तुझी साधूप्रमाणें सौम्य वृत्ति, सुशील पत्नीस अनुरूप असें वर्तन—आह्मास आज्ञा करतां करतांही आमची सेवा करणें—तुझें सद्धर्माचरण, तुझे अतुल गुणसमूह—या सर्व गुणांनीं तुझें पूर्ण चित्र रेखलें जाईल तर पृथ्वीवरील सर्व राज्ञीसमूहाचें अधिपतित्व तुलाच दिलें पाहिजे. ती मोठ्या कुळांत जन्मली, व तिच्या उच्च कुलास योग्य अशा रीतीनेंच ती वागली!

गुंडा०—मीं अति नम्रपणानें विनंति करतों कीं ही गोष्ट आपण करावी अशी, अथवा कांहीं शंका आपल्या मनांत भरवून दिल्याकारणानें आपण ही गोष्ट करण्यास प्रवृत्त झालां अशी, अथवा राणी साहेबांसंबंधानें—त्या इतक्या चांगल्या आहेत म्हणून ईश्वराचे आभार मानले पाहिजेत—त्यांच्या सद्यःस्थितीचा नाश करणारी अथवा त्यांच्या अब्रूस बट्टा आणणारी अशी एक तरी गोष्ट आपल्यास सांगितली आहे काय? या गोष्टीसंबंधानें आपला अभिप्राय कृपा करून उघडपणें या दरबारांतील लोकांसमक्ष प्रगट करावा; कारण ज्या ठिकाणीं मजवर कांहींएक आरोप आला आहे त्याच ठिकाणीं, अथवा त्या ठिकाणीं नाहीं तरी त्याचक्षणीं त्या आरोपाचें निरसन झालें म्हणजे सर्वांची तृप्ति होईल.

राजा—आचार्य महाराज, तुह्मी निर्दोषी आहां; तुमच्यावर केलेले आरोप मिथ्या आहेत. तुह्मांला पुष्कळ शत्रु आहेत व ते तुमच्याशीं शत्रुत्वानें कां वागतात हें त्यांचें त्यांना देखील ठाऊक नाहीं, पण त्यांना एवढें ठाऊक आहे कीं एक कुत्रा भोंकूं लागला कीं गांवांतील सर्व कुत्रीं भोंकूं लागतात, त्याप्रमाणें, एकानें शत्रुत्व सुरू केलें कीं दुसऱ्यानें त्याचें अनुकरण करावें, व अशांपैकीं कांहींजणांनीं राणीस राग आणला. या सर्व गोष्टी तुह्मांस सांगावयास पाहिजेत

असें नाहीं. मी तुह्मांस क्षमा करतों; पण, तुमचा हात या कामांत बिलकुल नाहीं हें याहीपेक्षां अधिक व्यक्त करून दाखवूं काय ? यागोष्टीकडे मीं कानाडोळा करावा अशी तुमची नेहेमीं इच्छा होती. माझ्या मनांत तुह्मीं या गोष्टीची प्रेरणा केली नाहीं इतकेंच नाहीं तर पुष्कळदां माझ्या मनास आवरून धरलें. याप्रमाणें तुमच्यावरच्या अपवादाचें निरसन केलें. आतां ही गोष्ट करण्यास मी कां प्रवृत्त झालों, हे तुह्मी कांहीं वेळपर्यंत लक्ष्य देऊन ऐकाल तर मी आपल्या मनाला धीर देऊन तुह्मा सर्वांस सांगतों. हें असें झालें, लक्ष्य देऊन ऐका. कांहीं दिवसांपूर्वीं विदर्भदेशाच्या राजाचा वकील हा, आमची मुलगी जी मोहिनी तिच्या लग्नाच्या वाटाघाटीसंबंधानें येथें आला होता.त्यावेळेस त्याच्या कांहीं भाषणांनीं माझ्या मनास पहिल्यांदां धक्का दिला, व माझ्या मनांत शंका उत्पन्न होऊन तीव्र वेदना होऊं लागल्या. ही वाटाघाट होत असतांना, या बाबतींत कांहीं निश्चय होण्यापूर्वीं तो ह्मणाला कीं ही गोष्ट थोडा वेळ तहकूब ठेवावी; ह्मणजे तितक्या अवकाशांत, आमचें या राणीशीं—कीं जी कांहीं वेळ आमच्या बंधूची बायको होती.—झालेलें लग्न यथाशास्त्रि होतें व ही कन्या औरस आहे किंवा नाहीं या गोष्टी खुलासेवार मी आपल्या राजाला कळवीन. यामुळें माझें मन चरकलें, व तें अशा शक्तीनें भेटून टाकलें कीं माझें अंतःकरण थरथरा कांपूं लागलें. याचा परिणाम इतका बलवत्तर झाला कीं या सावधगिरींच्या भाषणामुळें अनेक भानगडीचे विचार माझ्या मनांत एकामागून एक येऊं लागले. प्रथमतः मला वाटलें कीं ईश्वराची मजवर अवकृपा आहे, आणि ह्मणूनच त्यानें विधात्यास अशी आज्ञा केली कीं, माझ्या स्त्रीच्या पोटीं मुलाचा गर्भ राहिला तर त्या मुलाचा जन्म होतांच त्यानें परलोकवासी व्हावें; कारण तिला झालेले मुलगे पोटांत तरी मरून जात, अथवा उपजतांच गतप्राण होत. म्हणून मला वाटलें कीं, ईश्वराचा हा संकेत आहे कीं या माझ्या राज्याला, कीं जें भाग्यशाली वारसाला अगदीं योग्य आहे, इच्या पोटीं संतान होऊन आनंद होऊं नये. मला मुलगा झाला नाहीं ह्मणजे माझें

राज्य किती भयंकर स्थितींत राहील या गोष्टीचा विचार मनांत येऊन मला अत्यंत तीव्र वेदना झाल्या. याप्रमाणें माझें मनरूपी तारूं अफाट समुद्रांत हेलकावे खात असतां माझ्या मनांत–ज्याकरितां आज आपण सर्वजण येथें जमलों आहोंत हा उपाय आला. तात्पर्य माझें मन त्यावेळीं अत्यंत अस्वस्थ होतें व अझूनही तें ठिकाणावर आलें नाहीं, तें विद्वान् आचार्यांच्या व धर्माधिकाऱ्यांच्या साहाय्यानें ताळ्यावर आणावें असें मला वाटलें. प्रथमतः ही गोष्ट खाजगी रीतीनें मीं या सरदारापाशीं काढली व तुह्मांस आठवतच असेल कीं ज्यावेळीं तुमचें मन पहिल्यांदां वळविलें, त्यावेळीं वेदनांनीं मी किती घामाघूम झालों होतों.

सरदार—खरें आहे, महाराज.

राजा—मी फार वेळ बोललों. तुह्मीं माझें कोणत्या रीतीनें समाधान केलें हें तुम्हीच कृपा करून सांगा.

सरदार—जशी आपली मर्जी. या गोष्टीनें माझें मन पहिल्या प्रथम इतकें चरकलें व ही गोष्ट इतकी महत्त्वाची, व इचा परिणाम इतका भयंकर होईल असें वाटलें कीं मी माझ्या मनांतील अत्यंत उत्कट कल्पनांना देखील कांहीं वेळ दाबून ठेवले, व आपण आतां जी गोष्ट करीत आहां ती करावी ह्मणून विनंति केली.

राजा—नंतर, आचार्य, मीं तुमचें मन वळविलें, व तुमच्याच संमतीनें निमंत्रणें केलीं. माझ्या दरबारांतील सर्व धर्माधिकाऱ्यांचीं मीं मतें घेतलीं व तुमच्याच अनुमतानें व संमतीनें आजपर्यंत सर्व गोष्टी केल्या. तर तुह्मी अनमान करूं नका. या चांगल्या राणीविषयीं तिट्कारा आला ह्मणून नव्हे, तर मीं सांगितलेल्या व मनाला तीव्र वेदना देणाऱ्या कारणांमुळें या गोष्टीचा उपक्रम सुरू ठेवा. माझें लग्न या स्त्रीशीं सशास्त्र झालें हें सिद्ध करा ह्मणजे मी बाकी राहिलेले आयुष्याचे दिवस पद्मावती राणीच्या–कीं जी जगांतील सर्व स्त्रीरत्नांत श्रेष्ठ आहे—संगतींत मोठ्या समाधानानें घालवीन!

श्रीनिवास०—महाराज, ज्या अर्थीं राणीसाहेब येथें नाहींत त्या अर्थीं हा दरबार आणखी कांहीं दिवसांनीं भरवावा व तेथपर्यंत,

राणीसाहेबांच्या मनांतून जें जगद्गुरूंकडे गाऱ्हाणें करावयाचें आहे तें न करण्याविषयीं त्यांस विनंति करावी. [ते जावे ह्मणून उभे राहतात.]

राजा—मला खास वाटतें कीं हे आचार्य माझ्याशीं धरसोडीचें वर्तन करतात. हें कृत्य असें लांबणीवर टाकण्याचा व जगद्गुरूंच्या प्रतिनिधीचा मला कंटाळा आला. माझ्या प्रियकर व विद्वान् काशिराया लवकर ये. तूं आलास कीं माझ्या मनाला समाधान होईल. दरबार बरखास्त करा. चला तर आतां.

[ज्या रीतीनें प्रवेश केला त्याच क्रमानें निघून जातात.]

दुसरा अंक समाप्त.

अंक ३ रा. (प्रवेश १ ला)

राजमहाल—राणीचा बसावयाचा दिवाणखाना.

[राणी व तिच्या कांहीं दासी काम करीत बसल्या आहेत.]

पद्मावती राणी—घे सतार तरी घे, बाई, मला भारी उदास वाटतें. थोडें गाणें गा, आणि माझी उदासीनता दूर करवली तर पहा. काम अमळ असूंदे.

[साकी]

नारदमुनि जइं वाजवि वीणा, गाई मधुर स्वरानें ॥
हिमकणवेष्टितपर्वतशिखरें, वृक्षहि वांकति गानें ॥ १ ॥
गानप्रभावें लता विकसती, पुष्पहि फुलती नादें ॥
जणुं जलवर्षणरविप्रभावें, नित्य वसंतचि नांदे ॥२॥
मधुर विण्याचा ध्वनी परिसुनी सर्वहि मोहित पाही ॥
शिरें नमविती, निश्चल होती लाटा उदधीच्याही ॥३॥
जाळुनि चिंता हृद्रोगातें, निद्रा वा निर्वाणा ॥
अर्पी, ऐशी शक्ती आहे मधुर गायनीं जाणा ॥४॥

[एक गृहस्थ येतो.]

राणी—कां, कसें काय ?

गृहस्थ—ते दोघे धर्माध्यक्ष दिवाणखान्यांत आपली मार्गप्रतीक्षा करीत आहेत.

राणी—काय, त्यांची माझ्याशीं बोलण्याची इच्छा आहे ?

गृहस्थ—होय, त्यांची इच्छा आहे असें कळविण्यास मला सांगितलें आहे.

राणी—त्यांना इकडे बोलवा. [गृहस्थ जातो] त्यांचें माझ्याशीं काय काम असावें. मी तर गरीब व राजाच्या मर्जीतून उतरलेली. त्यांचें येणें मला इष्ट वाटत नाहीं. मला वाटतें कीं ते चांगलें असावेत, व त्यांचे हेतूही चांगलेच असावे. पण दाढी जटा वाढविल्या ह्मणजे पवित्रपणा येतो असें नाहीं !

[गुंडाचार्य व श्रीनिवासाचार्य येतात.]

गुंडाचार्य—शांतिरस्तु !

राणी—गृहिणीस योग्य अशाच एका कृत्यांत मी निमग्न आहें. माझी इच्छा अशी आहे कीं कांहींही होवो, पूर्ण गृहिणीपद मला असावें. आचार्यहो, आपली काय आज्ञा आहे ?

गुंडाचार्य—ताईसाहेब, तुह्मी एकांताच्या ठिकाणीं याल तर आमचें येण्याचें प्रयोजन सविस्तर कळवूं.

राणी—येथेंच कां सांगाना. माझ्या हातून अशी कोणतीही गोष्ट आजपर्यंत घडली नाहीं कीं जिचा उल्लेख कोनाकोपऱ्यांतच केला पाहिजे. जितक्या मोकळ्या मनानें हें मी बोलूं शकतें तितक्याच मोकळ्या मनानें इतर स्त्रियाही बोलूं शकतील अशी मी आशा करत्यें. अहो, माझीं कृत्यें प्रत्येक मनुष्यानें जरी कसोटीला लाविलीं अथवा पाहिलीं, व त्यांची मत्सरी व नीच लोकांनीं हवी तशी चिकित्सा केली तरी मला त्याची परवा नाहीं, कारण माझा आयुष्यक्रम तसाच सरळ आहे. राजपत्नी या नात्यानें माझी वर्तणूक कशी आहे याची चौकशी करण्याकरतांच जर तुह्मी आलां असाल तर स्पष्टपणें बोला, कारण सत्याला स्पष्ट भाषणाची फार आवड आहे.

गुंडा०—हे राजकन्ये ! त्वत्कृते सत्यान्विता अस्माकं मनोरथाः—

राणी—आचार्य महाराज, संस्कृत कशाला, मी कांहीं इतकी

उनाड नाहीं कीं येथें आल्यावर, मला ज्या भाषेचा नित्य सहवास घडतो ती अझूनही येत नाहीं. परकी भाषेंत भाषण केल्यानें माझ्या वादाचें स्वरूप विलक्षण व संशयास्पद होईल, तर कृपा करून मराठींतच बोला, आणि तुह्मी सत्य भाषण कराल तर येथें असलेलीं माणसें आपल्या धनीनीच्या वतीनें तुमचे आभार मानतील. त्यांच्या धनिनीचा पुष्कळ प्रकारें छळ झाला. हे आचार्य, अत्यंत उत्सुकतेनें केलेल्या पातकांचा उच्चार मला निशंक मराठींत करतां येईल !

गुंडा०—ताईसाहेब ! माझ्या प्रामाणिकपणाचा व राजेसाहेबांची व तुमची जी इमानानें सेवा करतों तिचा आपणास इतका संशय यावा याबद्दल मला फार वाईट वाटतें. आह्मीं तुह्मांस दोष द्यावा, अथवा ज्या तुमच्या वर्तनक्रमाची प्रत्येक मनुष्य तारीफ करतो त्यास मलीन करावें ह्मणून येथें आलों नाहीं, तसेंच तुह्मास कोणत्याही प्रकारें दुःखसागरांत ढकलावें ह्मणूनही आलों नाहीं, कारण तुह्मीं पुष्कळच दुःख भोगलें आहे. राजेसाहेब व तुह्मी या दोघांमध्यें जो किंतु उत्पन्न झाला आहे त्यासंबंधानें तुमची स्थिति समजून घेण्यास, स्वतंत्र रीतीनें व इमानानें आमचीं मतें तुह्मास कळविण्यास, व तुमच्या मनाला समाधान देण्यास आह्मी आलों आहोंत !

श्रीनिवास०-हे सन्माननीय स्त्रिये ! हे आचार्य, आपल्या उदार बुद्धीस अनुसरून, व तुमच्याविषयीं जी उत्कंठा व आज्ञाधारकत्व यांच्या मनांत अझूनही आहे त्यास अनुसरून, तुह्मीं परवां जी त्यांची निंदा केली ती सर्व, चांगल्या माणसाप्रमाणें विसरून माझ्या प्रमाणेंच तुमची सेवा करावी व तुह्माला उमदेश करावा या उद्देशानें आले आहेत.

राणी—(एकीकडे) माझा विश्वासघात करावा या उद्देशानें—(उघडपणें) महाराज, तुमची इच्छा इतकी चांगली आहे याबद्दल मी तुमचे आभार मानतें. तुमचें भाषण प्रामाणिक मनुष्यांप्रमाणें आहे; ईश्वर करो आणि तुमची कृतिही तशीच असो. परंतु अशा महत्वाच्या विषयांत कीं ज्यांत माझ्या मानापमानाचा संबंध किंबहुना माझ्या जीविताचा संबंध आहे—माझ्या अल्पमतीनें मी तुमच्यासारख्या

विद्याविभूषित व थोर पुरुषांस एकदम कसें उतर द्यावें हें माझें मलाच कळत नाहीं. मी आपल्या दासींसहित काम करीत बसलें होतें व माझ्या स्वप्नींही नव्हतें कीं अशीं माणसें अथवा असें काम माझ्यापुढें येऊन उभें राहील— मी राजकुळांतली आहें—व ही राजवैभवाची आतां शेंवटचीच कळा आहे असें मला वाटूं लागलें आहे— येवढ्यासाठीं तरी कृपा करून मला थोडा वेळ द्या व मला सल्लामसलत घेऊं द्या—हर हर ! मी मित्ररहित, व निराश झालेली अशी गरीब स्त्री आहें !

गुंडा०—ताईसाहेब ! अशा प्रकारच्या भीतीनें तुह्मी राजाचें प्रेम दूषित करतां. तुमचे स्नेही व तुमच्या आशा हीं दोन्हीं असंख्य आहेत.

राणी—आहेत, पण त्यांचा या देशांत मला काय उपयोग ! अहो, तुह्मांला असें वाटतें काय कीं या देशांतील एखादा मनुष्य पुढें होऊन मला सल्ला देईल, अथवा जीवावर उदार होऊन राजाच्या मर्जीविरुद्ध माझ्याशीं उघडपणें स्नेहभावानें वागून या राजाच्या सत्तेखालीं राहूं शकेल ? छेः असें कधींही होऊं शकणार नाहीं. ज्या माझ्या स्नेह्यांना माझें दुःख केवढें आहे हें कळलें असतें व ज्यांच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे ते येथें नाहींत. माझ्या इतर सुखाच्या वस्तूप्रमाणेंच ते येथून फार दूर ह्मणजे माझ्या आईबापांच्या देशांत आहेत.

श्रीनिवास०—ताईसाहेब, तुह्मी आपलें दुःख जरा एकीकडेस ठेवून माझें ऐका.

राणी—तें काय ?

श्रीनिवास०—तुमचे जें कांहीं ह्मणणें आहे तें राजेसाहेबांस कळवा, ते फार दयाळू व उदार अंतःकरणाचे आहेत. हेंच तुह्मांला अधिक श्रेयस्कर होईल, कारण कायदेशीर रीतीनें जर या वादाची चौकशी केली तर तुमचा अपमान होऊन तुह्मांस जावें लागेल !

गुंडा०—हे सांगतात तें अगदीं बराबर आहे.

राणी—तुह्मी दोघेही ज्या गोष्टीची इच्छा करतां–ह्मणजे माझ्या नाशाची योजना–तीच गोष्ट सांगता. ही काय तुमच्या धार्मिक वृत्तीस

योग्य अशी मसलत आहे काय ? पुरे पुरे, स्वर्गलोक सगळ्यांत श्रेष्ठ आहे, व तेथें असा एक न्यायाधीश आहे कीं ज्यास कोणताही राजा फितावूं शकत नाहीं !

श्रीनिवास०—तुह्मी रागाच्या भरांत अर्थाचा अनर्थ करतां.

राणी—तर या गोष्टीची तुह्मालाच लाज वाटावी. मला असें वाटलें होतें कीं तुह्मी पवित्र पुरुष आहांत–साक्षात् मूर्तिमंत सद्‌गुणच आहांत. मला आतां अशी शंका येते कीं तुमचीं अंतःकरणें पोकळ आहेत व तुह्मी केवळ पातकांच्या मूर्ति आहांत. तुह्मी आपल्या पातकांचें क्षालन करा. हीच काय तुह्मीं आणलेली खुषीची खबर ? मजसारख्या दुर्दैवी स्त्रीस कीं जिची तुह्मास पर्वा नाहीं, जिचा उपहास झाला, थट्टा झाली, तिच्याकरतां हीच आनंदाची खबर आणतां काय ? माझें मन तुमच्यापेक्षां अधिक उदार आहे, आणि ह्मणूनच इतकें होऊनही माझ्यावर आलेल्या संकटांच्या निम्मे देखील तुमच्यावर यावींत अशी मी इच्छा करणार नाहीं. परंतु येवढें मात्र ह्मणेन कीं तुह्मांला सावध केले; देवास स्मरून सावध व्हा, नाहीं तर माझीं संकटें तुमच्यावर एकदम येऊन कोसळतील !

गुंडा०—ताईसाहेब, तुमचें मन स्वस्थ नाहीं. तुमचें चांगलें व्हावें म्हणून जें तुम्हांस सांगतों तें केंवळ मत्सरानें, असें तुम्हांस वाटतें.

राणी—तुम्हीं मला अगदीं शून्यवत् करून टाकलें. तुम्हांवर व तुमच्या सारख्या कपटी पुरुषांवर दुःखाचा वर्षाव होवो ! तुम्ही जर खरोखरीच न्यायी असाल, तुम्हांस जर खरोखरीच दया येत असेल, तुमच्या वेषाप्रमाणेंच तुमचें आचरणही असेल, तर तुम्हीच सांगा कीं जो माझा द्वेष करतो त्यासच माझा न्याय करा ह्मणून सांगावें अशी तुमची इच्छा आहे काय ? हर हर ! त्यांनीं (राजेसाहेबांनीं) मला वेगळें ठेवलेंच आहे, व त्यांच्या प्रीतीचा अंत पुष्कळ दिवसांपूर्वींच झाला आहे. मी आतां वयोवृद्ध आहें; आतां माझा व त्यांचा संबंध येवढाच उरला आहे कीं मी अझूनही त्यांची दासी आहें. यापेक्षां आणखी दुसरें कोणतें दुर्दैव मजवर कोसळावयाचें आहे ? आणि हें सर्व तुमच्या प्रयत्नांचें फळ !

श्रीनिवास०—तुमची भीति अधिक वाईट—

राणी—माझें मलाच बोललें पाहिजे; सद्गुणी मनुष्याचे या जगांत कोणीच स्नेही नसतात. आजपर्यंत मी धर्मपत्नीप्रमाणें वागलेंना ? मजविषयीं आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा संशय लोकांनीं घेतला नाहींना ? हें मी पोकळ डौलानें बोलतें असें समजूं नका. राजावर माझी पूर्ण प्रीति होतीना ? देवाच्या खालोखाल त्यांच्यावरच प्रीति केलीना ? अतिप्रीतिनें, केवळ देवभोळेपणानें त्यांचीच पूजा केलीना ? केवळ त्यांचा संतोष रहावा ह्मणून देवाची पूजा देखील अंतरलीना ? आणि या सर्व कृत्यांबद्दल मला हें बक्षीस मिळावें ? महाराज, हें खरोखरीच योग्य नाहीं. नवऱ्याच्या सुखाच्या पलीकडे एखादें सुख आहे हें जिच्या स्वप्नींही आलें नाहीं व जिचें पतीवर एकनिष्ठ प्रेम आहे अशा स्त्रियेच्या शुद्ध वर्तनांत सहनशीलतेची भर घाला, ह्मणजे माझ्या आचरणाची पूर्ण प्रतिमा उतरेल!

गुंडा०—ताईसाहेब, आह्मी जी दिशा चांगली ह्मणून तुम्हांस दाखवितों तिच्यापासून तुह्मी दूर दूर जातां.

राणी—तुमच्या घन्यानें माझें पाणिग्रहण करून ज्या उच्च पदाची मला अधिकारिणी केलें त्या पदाचा खुषीनें त्याग करण्याचा दोष माझ्या माथीं घेववत नाहीं—हा मान मृत्यूशिवाय दुसरा कोणीही मजपासून हिरावून घेऊं शकणार नाहीं !

गुंडा०—माझें ऐका, ताईसाहेब—

राणी—मी या देशांत आलें नसतें, अथवा या देशांतील हांजीहांजी करणाऱ्या लोकांचा व माझा सहवास न घडता तर बरें होतें. तुमचे चेहेरे देवदूतांच्या चेहेऱ्यांप्रमाणें आहेत. पण तुमचीं मनें एका देवासच ठाऊक ! मज मंदभागिनीचें आतां काय होणार ? जीवंत असलेल्या प्राण्यांत मजसारखा दुर्दैवी दुसरा कोणीहि नसेल ! हरहर ! गरीब बापड्यानों, (आपल्या दासीस) तुमचीं दुखें आतां कोठें आहेत; राज्यरूपी खडकावर कीं जेथें दया, स्नेही, आशा यांचा लेशही नाहीं, जेथें माझ्याविषयींचा शोक करण्यास माझा नातलगही नाहीं व माझा अंत्यविधीहि योग्य रीतीनें होण्याची आशा नाहीं—तीं सर्व

आपटून त्यांचे तुकडे तुकडे झाले!—एखाद्या कमलिनीप्रमाणें कीं जी एक्याकाळीं संपूर्ण वनाची स्वामिनी होती व पुष्पांचा वर्षाव करीत होती, मी आपलें डोकें खालीं करीन व समाधि घेईन!

गुंडा०—ताईसाहेब, आमचे हेतु निर्मळ आहेत, अशी तुमची खात्री होईल तर तुह्माला समाधान वाटेल. आह्मीं तुह्मांला काय ह्मणून त्रास द्यावा? शिव शिव! हें कृत्य आमच्या वृत्तीच्या विरुद्ध आहे. लोकांचीं दुःखें दूर करावीं हाच आमचा धंदा; लोकांस दुःखार्णवांत बुडवावें हा नाहीं. तुह्मी काय करतां याचा विचार करा. असें केल्यानें तुह्मी आपलें अकल्याण करून घ्याल, व राजेसाहेब सदैव तुमचा त्याग करतील. राजांच्या अंतःकरणांस नम्रवृत्ति अतिप्रिय आहे, पण एखाद्या हट्टी मनुष्याची व त्यांची गांठ पडली म्हणजे तींच अंतःकरणें फुगतात, व एखाद्या वादळाप्रमाणें भयंकर दिसूं लागतात. तुमचा स्वभाव मोठा विनयशाली व शांत आहे हें मला माहित आहे. आह्मी कोणाकडून आलों आहोंत व तुमचे स्नेही व सेवक आहोंत या गोष्टींचा विचार करा येवढी प्रार्थना आहे.

श्रीनिवास०—आह्मी असेंच आहोंत हें तुह्मांला कळून येईल. दुर्बल स्त्रियांच्या आंगीं भीति असते व त्या भीतीनें तुह्मी आपल्या सद्गुणांस मलिन करतां. तुमच्यासारख्या उदार बुद्धीच्या माणसांनीं, खोट्या नाण्याचा जसा आपण त्याग करतों, त्याप्रमाणें अशा शंकांचा त्याग केला पाहिजे. राजेसाहेबांची तुमच्यावर प्रीति आहे, व त्या प्रीतीचें रक्षण तुह्मांस केलें पाहिजे. तुमची मर्जी असेल तर तुमचा हेतु आह्मांस कळवा ह्मणजे आमच्या हातून होईल तितकी मदत करण्यास आह्मी तयार आहोंत.

राणी—आचार्यहो! तुह्मांला वाटेल तसें तुह्मी करा; आणि मी तुमच्याशीं उद्धतपणानें वागलें असेन तर मला क्षमा करा. तुह्मांला ठाऊकच आहे कीं मी अबला आहे, व तुमच्यासारख्या गृहस्थांस योग्य उत्तर देण्यास माझ्या अंगीं ज्ञान नाहीं. कृपा करून राजेसाहेबांस माझा असा निरोप कळवा कीं माझें अंतःकरण अझूनही त्यांच्यावर आहे, आणि यावज्जीव मी त्यांच्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करीन. तर

पवित्र आचार्यांनों, तुमची काय सल्लामसलत असेल ती द्या. या ठिकाणीं येण्यापूर्वीं माझ्या लक्ष्यांतही आलें नव्हतें कीं माझा उच्चपणाची किंमत इतकी मोठी आहे !

[जातात]

(पहिला प्रवेश समाप्त.)

अंक ३ रा (प्रवेश २ रा.)

[राजवाड्यांतील एक मागचा दिवाणखाना.]

[नानासाहेब, तात्यासाहेब, सखारामपंत व रावसाहेब प्रवेश करतात.]

नाना०—आतां तुह्मी सर्वजण एक होऊन जर आपआपलीं गाऱ्हाणीं धैर्य धरून पुढें आणाल तर आचार्य तुमच्यापुढें टिकाव धरणार नाहीं—ही संधि जर व्यर्थ जाऊं दिली तर आजपर्यंत जी मानखंडना झाली तेवढ्यानेंच शेवट झाला असें मला तर वाटत नाहीं, उलट आणखी नवीन अपमान झाला तर होईल !

सखा०—अहो कसलींही संधि आली तरी मला संतोषच आहे. माझ्या सासऱ्याची आठवण कधींही बुझावयाची नाहीं; त्याबद्दल सूड घेण्याची मी तर वाटच पाहतों.

तात्या०—कोणत्या सरदाराची त्याच्या हातून मानखंडना झाली नाहीं ? जरी साक्षात् मानखंडना झाली नसेल तरी असा कोणता सरदार आहे कीं ज्याविषयीं त्यानें आपली उदासीनता प्रगट केली नाहीं. आपल्याशिवाय दुसरा कोणी मोठा आहे असें त्यानें आपल्या आचरणानें कधीं तरी दाखविलें काय ?

राव०—सरदारहो, तुह्मी आपआपले मनोगत बोलून दाखविले. माझ्या हातून व तुमच्या हातून त्याची कशी संभावना झाली पाहिजे हेंही मी जाणतों. आतां जरी अनुकूल समय आला आहे तरी आपल्या हातून त्याला अपाय होईल किंवा नाहीं याविषयीं मला फारच संशय आहे. त्याची व राजाची मुलाखत होण्याचें जर तुमच्या हातून बंद करवणार नाहीं तर त्याची खोड मोडण्याचें मनांत देखील

आणूं नका; कारण तो बोलणारा असा वस्ताद आहे कीं राजाला ते-व्हांच मोहून टाकतो.

नाना०—अहो, आतां त्याच्या वक्तृत्वाला भिण्याचें कारण नाहीं, त्याचें मोहकत्व आतां कमी झालें आहे. राजाला त्याच्यासंबंधानें अशा कांहीं गोष्टी कळल्या आहेत कीं त्याचें भाषण जें आजपर्यंत मधाप्र-माणें गोड वाटत होतें तसें तें आतां कधींही वाटणार नाहीं. राजा-च्या मनांतून आचार्य इतका उतरून गेला आहे कीं पुनः म्हणून रा-जाची प्रीति त्याजवर जडण्याची आशा नको.

सखा०—अशी बातमी दर तासास जरी कोणी येऊन सांगेल तरीं देखील मी मोठ्या आनंदानें ऐकेन.

नाना०—मी सांगतों हें अगदीं खरें आहे, यावर विश्वास ठेवा. घटस्फोटासंबंधानें याचें कौटिल्य सर्व बाहेर आलें आहे.माझ्या शत्रूचें जसें वर्तन असावें तशाच तऱ्हेनें हे राजश्री या बाबतींत वागले.

सखा०—या गोष्टी बाहेर कशा आल्या पण ?

तात्या०—मोठ्या चमत्कारिक रीतीनें.

सखा०—कसें, कसें सांगा पाहूं ?

तात्या०—आचार्यानें जगद्गुरूस पाठविलेलें पत्र गहाळ झालें, व तें राजाच्या हातीं पडलें. त्यांत मजकूर असा होता कीं स्वामींनीं घ-टस्फोटाची आज्ञा तहकूब ठेवावी, आणि त्याचें कारण काय दिलें होतें ? स्वामीनीं घटस्फोटाची आज्ञा दिली तर राजेसाहेबांचें लक्ष राणीसाहेबांच्या एका पद्मिनी नांवाच्या दासीवर बसलें आहे, व तें तिच्याशीं लग्न लावतील हें दिलें होतें !

सखा०—हें खरें काय ?

तात्या०—खरें तर.

सखा०—पण एवढ्यानें त्याचा पाडाव कसा होणार ?

राव०—राजाची त्यावरून खात्री झाली कीं आचार्य कोणत्या तऱ्हेनें चुकवाचुकवी करतो. परंतु या बाबतींत त्याच्या लबाड्या बाहेर आल्या व जसें रोगी मेल्यावर वैद्यानें आणलेलें औषध फुकट जातें तशा याच्या सर्व तजविजी फुकट गेल्या; कारण राजानें त्या सुस्वरूप दासीशीं लग्न लावलें देखील !

सखा०—माझीही इच्छा आहे कीं त्यानें लावावेंच.

तात्या०—तुमच्या ह्मणण्याप्रमाणें कां होईना. त्यानें लग्न लावलेंच.

सखा०—हें जोडपें सुखांत नांदो !

नाना०—तथास्तु !

तात्या०—तिला राज्याभिषेक करावा असा हुकूम सुद्धां राजेसाहेबांनीं दिला. पण हो, ही बातमी अझून बाहेर फुटली नाहीं, व पुष्कळांना ठाऊक देखील नाहीं. परंतु सरदारहो, काय सांगूं. ती अवर्णनीय आहे; तिचें मन व अवयव किती सुरेख ! माझी मनोदेवता अशी लवते कीं तिच्या पोटीं असा एखादा पुतळा होईल कीं ज्याची कीर्ति सर्व देशभर पसरेल !

सखा०—पण कायहो, राजा आचार्यांस त्या पत्राबद्दल क्षमा करील काय ? देव करो आणि तसें न होवो.

नाना०—मी ही तेंच ह्मणतों.

तात्या०—अहो, येवढ्यानें काय झालें. याशिवाय दुसऱ्या गांधिलमाशा त्याच्या नाकाभोंवतीं झोंबून त्याला अतितीव्र वेदना देणार आहेत, आणि लवकरच. श्रीनिवासाचार्यास त्यानें मुख्य पीठाकडे पळवून लावलें. तो परवानगीशिवाय येथून गेला; राजानें ज्या कामासाठीं त्यास येथें आणलें होतें तें काम तसेंच भिजत पडलें आहे व गुंडाचार्यानें आपलें हेतु सिद्धीस जावें ह्मणून आपल्यावतीनें त्यास येथून लावून दिलें. राजाला जेव्हां हें कळलें तेव्हां तो "हं:, असें काय ?" असें ह्मणाला.

राव०—आतां ईश्वर त्याच्या मनांत प्रेरणा करो, व आचार्यांचा चांगला समाचार घेवो !

नाना०—बरें पण काशिराय केव्हां परत येणार हें कांहीं कोणाला ठाऊक आहे काय ?

सखा०—तो आला देखील, व त्याचें पूर्वीचेंच मत कायम ठरलें. आणि त्यामुळें घटस्फोटासंबंधानें राजाच्या मनाचें समाधान झालें सर्व धर्माभिमानी व विद्वान् लोकांचे मत त्याला अनुकूल असें आहे.

मला वाटतें कीं राजाच्या दुसऱ्या लग्नाचा मजकूर लवकरच प्रसिद्ध होईल, व नव्या राणीचा राज्याभिषेकमहोत्सवही लवकरच होईल. आतां यापुढें पद्मावती राणीला ' राणी ' या पदानें कोणी हाक मारणार नाहीं, परंतु राजाच्या भावाची बायको, व गतभर्तृका अशी संज्ञा देतील !

नाना०—हा तोच काशिराय कीं ज्यानें राजाच्या कामांत अगदीं भगीरथ प्रयत्न केले.

स०—यानें फार श्रम केले, व त्याबद्दल त्याला लवकरच मुख्य धर्माध्यक्षाची जागा मिळेल.

नाना०—मी असेंच ऐकतों.

स०—तुह्मीं ऐकलें तें खरें आहे.

[गुंडाचार्य व त्रिविक्रमाचार्य प्रवेश करतात.]

नाना०—पहा पहा, तो कसा विचारांत मग्न झाला आहे अगदीं !

गुंडाचार्य—त्रिविक्रमाचार्य, तें कागदाचें पुडकें तुह्मी राजास दिलें काय ?

त्रिवि०—खुद्द राजेसाहेबांच्या हातीं; त्यांच्या निजावयाच्या खोलींत नेऊन दिलें.

गुंडा०—त्यांनीं आंतले कागद वाचून पाहिले काय ?

त्रिवि०—मीं ते कागद हातीं ठेवतांच त्यांनीं तो लखोटा उघडला, आणि त्यांतला पहिलाच कागद जो त्यांनीं वाचला तो मोठा लक्षपूर्वक वाचला. त्यांच्या चेहेऱ्यावरून, त्यांच्या मनांत कांहीं विचार आले असावे असें दिसत होतें. त्यांनीं आपल्यास असा निरोप पाठविला आहे कीं आपण आतां सकाळींच त्यांची गांठ घ्यावी.

गुंडा०—राजेसाहेबांची बाहेर येण्याची तयारी आहे काय ?

त्रिवि०—मला वाटतें कीं इतका वेळपर्यंत ते तयार झाले असतील.

गुंडा०—मला कांहीं वेळ एकांतांत असूं दे. (त्रिवि० जातो) लग्न झालेंच तर विदर्भदेशच्या राजाची बहीण अलकावती हिच्याशींच झालें पाहिजे. त्यानें तिलाच वरलें पाहिजे—पद्मिनीशीं लग्न करणा-

र-छे: मी त्याला पद्मिनीशीं कधींही लग्न लावूं देणार नाहीं. या लग्नाच्या प्रकरणांत, नुसत्या स्वरूपाशिवाय दुसराही आणखी महत्वाचा विचार आहे. पद्मिनीशीं लग्न होणार ! नाहीं; नाहीं,–पद्मिनीशीं लग्न नाहींच होऊं द्यावयाचें. मी मुख्यपीठाच्या उत्तराची वाट पाहत आहें, बहुधा तें लवकरच येईल. पातूरच्या जहागिरदारणीशीं लग्न लावणार काय ?

नाना०—स्वारीचें मन स्वस्थ नाहीं असें दिसतें !

तात्या०—नसेना, राजा त्याच्या अंगावर आग पांखडील तेव्हां कळून येईल-

सखा०—पुष्कळ पांखडो, देवा तूं न्यायी आहेस !

गुंडा०—पूर्वीच्या राणीची सखी; एका सरदाराची मुलगी, आणि ती आतां राणीची यजमानीण होणार, राणीची राणी होणार—अरे ही मेणबत्ती नीट जळत नाहीं, याला उपाय ह्मणजे ही कातरलीच पाहिजे आणि तसें केलें ह्मणजे ती विझून जाईल ! ती सद्गुणी आणि सत्पात्र आहे हें मला ठाऊक आहे. पण दुसरें असेंही ठाऊक आहे कीं पाखंडमतवादी आहे. तिनें आमच्या स्वेच्छाचारी राजाच्या जिवाचा ताईत बनून राहणें हें आमच्या कार्यभागास अगदीं अनिष्ट आहे. याशिवाय काशिराय नांवाचा एक पाखंडमतवादी उत्पन्न झाला आहे. राजाची त्याच्यावर पूर्ण कृपा आहे, व तो सांगेल ती पूर्वदिशा असें झालें आहे.

नाना०—स्वारीचें चित्त ठिकाणीं नाहीं!

तात्या०—असें कांहीं घडून यावें कीं ज्यामुळें त्याच्या अंतःकरणाचा तत्काळ भेद होईल !

[एक कागद वाचीत राजा प्रवेश करतो व त्याबरोबर वासुदेवरावही येतो.]

तात्या०—राजेसाहेब आले, राजेसाहेब आले!

राजा—यानें किती संपत्ति मिळविली, आणि प्रत्येक तासास कसा पाण्यासारखा तिचा व्यय करीत आहे ! मितव्यय करण्याच्या

मिषानें ही संपत्ति किती श्रम करून जमा केली ? सरदारहो, तुह्मी आचार्यास पाहिलें काय ?

नाना०—महाराज, आह्मी त्यास पहातच येथें उभे राहिलों आहोंत. त्याच्या डोक्यांत एकावर एक विलक्षण तरंग येऊं लागले आहेत. तो दांतओठ खातो, मग एकदम चालूं लागतो; मध्येंच एकदम थांबतो. मग जमिनींकडे टक लावून पाहतो, आणि नंतर आपल्या कपाळावर हात मारून घेतो, पुढें मोठ्या त्वरेनें नीट चालण्याचा यत्न करतो; पुनः थांबतो, व आपल्या छातीवर मारून घेतो—इतकें सगळें झालें ह्मणजे आपले डोळे आकाशाकडे लावून चंद्राकडे पाहतोः याप्रमाणें विलक्षण स्थितीमध्यें आज आह्मीं त्याला पाहिलें.

राजा—हें योग्यच आहे, कारण त्याचें मन बिथरलें आहे. आज सकाळीं त्यानें कांहीं राजकीय कागदपत्र माझ्याकडे पाठविले, आणि त्यांत मला काय सांपडलें असावें ह्मणून तुमची कल्पना आहे ? देवाची शपथ, त्यानें चुकून पाठविला तो कागद. आणि कसला तो कागद—आजपर्यंत त्यानें मिळविलेलीं सोन्यारुप्याचीं भांडीं, उंची उंची पोशाख, उंची उंची डागिने व रोकड पैसा यांची यादी—ही संपत्ति इतकी मोठी आहे कीं एखाद्या प्रजाजनाजवळ इतकें वित्त असणें ही चांगली गोष्ट नाहीं.

नाना०—ही ईश्वराची इच्छा ह्मणावयाची–या गोष्टी आपल्या दृष्टीखालीं याव्या म्हणून कोणत्या तरी देवतेनें हा कागद त्या पुडक्यांत घालून दिला.

राजा—त्यांचें मन या नश्वर जगाहून भिन्न अशा परमश्रेष्ठ चिदात्म्यावर लागलेलें असेल तर अझूनही त्यांच्या समाधीचें विसर्जन झालेलें नसेल; पण मला वाटतें कीं त्यांच्या मनांत ऐहिक गोष्टींशिवाय दुसरें कांहींही घोळत नसेल, व ह्मणूनच त्यांचें मन इतकें एकाग्र झालेलें नसेल.

[राजा बसतो, वासुदेव० कानांत सांगतो, व तो गुंडाचार्याकडे जातो.]

गुंडा०—सच्चिदानंद परमेश्वर आपल्यास चिरकाल सुखी ठेवो !

राजा—तथास्तु महाराज–तुमचें मन पारमार्थिक विचारांनीं इतकें भरलें आहे कीं त्या विचारांशिवाय दुसरा विचार देखील तुमच्या मनांत येत नसेल. आतांही तेच विचार तुमच्या मनांत घोळत असतील ! ऐहिक सुखाकडे लक्ष देण्यास तुह्मांस क्वचितच वेळ सांपडत असेल, कारण तुह्मी आपला सर्व वेळ परमार्थसाधनाकडे लावून दिला आहे. तुह्मी अशा रीतीनें वेळेचा अव्यवस्थित उपयोग करतां म्हणून मी तुम्हांला दूषण देतों, आणि मला आनंद वाटतो कीं या बाबतींत तुह्मी माझे सोबती आहांत.

गुंडा०—राजा, पवित्र कृत्यें करण्याची माझी वेळ बांधली आहे आणि राजकीय विषयांचा विचार करण्यासही एक वेळ नियमित केली आहे. माझ्या शरीराचें संरक्षण व्हावें ह्मणून सृष्टिनियमानुसार मला गरीब मर्त्य मनुष्याला कांहीं वेळ खर्चून लक्ष दिलेंच पाहिजे.

राजा—तुह्मी ह्मणतां तें ठीक आहे.

गुंडा०—आपण हें पक्कें लक्षांत ठेवा कीं नेहेमीं मी जसें बोलतों तसेंच आचरणही ठेवतों.

राजा—हेंही पण अगदीं योग्य भाषण. खरोखरी चांगलें भाषण करणें हेंही एक चांगलें कृत्यच आहे यांत संशय नाहीं. परंतु नुसतें बोललें ह्मणजे एखादें कृत्य केलें असें होत नाहीं. माझ्या वडिलाचें तुमच्यावर प्रेम होतें, निदान प्रेम आहे असें ते ह्मणत तरी होते. आणि ज्याप्रमाणें ते बोलत असत त्याप्रमाणें त्यांनीं करूनही दाखविलें. मी राज्यारूढ झालों तेव्हांपासून मीं तुह्मांस आपल्या प्राणांसमान लेखिलें. तुह्मांस मोठी प्राप्ति होईल अशा ठिकाणींच केवळ तुमची योजना केली, इतकेंच नाहीं, तर माझ्या स्वतःच्या द्रव्यापैकीं पुष्कळ द्रव्याचा विनियोग तुह्मांस खुष करण्याकडे केला.

गुंडा०—आपण ह्मणतां याचा आशय तरी काय ?

स०—देवा, चाललें आहे तें ठीक आहे!

राजा—तुह्मीच सांगा कीं या राष्ट्रांतील अत्युच्च पद मी तुह्मांस दिलें आहे कीं नाहीं? तुह्मीच सांगा मी ह्मणतों हें खरें आहे कीं नाहीं ?

हें जर खरें आहे तर तुमच्यामध्यें व माझ्यामध्यें उपकार्युपकारकभाव आहे कीं नाहीं ? काय तुमचें काय ह्मणणें आहे यावर ?

गुंडा०—राजा, तुह्मी मजवर जी प्रेमवृष्टि केली ती माझ्या विद्वत्तेच्या मानानें अमर्याद आहे. खरोखरी तुमचे उपकार केवळ अमानुष आहेत. तुमची सेवा जितकी करावी ह्मणून माझी इच्छा आहे त्याप्रमाणें माझ्या हातून अगदीं घडत नाहीं, तथापि शक्त्यनुसार मी यत्न करण्यास कधींही कमी करीत नाहीं. मीं आपल्या स्वतःकरितां जरी एखादी गोष्ट केली तरी त्यांत असा कांहीं हेतु असतो कीं त्यांत आपलें व आपल्या राज्याचें कांहीं तरी हित व्हावें. आपण केलेल्या अनंत उपकारांबद्दल मी वारंवार आपले आभार प्रदर्शित करतों. माझी सदैव आपल्या कल्याणाबद्दल ईश्वराजवळ प्रार्थना आहे, आणि असाच क्रम, मी मृत्युरूपी उन्हाळ्यानें वाळून कोळ होईपर्यंत राहील व दिवसेंदिवस वृद्धिंगत पावेल !

राजा—वाः फार नामी भाषण केलें. खरोखरी आज्ञाधारक व स्वराजनिष्ठ प्रजा कशी असावी हें यावरून व्यक्त होतें. अशा वर्तणुकीच्या मनुष्याचा सन्मान करणें व या व्यतिरिक्त ज्याचें वर्तन असेल त्याचा अपमान करणें हेंच योग्य. मी अशी कल्पना करतों कीं ज्याप्रमाणें मीं आपल्या उदार हस्तानें तुमच्यावर द्रव्याचा वर्षाव केला, अंतःकरणापासून उत्पन्न होणाऱ्या प्रीत्युदकानें तुम्हांस स्नान घातलें, अधिकाररूपी सन्मानाची वृष्टि केली, त्याअर्थीं तुमचे हात, पाय, विचार, प्रीति, सारांश तुमचे सर्व अवयव व त्यांचे व्यापार हीं दुसऱ्यापेक्षां तुमच्या मित्रावर ह्मणजे मजवर सर्वतोपरी अर्पण केलेलीं असतील यांत संशय नाहीं !

गुंडा०—तुमचें कल्याण व्हावें ह्मणून, मी आपल्या स्वतःच्या हिताकरितां जे श्रम केले असते त्यापेक्षांही अधिक केले. जरी सर्व जगांतील लोक आपल्या मनास भ्रष्ट करून आपल्या कर्तव्यकर्मापासून पराङ्मुख होतील तरी मी ज्याप्रमाणें आजपर्यंत वागलों, व आतांही वागत आहें त्याचप्रमाणें अबाधित पुढेंही वागणार. जेवढ्या ह्मणून संकटांची कल्पना करतां येईल तेवढ्यांनीं जरी मी व्याप्त झालों

व त्यांनीं आपलीं अत्यंत भयंकर स्वरूपें प्रगट केलीं तरी तुमच्या संबंधाचें माझें कर्तव्य, ज्याप्रमाणें नदीचा ओघ कितीही जोरानें डोंगराच्या खडकावर जाऊन आपटला तरी त्यास जसा यत्किंचित्ही अपाय होत नाहीं त्याप्रमाणें, जरी मी भयंकर दुःखाच्या नदीनें व्याप्त झालों तरी अबाधित होत्सातें जसेंच्या तसेंच राहील!

राजा—किती थोरपणाचें भाषण! सरदारहो, लक्ष द्या, यांचें हृदय राजनिष्ठेनें पूर्ण भरलें आहे, व त्यांनीं तें तुह्मांस अगदीं उघडें देखील करून दाखविलें—हा कागद वाचा—(कागद हातांत देऊन) तो वाचून झाल्यावर मग हा वाचा. आणि मग घरीं जाऊन यथेच्छ पारणें फेडा! [राजा गुंडाचार्यावर रागावून निघून जातो] (सरदार गुंडाचार्याभोंवतीं जमतात, हंसतात व कानगोष्टी करतात.)

गुंडा०—याचा अर्थ काय? हा एकाएकी असा कां रागावला? ही इतकी आग त्यानें मजवर काय ह्मणून पांखडली? तो मजवर रागावतच येथून निघून गेला. त्याच्या डोळ्यांतून विस्तवाच्या ठिणग्या पडताहेत असा भास होई. एखाद्या सिंहास पारध्यानें जर त्रास दिला तर तो जसा खवळून जातो व त्यास कस्पटाप्रमाणें समजतो त्याप्रमाणेंच हा खवळून गेला होता. या कागदांत काय आहे हें मला समजलें पाहिजे. मला वाटतें त्याला जो राग आला त्याचें सर्व कारण त्या कागदांत आहे—आहेच तें—या कागदानें माझा घात केला. माझ्या इच्छा परिपूर्ण व्हाव्या, मला जगद्गुरूचें स्थान मिळावें ह्मणून मुख्य पीठांतील माझ्या मित्रास लांच देण्याकरितां जें मीं अपरिमित द्रव्य संकलित केलें त्याचा हा हिशोब! काय हा गाफिलपणा! अशा अलगर्जीपणानें मूर्खांचें पतन होणें अगदीं योग्य आहे—राजाकडे पाठविलेल्या कागदांत हाही कागद मीं पाठविला. त्यावेळेस कोणत्या पिशाचानें माझ्या मनांत संचार केला होता? या गोष्टीचा परिणाम नीट होण्याचा कांहीं उपाय राहिला नाहीं काय? याचें राजास अजीबात विस्मरण पडेल अशी कांहीं तजवीज नाहीं काय? या हकीकतीनें त्याचें मस्तक अगदीं फिरून गेलें आहे! असें जरी आहे तरी एक उपाय आहे. तो जर साधला तर माझें दैव जरी

फिरलें आहे तरी पुनः राजाची प्रीति मजवर जडेल. अरे हा कागद कसला ? जगद्गुरूला पाठविलेलें पत्र—खास त्या जगद्गुरूस मींच हें पत्र लिहिलें !—झाली—अखेर झाली आतां ! मी मोठेपणाच्या शिखरास जाऊन पोंचलों—माझ्या वैभवाचा सूर्य मध्यान्हावर येऊन मोठ्या सपाट्यानें आतां अस्तासही जाणार ! ज्याप्रमाणें अभाळांत तारा अति दैदीप्यमान् दिसून तुटतो, खालीं पडतो व कोणास दिसेनासा होतो, त्याप्रमाणेंच मी पतन पावून कोणीही मजविषयीं काळजी करणार नाहीं !

[नानासाहेब, तात्यासाहेब, सखारामपंत, व रावसाहेब येतात.]

नाना०—आचार्यमहाराज, राजाचा हुकूम ऐका. तुमच्याजवळ असलेले शिक्का मोर्तब तुह्मी आतांच्या आतां आमच्याजवळ द्यावें, व तुह्मी राजेसाहेबांचा दुसरा हुकूम होईतोंपर्यंत विश्रांतिगृहांत रहावें, असा त्यांचा हुकूम आहे.

गुंडा०—थांबा, अशी गडबड करूं नका; लेखी हुकूम कोठें आहे ? एवढा मोठा अधिकार तुमच्या शब्दांत नाहीं.

तात्या०—राजाचा शब्द कोण मोडील ? आह्मीं तुह्मांस सांगितलेले त्यांच्या तोंडचे शब्द आहेत.

गुंडा०—मी शब्द मानीत नाहीं असें ह्मटलें याचें कारण, ते तुमचे शब्द आहेत. तुम्ही मत्सरी अहांत हें मला ठाऊक आहे. हांजी हांजी करणाऱ्या सरदारांनों, हे शब्द मी मानणार नाहीं, नाहींच मानणार. मला आतां कळून आलें कीं तुमच्या अन्तःकरणास मात्सर्याचें कवच आहे. माझा अपमान व्हावा ह्मणून किती मनापासून इच्छितां, जणु कांहीं माझ्या अपमानानें तुमचें पोट भरतें ! ज्या गोष्टींनीं माझा नाश होईल त्या किती सफाईनें व बळजबरीनें पुढें करतां. अहो मत्सर करणारांनों, तुह्मी यथेच्छ आपल्या मनाप्रमाणें करून घ्या. असें करण्यास तुह्मांस ईश्वराची आज्ञा आहे; तुह्मांस त्याबद्दल योग्य प्रसंगीं निःसंशय बक्षिस मिळेल. जे शिक्का मोर्तब तुह्मी एवढ्या तोऱ्यानें मागतां, तें मला स्वतः राजानें—तुमच्या व माझ्या धन्यानें—आपल्या हातानें दिलें आहे. मला जो सन्मान व पदवी

दिली त्याबरोबरच यांचाही माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत उपयोग कर ह्मणून सांगितलें आहे. तो इतकेंच करून राहिला नाहीं, त्यानें अशा तऱ्हेची एक सनदही करून दिली आहे. तर मग शिक्कामोर्तब मजजवळून कोण घेणार ?

सखा०—ज्यानें दिली तोच घेईल.

गुंडा०—तर मग तोच स्वतः घेऊं शकेल.

सखा०—आचार्या, तूं अति गर्विष्ठ व राजद्रोही आहेस.

गुंडा०—तूं गर्विष्ठ आहेस ! तूं खोटें बोलतोस. असें बोलतांना तुझ्या जिव्हेचे तुकडे तुकडे कां झाले नाहींत !

सखा०-भगवी वस्त्रें धारण करणाऱ्या आचार्या, माझा सासरा जो बापुसाहेब जाहगिरदार कीं ज्यांच्यासाठीं हा सर्व देश अझूनही हळहळ करीत आहे, त्यांचा अंत तशा तऱ्हेनें झाला हें तुझ्या महत्वाकांक्षेचें फळ! अरे तुझ्या शरीराचा उत्तमभाग, व दुसऱ्या आचार्य मंडळींचीं डोकीं हीं सर्व एक्या ठिकाणीं केलीं तरी त्यांच्या केसाची देखील सर येणार नाहीं. हा प्रभाव तुझ्या कर्तबगारीचा ! मला दूरदेशीं कामावर पाठविलेंस, यामुळें मी राजापासून, व ज्यांना ज्यांना त्वां केलेले दोषारोप ऐकून कळवळा आला त्या सर्वांपासून दूर अंतरावर जाऊन पडलों, व त्यांस मदत करूं शकलों नाहीं. अशा वेळीं, परम धार्मिक आचार्या, त्वां दयार्द्र होऊन कुऱ्हाडीच्या घावानें त्यास मोक्षपद दिलें !

गुंडा०—हें, व आणखी दुसरें कांहीं कीं जें हा बडबडणारा सरदार माझ्या माथीं मारूं पाहतो, तें सर्व मिथ्या आहे. जाहगिरदाराला कायद्यानें शिक्षा झाली. त्यांत मी किती निरपराधी आहें व माझ्या मत्सराचा अंश किती होता याची साक्ष त्याचीं स्वतःचीं कृत्यें व जूरीचा अभिप्राय हे पूर्णपणें देतील. मी पाल्हाळ करून सांगूं लागलों तर मला हें सांगितलें पाहिजे कीं तुझी अब्रू व खरेपणा हीं तितपतच आहेत, व स्वामिभक्ति, व सत्यप्रियता यांच्या बाबतींत, सखारामपंत व त्याच्या मूर्खपणाची चहा करणारे यांच्यापेक्षां मी श्रेष्ठ आहें!

सखा०—खरोखरी, आचार्य, तुझा पवित्र वेषच तुझें रक्षण करतो!

नाहीं तर तुझ्या छातीचें रक्त मीं आपल्या तरवारीस पाजलें असतें. सरदारहो, हा उद्दामपणा तुह्मी सहन करतां काय ? आणि अशा मनुष्याचा ? असें आह्मी भ्यालों, व भगव्या वस्त्रांनीं आमचा छळ मांडला तर सरदारीस रामराम करा. यानें मनःपूतं समाचरेत् असें वागावें व आह्मांस टोप्या घालाव्या !

गुंडा०—कोणी चांगल्या रीतीनें वागूं लागला कीं तुझें पित्त खवळतें !

सखा०—होय, सर्व राष्ट्राची संपत्ति जुलमानें जमा करून आपण एकट्यानें स्वाहा करावयाची हा चांगुलपणाच ! राजाच्या विरुद्ध जगद्गुरूस लिहिलेलें पत्र कीं जें उघडकीस आले, हा चांगुलपणाच नव्हे काय ? ज्याअर्थी मला त्वेष आणला आहेस त्याअर्थी तुझा भलेपणा बाहेर काढतों. नानासाहेब, तुह्मी खरोखरी उदार आहां, व सार्वजनिक कल्याणाची तुह्मांला कळकळ आहे. तुह्मीच सांगा, सरदारांची व त्यांच्या मुलांबाळांची किती शोचनीय स्थिति आहे. हा जिवंत राहिला तर आमच्या मुलाबाळांला साधारणतः सभ्य गृहस्थाचाही मान मिळणें कठिण. यानें काय काय पापें केलीं व आपल्या हयातींत कोणत्या कोणत्या वस्तूंचा संचय केला याचा हिशोब याला दाखवा. तो पाहून कोणालाही अचंबा वाटेल !

गुंडा०—अरे मी याचा किती द्वेष करूं ? पण असें करणें हा आमचा धर्म नाहीं !

नाना०—ती वस्तूंची यादी राजाच्या हातांत आहे. पण त्यांतील एकूण एक गोष्टी वाईट आहेत.

गुंडा०—राजाला जेव्हां खरी हकीकत कळेल तेव्हां मी निरपराधी असून निष्कलंक आहे हें अधिक स्पष्ट रीतीनें व्यक्त होईल.

सखा०—असें त्वां ह्मटलेंस ह्मणजे वचावलास असें होत नाहीं. बरी आठवण झाली. त्या यादींतल्या कांहीं बाबी मला अझूनही आठवतात, व त्या मी सांगतोंही. त्या ऐकून तोंड खालीं घालून जर मी अपराधी आहें असें कबूल करशील तर थोडा प्रामाणिकपणा दाखविलास असें होईल !

गुंडा०—बोल, बोल, अत्यंत वाईट ह्मणून ज्या गोष्टी असतील त्या बोलून दाखीव. मीं जर तोंड खालीं घातलेंच तर तूं सरदार असून तुझ्या अंगीं रीतभात नाहीं ह्मणूनच खालीं घालीन.

सखा०—माझें कोणी डोकें उडविलें तरी कबूल, पण मला सभ्यपणाची रीत नाहीं हें ह्मणणें खपणार नाहीं. ऐक. पहिली गोष्ट ही कीं राजाच्या परवानगीशिवाय व त्याला न कळवितां तूं धर्माधिकारी होण्याची खटपट केलीस, व त्या अधिकारानें सर्व आचार्यांच्या अधिकारांची त्वां पायमल्ली केलीस.

नाना०—दुसरी गोष्ट ही कीं जेव्हां जेव्हां तूं मुख्य पीठास अथवा दुसऱ्या राजपुत्रांस पत्रें पाठविलींस तेव्हां तेव्हां प्रत्येक पत्राच्या आरंभीं ' मी व राजा ' असे उद्धट शब्द नेहमीं तूं लिहीत होतासः याचा अर्थ हाच कीं तूं राजास आपला दास बनविलेंस.

तात्या०—याशिवाय, ज्यावेळीं बादशहाकडे राजाचा वकील या नात्यानें गेलास, त्यावेळीं राजाच्या अथवा कौंसिलच्या माहितीशिवाय त्वां दुसऱ्या मुलखांत शिकामोर्तब नेलेंस ?

सखा०—आणखी, त्वां राजाच्या अथवा प्रधानमंडळाच्या संमतीशिवाय आमचा राजा व विलोम देशचा राजा यांच्यामध्यें तह करण्याकरितां एक मोठें कमिशन पाठविलेंस.

तात्या०—आपली महत्वाकांक्षा पुरी करावी येवढ्याच उद्देशानें राजाच्या नाण्यावर आपल्या स्वतःच्या मुकुटाचें चित्र खोदविलेस.

सखा०—स्वतःचें महत्व वाढावें, आणि राज्याचा नाश व्हावा येवढ्याच उद्देशानें मुख्य पीठाच्या जामदारखान्यांत असंख्य द्रव्य पाठविलेंस. हें द्रव्य कसें मिळविलेंस हें तुझ्या मनाला पक्कें ठाऊक आहे. याशिवाय आणखीही पुष्कळ कृत्यें मला ठाऊक आहेत. परंतु तीं त्वांच केलेलीं व अतिनिंद्य आहेत ह्मणून त्यांचा उच्चार करून मी आपल्या जिभेस विटाळवित नाहीं !

राव०—सरदारहो, पुरे, पतन पावणाऱ्या मोठ्या मनुष्यास जास्त दुखवूं नका. अशा वेळीं असें न करणें हा एक सद्धर्मच आहे. याचे सर्व अपराध कायद्यास दृष्टिगोचर आहेत. त्याला ताळ्यावर

आणण्याचें काम कायद्याचें आहे, तुमचें नाहीं. येवढ्या मोठ्या मनुष्यास इतकें लघुत्व यावें हें पाहून मला खरोखरी रडूं येतें!

सखा०-- मी त्यास क्षमा करतों.

तात्या०—आचार्या, आह्मीं सांगितलें याखेरीज राजाची अशी आज्ञा आहे कीं ' धर्माधिकारी ' या नात्यानें आतांपर्यंत त्वां ज्या ज्या गोष्टी केल्यास त्यामुळें तुझें वर्तन कायद्याच्या विरुद्ध झालें; आणि ह्मणून तुझ्या जमिनी, तुझीं घरें, तुझी मालमत्ता, सारांश ज्याचा ज्याचा ह्मणून तूं मालक आहेस तें सर्व जप्त केलें आहे—झालें, येवढेंच मला सांगितलें होतें.

नाना०—चांगल्या तऱ्हेनें कसें वागावें याविषयीं पूर्ण विचार करण्यास तुला मोकळीक देऊन आह्मी निघून जातों. शिक्का आमच्या ताब्यांत देण्यासंबंधानें जें खरमरीत उत्तर त्वां दिलें, तें आह्मी राजास कळवूं, आणि तें ऐकून निःसंशय त्याला समाधान वाटेल! तर नमस्कार, लघुत्व पावलेल्या भल्या आचार्या, नमस्कार!

[गुंडाचार्याखेरीज सर्व निघून जातात.]

गुंडा०—थोडेंबहुत माझें चांगलें व्हावें ह्मणून जी तुमची इच्छा आहे त्यालाही नमस्कार असो. माझ्या मोठेपणासही शेवटचा नमस्कार असो! मानवी स्थितीचा परिणाम अशा तऱ्हेचा होतो. आज आशेचे कोमल अंकुर फुटतात, उद्यां फुलांची समृद्धि होते, व मानवी प्राण्यावर सन्मानाचा इतका बोझा होतो कीं त्याखालीं तो चुरडून जातो. तिसरे दिवशीं घातुक धुक्यांनें सर्व दिशा व्यापून जातात, आणि मी मोठा सुखी प्राणी आहें व माझ्या मोठेपणाची फळें आतां पिकून माझ्या हातीं येतील असें त्यास वाटतें न वाटतें तोंच धुक्यानें त्याचें मूळ करपून जाते, आणि ज्याप्रमाणें मी पतन पावलों, त्याप्रमाणेंच तोही पतन पावतो. ज्याप्रमाणें लहान लहान उनाड पोरें भोपळा घेऊन पोहण्यास धजतात, त्याप्रमाणें मीं वैभवाच्या समुद्रांत पुष्कळ वर्षें यथेच्छ विहार केला; परंतु तो समुद्र माझ्या आटोक्याबाहेर आहे. माझ्या अभिमानाचा भोपळा सरतेशेवटीं मध्येंच फुटला, व मला मोठया जोरानें वाहणाऱ्या जलप्रवाहावर टाकून दिलें, व नौकरीचा कंटाळा आ-

लेल्या वृद्धास आतां या प्रवाहांतच मोक्ष मिळणार. या जगांतील वैभव व सर्व डामडौल अगदीं पोकळ आहे; यांचा मला कंटाळा आला. आतां माझे डोळे उघडले. जो पुरुष राजाची हांजी हांजी करतो तो किती हतभागी आहे! स्त्रियांपासून होणारें दुःख अथवा लढाईपासून होणारा अनिष्ट परिणाम, यापेक्षां राजांची हास्यमुद्रा व कृपा व त्यापासून पुढें होणारा भयंकर परिणाम हा खरोखरी त्याच्या मनाला अधिक उद्वेग करणारा व अधिक भयप्रद आहे, आणि देव ज्याप्रमाणें स्थानभ्रष्ट होतात त्याप्रमाणें त्याचें पतन होतें, व त्यास उद्धाराची यत्किंचित्‌ही आशा राहत नाहीं! [त्रिविक्रमा० चकित होऊन प्रवेश करतो.] कां त्रिविक्रमाचार्य, कसें काय आहे?

त्रिविक्रम०—महाराज, मला बोलवत नाहीं.

गुंडा०—माझ्या दुर्दैवाला पाहून तूं इतका चकित झालास? मोठ्या मनुष्याचें पतन पाहून तुझें मन चकित झालें काय? अरे, तूं रडतोस देखील; तूं रडलास तर मी खरोखरींच पतन पावलों!

त्रिविक्रम०—महाराज, तुमचें कसें काय चाललें आहे?

गुंडा०—कां, ठीक आहे. आचार्य, आतांप्रमाणें मी कधींही सुखी नव्हतों, कारण आतां मी आपल्याला ओळखतों. या पृथ्वीवरील अत्यंत श्रेष्ठ वस्तूच्या प्राप्तीपासून जें सुख व आनंद होणार तें मला आतांच होत आहे. माझें मन शांत आहे. राजानें माझा रोग बरा केला, आणि माझ्या परिपक्क झालेल्या शिरावरून राजसन्मानरूपी बोझा- कीं ज्याच्या भारानें मोठमोठालीं जहाजें बुडून तळाशीं जातील,—काढून टाकला, याबद्दल मला त्याचें फार फार आभार मानले पाहिजेत. आचार्य, स्वर्गसुखाची अपेक्षा करणारांस राजसन्मान अतिदुःसह बोझा आहे!.

त्रिविक्रम०—झालेल्या अपमानापासून तुह्मी चांगला धडा घेतला हें पाहून मला संतोष वाटतो.

गुंडा०—तूं ह्मणतोस त्याप्रमाणेंच माझेंही मत आहे. मला वाटतें कीं यार्हीपेक्षां जास्त संकटें मजवर आलीं तरी मी सोशीन, निदान माझें अशक्त मनाचे शत्रू जीं संकटें मजवर आणतील त्या-

पेक्षांही अधिक संकटें मी भोगूं शकेन, इतकें धैर्य मला वाटूं लागलें आहे. बरें, नवल विशेष काय आहे ?

त्रिविक्रम०—विशेष हेंच कीं राजाची तुमच्यावर अवकृपा झाली आहे.

गुंडा०—ईश्वर त्याचें कल्याण करो !

त्रिविक्रम०—दुसरी खबर अशी आहे कीं सर वासुदेवरावाला तुमची खजानजीची जागा दिली.

गुंडा०—ही गोष्ट मात्र एकाएकी झाली ! परंतु कांहीं चिंता नाहीं; तोही विद्वान् आहे. राजाची कृपा त्यावर पुष्कळ दिवसपर्यंत सारखी राहो, व तो ईश्वरास स्मरून सत्यतेनें व न्यायानें वागो ! ज्यावेळेस त्याचा व या सृष्टीचा संबंध सुटेल, त्यावेळेस त्याच्या समाधीवर गरीब निराश्रित पोरक्यांच्या आश्रूंचे पाटचे पाट वाहोत ! आणखी काय ऐकलेंत ?

त्रिविक्रम०—काशिराय परत आला. त्याचा चांगला बहुमान केला व त्यास मुख्य धर्माधिकाऱ्याची जागाही दिली.

गुंडा०—ही मात्र बातमी खरी !

त्रिविक्रम०—आणखी ऐका, पद्मिनीशीं राजानें गुप्तपणें लग्न केल्यास फार दिवस झाले. आज देवळांत जातांना ती राज्ञी आहे असें लोक उघडपणें ह्मणूं लागले. तिच्या राज्याभिषेकासंबंधानें जिकडे तिकडे चर्चा सुरू आहे.

गुंडा०—याच बाणानें मला घायाळ केलें. त्रिविक्रमा, राजा माझ्याही पलीकडे गेला. माझ्या सर्व सुखाचा सांठा या स्त्रीमुळें चिरकाल नाहींसा झाला. माझा सन्मानरूपीं सूर्य आतां उगवणार नाहीं, व माझ्या हास्यवदनांतून निघणारीं भाषणें ऐकण्याकरितां जमलेल्या सरदारांस प्रकाशितही करणार नाहीं. आचार्या, तूं आतां येथून जा. मी तुझा यजमान होण्यास अगदीं अयोग्य आहें, कारण मी आतां गरीब स्थानभ्रष्ट झालेला पुरुष आहें. राजाचा आश्रय कर, त्याचा प्रतापसूर्य-कधींही न मावळो! तूं किती इमानी आहेस, व किती योग्यतेचा मनुष्य आहेस हें मीं त्यास आधींच कळविले आहे. तो तुला उदयास

आणील. तो फार उदार मनाचा आहे आणि मी सांगितलेल्या गोष्टींचें त्याला थोडेबहुत तरी स्मरण होईल. तुझी सेवा तो कधीही व्यर्थ जाऊं देणार नाहीं.—बावा, त्याची हयगय करूं नको. मी सांगितलेल्या गोष्टी नीट ध्यानांत ठेव, आणि आपल्या बचावाची नीट तजवीज करून ठेव.

त्रिविक्रम०—महाराज, तुमचा माझा वियोग होणार काय ? अशा चांगल्या, उदार, व सत्यप्रिय धन्याचा मला त्याग केला पाहिजे काय ? महाजनहो, तुम्ही जर पाषाणहृदयाचे नसाल तर मला माझ्या यजमानास सोडून जातांना किती दुःख झालें आहे याची कल्पना तुह्मास अगदीं बरावर होईल. मी राजाची नोकरी बजावीनच, परंतु तुमच्यासाठीं मी सदैव ईश्वराची करुणा भाकीन.

गुंडा०—आचार्या, इतकीं जरी संकटें मजवर कोसळलीं तरी डोळ्यांतून असूं अगदीं येऊं द्यावयाचे नाहींत असा मीं निश्चय केला होता, परंतु तुझें प्रामाणिकपणाचें वर्तन पाहून त्वां मला हतवीर्य केलेंस, व मी केवळ भागूबाई बनलों ! पुरें, आतां हा शोक पुरे. त्रिविक्रमा, मी सांगतों ह्याकडे लक्ष दे, आणि ज्या वेळेस लोकांस माझा विसर पडेल—आणि विसर पडेल यांत संशय नाहीं—व ज्या वेळेस मी शीतळ अशा संगमरवरी दगडांच्या गृहांत घोर निद्रा घेत असेन, व ज्या ठिकाणीं मजविषयीं कोणीही चर्चा करणार नाहीं, त्यावेळीं मीं तुला याप्रमाणें उपदेश केला असें सर्वांस सांग. जो गुंडाचार्य सन्मानरूपी समुद्राच्या तळाचा ठाव घेऊन, वैभवाच्या अत्यंत उच्च शिखरापर्यंत चढला होता, त्यानें स्वतः जरी ह्या मार्गाचें अवलंबन केलें नाहीं, तथापि, पतन पावतां पावतां, ज्या योगानें तुझी उन्नति होईल असा चांगला व निर्भय मार्ग दाखविला. माझें पतन होण्याचीं कारणें व माझें पतन हीं दोन्हीं पक्कीं ध्यानांत ठेव. महत्वाकांक्षेपासून दूर रहा असें तुला वारंवार सांगणें आहे, कारण याच पातकानें देव स्थानभ्रष्ट झाले. असें जर आहे तर यःकश्चित् मानवी प्राण्यानें महत्वाकांक्षेपासून आपली उन्नति होईल अशी कशी आशा धरावी ? सगळ्यांचें झाल्यावर मग आपल्या सुखाकडे लक्ष दे. जे

तुझा द्वेष करतात त्यांच्यावरही प्रीति कर. बेइमानीनें, इमानदारीपेक्षां अधिक फलप्राप्ति कधींही होत नाहीं. मत्सरी लोकांची बडबड बंद करण्यास नेहेमी शांत वृत्ति धारण कर. न्यायानें वाग म्हणजे तुला कशाचेंही भय राहणार नाहीं. ज्या ज्या उलाढाली तूं करशील त्या त्या ईश्वरास स्मरून, सत्याचा व आपल्या देशाचा अभिमान धरून तूं कर, आणि इतकें करूनही जर तूं पतन पावशील तर तुझी भाग्यशाली साधूंत गणना होईल. राजाची यथायोग्य सेवा कर, आणि हे बघ, मला आंत घेऊन चल. माझ्याजवळच्या एकून एक पैची झडती घे. हें सगळें राजाचें धन आहे. माझी माळ, आणि परमेश्वरावरची निष्ठा एवढ्याच काय त्या माझ्या वस्तू आहेत. आचार्या, फार काय सांगूं—मीं राजाची सेवा एकनिष्ठपणें सारखी केली. त्याच्या अर्ध्या हिश्शानें जरी मीं परमेश्वराचें चिंतन केलें असतें, तर त्यानें खचितच माझ्या वृद्धापकाळीं माझ्या शत्रूंच्या तोंडीं मला निराश्रित असें दिलें नसतें !

त्रिविक्रम०—महाराज, धीर धरा!

गुंडा०—धैर्य धरलेंच आहे. दरबारच्या सुखांस नमस्कार असो. मला आतां ईश्वराचें चिंतन केलें पाहिजे !

[निघून जातात]

तिसरा अंक समाप्त.

अंक ४ था. प्रवेश १ ला.

स्थळ–रस्ता.

[दोन गृहस्थ प्रवेश करतात.]

१ ला गृ०—ठीक, बरी गांठ पडली.

२ रा गृ०—ठीक, बरी गांठ पडली.

१ ला गृ०—पद्मिनीला राज्याभिषेक झाला, व ती आतां याच रस्त्यानें मिरवत जाणार. तिला पाहण्याकरितांच तुह्मी येथें उभे राहिलां नाहीं काय ?

२ रा गृ०—दुसरें काय तर ? मागें तुमची आमची गांठ पडली तेव्हां बापूसाहेब जाहगिरदाराला शिक्षा होऊन तो याच रस्त्यानें गेला.

१ ला गृ०—असें खरें. पण ती दुःखाची वेळ होती, व ही सगळ्यांना आनंदाची आहे.

२ रा गृ०—खरें आहे. प्रजेनें आपली स्वामिभक्ति पूर्ण तऱ्हेनें व्यक्त केली. राजानें प्रजेचे हक्क पाळले कीं ती नेहमीं राजाच्या सेवेंत तत्पर असते व आजचा महोत्सव तिनें निरनिराळे तमाशे व चित्रविचित्र देखावे करून सुशोभित केला.

१ ला गृ०—आजच्या सारखा महोत्सव आजपर्यंत कधीं झाला नाहीं व पुढेंही कधीं होणार नाहीं.

२ रा गृ०—तुमच्या हातांतील कागदांत काय आहे हें मला कृपा करून सांगाल काय ?

१ ला गृ०—आजच्या प्रसंगीं वहिवाटीप्रमाणें ज्यांना ज्यांना ह्मणून सन्मान मिळायाचा आहे त्यांची यादी. तात्यासाहेबांचा नंबर पहिला आहे, दुसरा नंबर नानासाहेबांचा आहे. बाकीचीं नांवें तुह्मी वाचा.

२ रा गृ०—मी तुमचा फार आभारी आहें. ही वहिवाट मला ठाऊक नसती तर ही माहिती मला या यादीशिवाय खचित मिळाली नसती. बरें, राजाच्या भावाची बायको पद्मावती तिची काय हालहवाल आहे ?

१ ला गृ०—मी सर्व सांगतों. गुंडाचार्य, व दुसरे परमपूज्य व विद्वान् आचार्य यांनीं नुकतीच येथून सहा मैलांवर एक सभा केली. त्याठिकाणीं ती राजकन्या राहत होती. त्या सभेस त्यांनीं तिला पुष्कळदां बोलाविलें, पण ती मुळींच आली नाहीं, व राजाच्या मनांत किंतु आला होता म्हणून सर्व विद्वान् आचार्यांच्या सम्मतीनें असें ठरलें कीं राजानें तिचा घटस्फोट करावा व तिचें राजाशीं झालेलें लग्न गैरवाजवी होतें असें समजावें. तेव्हांपासून तिला नीलोद्यान येथें नेवून ठेवलें आहे व तेथें ती दुखणाईत पडली आहे !

२ रा गृ०—हाय हाय ! हे सद्गुणी स्त्रिये ! (वाजंत्र्यांचा आवाज ऐकूं येतो.) वाजंत्री वाजतात, नीट उभे रहा, राणी आली !

[वाजंत्री वाजतात, नंतर (१) न्यायाधीश, (२) कोषाध्यक्ष, (३) गायक (४) शहरचा कोतवाल व त्याचा मदतगार (५) एक सरदार व सखारामपंत (६) तात्यासाहेब (७) नानासाहेबांचें कुटुंब व इतर सभ्य स्त्रिया हे प्रवेश करतात.]

२ रा गृ०—खरेंच, राजकीय थाट खरा. हे कोण आहेत तें मला ठाऊक आहे. हातांत तरवार आहे तो कोण आहे बरें ?

१ ला गृ०—धरणगांवचे जाहगिरदार; व हातांत काठी आहे तो सटाण्याचा मानकरी.

२ रा गृ०—मोठा शूर पुरुष हा; आणि तो तात्यासाहेब जाहगिरदार वाटतें.

१ ला गृ०—हं, तोच तो; यालाच मोठा अधिकार प्राप्त झाला आहे आतां.

२ रा गृ०—ते नानासाहेब जाहागिरदार नव्हे काय ?

१ ला गृ०—होय.

२ रा गृ०—[राणीकडे पाहून] ईश्वर तुझें कल्याण करो ! तुझें मुखकमल किती सुंदर आहे ! गड्या, खचित ती अप्सरा आहे !

१ ला गृ०—जे तिजवर चौऱ्या ढाळीत आहेत ते चौघेही मानकरीच आहेत.

२ रा गृ०—ते मोठे भाग्यवान् आहेत, आणि तिजजवळचे सगळेच भाग्यवान् आहेत. मला वाटतें जी वृद्ध कुलीन स्त्री सगळ्यांच्या पुढें आहे ती नानासाहेब जहागिरदारांची बायको आहे.

१ ला गृ०—तीच ती; आणि दुसऱ्या सगळ्या मानकरणीच आहेत.

२ रा गृ०—त्यांचे पोषाखच सांगतात. खरोखरीच हीं नक्षत्रें आहेत. [वाजंत्र्यांचा गजर होऊन मंडळीची मिरवणूक निघून जाते. तिसरा गृहस्थ प्रवेश करतो.]

१ ला गृ०—बरी गांठ पडली; तुह्मी कोणत्या खटपटींत होतां ?

३ रा गृ०—मी देवळांत होतों. तेथें इतकी दाटी होती कीं आंत मुंगीला देखील रीघ नव्हती. इतका आनंदीं आनंद कीं मी अगदीं दडपून गेलों !

२ रा गृ०—तुह्मीं तो समारंभ पाहिला तर ?

३ रा गृ०—होय पाहिला.

१ ला गृ०—कसा काय होता ?

३ रा गृ०—अगदीं पाहण्यासारखा.

२ रा गृ०—सांगा, सांगा आह्माला त्याचें वर्णन सांगा ?

३ रा गृ०—मला जसें सांगवेल तसें सांगतों. सरदार लोक व त्यांच्या स्त्रिया यांनीं परिवेष्टित ती राज्ञी देवळाच्या मध्यभागीं आल्यावर, सर्व मंडळी तिच्यापासून कांहीं अंतरावर उभी राहिली. राणीसाहेब एक अर्धा तासपर्यंत एका शृंगारलेल्या अत्युत्तम खुर्चीवर कांहीं थोडी विश्रांति घ्यावी ह्मणून बसल्या. त्या अशा तऱ्हेनें बसल्या होत्या कीं त्यांच्या अनुपम लावण्याची कांति जमलेल्या मंडळीपैकीं प्रत्येकावर फांकली होती. पृथ्वीवर आजपर्यंत कोणासही न मिळालेलें असें हें अत्युत्तम स्त्रीरत्न आहे. ज्यावेळीं ह्या स्त्रीला लोकांनीं पूर्ण तऱ्हेनें पाहिलें, त्यावेळीं इतका गोंगाट झाला व इतके निरनिराळे स्वर ऐकूं आले कीं त्याला मोठ्या भयंकर वादळांत सांपडलेल्या जहाजावरील लोक जसा सगळा समुद्र दणाणून टाकतात त्याचीच उपमा साजेल. कित्येकांच्या पगड्या नाहींशा झाल्या; कित्येकांचे अंगरखे गमावले; कित्येकांचीं धोत्रें हरवलीं, आणि या जनसमूहाचीं तोंडें जर मोकळीं असतीं तर खचित तींही या गर्दींत नाहींशीं झालीं असतीं. असा आनंदोत्सव म्यां आजपर्यंत पाहिला नाहीं. मंडळीची गर्दी इतकी होती की आपली बायको आपणास ओळखणें दुरापास्त होतें. येथून तेथून सर्व एकंकार झाला होता !

२ रा गृ०—पुढें काय झालें.

३ रा गृ०—नंतर राणी साहेब उठल्या, व मोठ्या मंदगतीनें स्थंडिलापाशीं आल्या. त्या ठिकाणीं त्यांनीं आपले गुडघे टेकून डोळे मिटून आकाशाकडे दृष्टि लावून, मोठ्या शांत मनानें प्रार्थना केली.

नंतर समाधि विसर्जन करून त्या उठल्या, व सर्व लोकांस नमस्कार केले. त्यावेळीं मुख्य धर्माधिकाऱ्यानें राणीस योग्य असे सर्व संस्कार केले, ह्मणजे पवित्र तैलानें तिचें परिमार्जन केलें, आपल्या पाहिल्या राजाचा मुगुट तिच्या शिरावर ठेवला, व राजवेत्र व आणखी दुसरीं राज चिन्हें यांनीं तिला मंडित केलें. हा विधि आटोपल्यावर राष्ट्रांतील उत्तम उत्तम गवयांचें गाणें झालें. हें झाल्यावर ज्या थाटानें ती देवळांत आली होती त्याच थाटानें क्रीडोद्यानांत मोठी मेजवानी होणार होती तेथें गेली.

१ ला गृ०—आतां त्या जागेचें नांव "क्रीडोद्यान" नाहीं. तें त्याचें पूर्वीचें नांव; कारण गुडाचार्याचें पतन झाल्याबरोबर त्या नांवाचाही लोप झाला. ती जागा आतां राजाची आहे व तिला "स्फाटिकगृह" अशी संज्ञा आहे.

३ रा गृ०—तें मला ठाऊक आहे, परंतु हें दुसरें नांव इतकें नवें आहे कीं पूर्वीचें नांव अझून तोंडांतून जात नाहीं.

२ रा गृ०—राणीच्या दोन्ही बाजूंस जे दोन आचार्य होते ते कोण होते ?

३ रा गृ०—तुकाचार्य, व गोवर्धनाचार्य; पहिला मोरगांवचा धर्माध्यक्ष आहे (व हा पूर्वीं राजाचा चिटणीस होता) व दुसरा विजयपुरीचा.

२ रा गृ०—मोरगांवच्या धर्माध्यक्षाची त्या सद्गुणी काशिरायावर विशेषशी प्रीति आहे असें नाहीं.

३ रा गृ०—सगळ्या दुनियेला ठाऊक आहे तें. असें आहे तरी त्यांचा विशेष बेबनाव नाहीं. जेव्हां त्यांचा तसाच बेबनाव होईल तेव्हां काशिराय, आपल्याशीं वांकडा होणार नाहीं असा एखादा मित्र शोधून काढील.

२ रा गृ०—असा कोण तो, सांगा पाहूं ?

३ रा गृ०—त्रिविक्रमाचार्य. राजाची त्याच्यावर कृपा आहे; आणि तो तसाच योग्य मनुष्य आहे. राजानें त्यास जामदारखा-

न्यावर नेमिलें आहे व तो आज कधींपासून त्याच्या गुप्त मसलतींत आहे.

२ रा गृ०—तो अधिक सन्मानासही योग्य आहे.

३ रा गृ०—आहे; यांत काय संशय—या, तुह्मी सर्व माझ्या घरावरून जा, कारण तोच रस्ता दरबाराकडे जातो, व जें कांहीं अल्प आदरातिथ्य माझ्या हातून होईल त्याचा स्वीकार करा. रस्त्यानें तुह्मांला आणखीही पुष्कळ गोष्टी सांगेन.

दोघेही--तुह्मी ह्मणाल तसें. [निघून जातात].

(पहिला प्रवेश समाप्त.)

अंक ४ था. (प्रवेश २ था.)

स्थळ—नीलोद्यान.

[पद्मावती राणी दुखणाईत आहे; गिरजा व शांती तिच्या भोंवतीं उभ्या आहेत.]

गिरजा—ताईसाहेब, आतां कसें वाटतें ?

पद्मावती--गिरजे, काय सांगू. इतक्या वेदना होतात कीं यांतून मी वांचेन असें नाहीं. फळाच्या भारानें झाडें भुईशीं वांकतात; त्याप्रमाणें माझ्या भारानें माझे पाय दडपून गेले आहेत. खुर्ची घे पाहूं, हं. आतां मला बरें वाटतें. गिरजे, त्या भाग्यशाली गुंडाचार्याचा अंत झाला ह्मणून त्वांच मला सांगितलें नाहींस काय ?

गिरजा—होय ताईसाहेब, म्यांच सांगितलें, पण तुह्मांला तीव्र वेदना होत होत्या ह्मणून त्याकडे तुह्मीं लक्ष दिलें नाहीं.

पद्मावती—गडे गिरजे, तो कसा मेला हें मला सांग पाहूं. त्याचा अंत जर चांगल्या तऱ्हेनें झाला असेल तर सुदैवानें माझाहीं तसाच होवो !

गिरजा—ताईसाहेब, त्याचा अंत चांगल्या तऱ्हेनें झाला असें ह्मणतात. त्या दांडग्या नांदुऱ्याच्या मानकऱ्यानें त्याला यादगिरी येथें पकडल्यावर त्याच्यावर आलेल्या आरोपांचें परिमार्जन करण्याकरितां

त्याला पुढें आणलें. पण त्याला आणतां आणतां तो वाटेंतच अजारी पडला, व त्याची स्थिति इतकी भयंकर झाली कीं त्याला घोड्यावर देखील वसतां येईना !

पद्मावती—अरेरे काय दशा झाली बिचाऱ्याची !

गिरजा—सरतेशेवटीं तो हलक्या हलक्या मजला करीत लीलापुर येथें आला व तेथील देवळांत उतरला. तेथल्या मुख्य आचार्यानें व इतर आचार्यांनीं त्याचा फार बहुमान केला, त्यावेळीं तो त्यांस ह्मणाला—" आचार्य महाराज, राजसुखाच्या वादळानें झोडपून काढलेला असा वृद्ध मनुष्य, तुह्मा सर्वांमध्यें आपल्या हाडांस गति मिळावी ह्मणून आला आहे, त्याला कृपा करून थोडी जागा द्या. " असें ह्मणून त्यानें बिछान्यावर अंग टाकलें. त्याच्या दुखण्याचें पाऊल सारखें पुढें होतें. अशा त्यानें तीन रात्रीं घालविल्या, आणि चवथे दिवशीं ८ वाजतां (आणि हीच वेळ माझ्या प्राणोत्क्रमणाची ह्मणून त्यानें सांगून ठेवली होती) पश्चात्तापानें व दुःखानें विव्हळ होऊन त्यानें ढळढळा अश्रू गाळले, व सारखें ध्यान करीत त्यानें ऐहिक सुखाचा त्याग करून आपल्या आत्म्याचाही त्याग केला, व मोठ्या शांतपणानें आपले डोळे मिटले !

पद्मावती—त्याचा आत्मा शांतीचा अनुभव घेवो; त्याच्या दोषांचा उच्चार कोणीही न करो ! तथापि गिरजे, त्याच्यासंबंधानें माझें जें मत आहे तें मला मोकळ्यापणानें सांगू दे. त्याचा स्वभाव भारी मानी होता. तो आपली बराबरी मोठमोठ्या राजांशीं करीत होता, व त्यानें आपल्या कुटिल मंत्रांच्या योगानें सर्व राष्ट्र आपलेंसेंकरून टाकलें होतें. देवाच्या पैशाचा त्यानें अपव्यय केला. त्याच्या मनास वाटेल तो कायदा; तो राजासमोर पुष्कळदां खोटें बोलला; कधीं कधीं तर त्याचें भाषण दुटप्पी असे. एखाद्याचा नाश करावयाचा असल्यास, त्यानें दया ह्मणून दाखविलीच नाहीं. ज्याप्रमाणें तो मोठा होता त्याप्रमाणेंच तो मोठमोठीं कृत्यें करील असें वाटत असे; पण त्याचीं कृति, जसा तो आतां रसातळास जाऊन मिळाला आहे, त्याप्रमाणें

अगदीं शून्यवत् होती. तो स्वतः विषयलोलुप होता, व इतर आचार्यांस त्यानें वाईट वळण लावून दिलें.

गिरजा—ताईसाहेब, जेवढ्या ह्मणून वाईट गोष्टी असतात, त्या आपण ताम्रपटावर लिहून ठेवतों; व सद्गुण असतात ते पाण्यावर लिहून ठेवतों. त्यानें काय काय चांगल्या गोष्टी केल्या त्या ऐका.

पद्मावती—होय, ऐकते; नाहीं तर लोक मला मत्सरी ह्मणतील.

गिरजा—हा आचार्य जरी गरीब आईबापांच्या पोटीं आला होता तथापि मोठा भाग्यशाली होईल असें तो पाळण्यांत होता तेव्हांपासूनच लोक ह्मणूं लागले. तो विद्वान् होता, व महाविद्वान् होता यांत संशय नाहीं. तो अति धूर्त, मनमिळाऊ व प्रसिद्ध वक्ता होता. जे त्याच्यावर लुब्ध नव्हते त्यांच्याशीं मात्र त्याचें वर्तन अतिउद्दाम व कटु होतें. पण जे त्याच्याशीं मिळून राहत त्यांच्या मनास तो वसंतऋतुप्रमाणें आल्हाद देई. त्याची महत्वाकांक्षा अनावर होती तरी दान करण्यांत तो राजा कर्णासही मागें टाकील असा होता. इगतपुरी, व उक्षातीरपुर याठिकाणीं त्यानें स्थापन केलेलीं विद्यालयें त्याची सदैव साक्ष देतील. मात्र इगतपुरी येथील विद्यालय, जणुं काय त्यास निर्माण करणाऱ्याचा अंत होतांच, या जगास कंटाळून लयास गेलें. दुसरें विद्यालय जरी अझून पूर्णतेस आलें नाहीं तरी इतकें प्रसिद्ध आहे, कलाकौशल्यांत इतकें पुढें आहे व त्याची इतकी उन्नति होत आहे कीं सर्व धर्माभिमानी लोक गुंडाचार्यांची तारीफ केल्यावांचून कधींही राहणार नाहींत. मानहानि झाल्यापासून आचार्यास खरोखरीच सुख झालें, कारण तोंपर्यंत त्यानें आपल्या स्वतःला ओळखलें नव्हतें, व ‘ नीचपण बरवें देवा ’ याची त्यास प्रतीति आली नव्हती. मरतां मरतां त्याला मनुष्यापासून मिळणाऱ्या सन्मानाहूनही अधिक सन्मान मिळाला ह्मणजे ईश्वरास भिऊन त्यानें आपल्या शरीराचा त्याग केला !

पद्मावती—माझ्या मरणानंतर, म्या जीवंत असतांना ज्या ज्या गोष्टी केल्या त्यांची हकीकत सत्यतेनें सांगण्यास व माझ्या अब्रूचा बचाव करण्यास इमानी गिरजेशिवाय दुसरा कोण मिळणार आहे ?

जीवंत असतांना सदैव ज्याचा मीं द्वेष केला त्यास त्याच्या मरणानंतर सन्मान देण्यास, या धार्मिक, सत्यप्रिय व विनयसंपन्न स्त्रीनें शिकविलें. तो सदैव शांतिसुखाचा अनुभव घेवो!—शांति, तूं नेहेमीं माझ्याजवळ अस. मला जरा खालींच कर, मी आतां तुला फार वेळ त्रास देणार नाहीं ! अग गिरजे, गवयांना सांग कीं उद्वेग उत्पन्न करणाऱ्या सुरांत गाणें गा. ज्या परलोकीं मला जावयाचें आहे त्याचा विचार करीत मी बसत्यें.

[दुःखप्रदर्शक सुरांत वाद्यें वाजतात.]

गिरजा—त्यांचा डोळा लागला, सखे गडबड करूं नको, कारण त्या जाग्या होतील. शांती, अमळ सावकाश ! सावकाश !

[तिला स्वप्न पडतें. स्वप्नांत, शुभ्र वस्त्र परिधान केलेले, व डोक्यावर माळा धारण केलेले सहा पुरुष हळूंच एका मागून एक प्रवेश करतात. त्यांच्या मुखांवर सुवर्णासारखी कांति आहे व हातांत ताडाचीं पानें आहेत. ते प्रथमतः तिला नमस्कार करतात, नंतर नाचतात. नंतर त्यांपैकीं दोघे राखून ठेवलेली एक माळ तिच्या डोक्यावर ठेवतात व बाकीचे चौघे मोठ्या अदबीनें तिला नमस्कार करतात. नंतर तीच माळ ते दुसऱ्या दोघांजवळ देतात व बाकीचे चौघे तिला नमस्कार करतात. नंतर तिसऱ्या जोडीजवळ ती माळ देतात व बाकीचे चौघे नमस्कार करतात. हें झाल्यावर जणुं कांहीं अंतःस्फूर्तीनेंच ती झोंपेंत आनंद झाल्यासारखा दाखविते, व आपले हात आकाशाकडे करते. नंतर ते पुरुष नाचत नाचत व आणलेली माळ बरोबर घेऊन निघून जातात. वाद्यें वाजत राहतात.]

पद्मावती—शांति देणाऱ्या देवतानों, कोठें आहांत तुह्मी ? अरे तुह्मी सर्वजण गेलां काय ? आणि मला हतभागिनीला रखडत ठेवलें अं ?

गिरजा—ताईसाहेब, ह्या आह्मीं येथेंच आहोंत ?

पद्मावती—अग, तुह्मांला नाहीं म्यां हाका मारल्या. माझा डोळा लागल्यावर याठिकाणीं कोणी आलेलें तुह्मी पाहिलें नाहीं काय ?

गिरजा—ताईसाहेब, आमच्या नजरेस कोणी पडलें नाहीं.

पद्मावती—काय कोणी नव्हतें ? आतां आतां, अगदीं आनंदांत मग्न झालेल्या मंडळीचा थवा मला मेजवानीस बोलावतांनां तुह्मीं पाहिला नाहीं काय ? त्या मंडळीचीं मुखकमलें इतकीं प्रफुल्लित व प्रकाशयुक्त होती कीं त्यांचे हजारो किरण सहस्त्ररश्मीच्या किरणांप्रमाणें माझ्या अंगावर पडले होते. अभय सुखाची प्राप्ति करून देऊं ह्मणून त्यांनीं मला आश्वासन दिलें. गिरजे, याशिवाय त्यांनीं मला माळा आणून दिल्या, परंतु त्या घालण्याची माझ्या अंगीं अझूनही योग्यता नाहीं असें मला वाटतें. पण खरोखरी तशी योग्यता माझ्या अंगीं येईल !

गिरजा—ताईसाहेब, अशीं चांगलीं स्वप्नें तुह्मांला पडलीं हें ऐकून मला फार आनंद वाटतो.

पद्मावती—त्यांना गाणें बंद करायाला सांग; तें फार कठोर आहे व माझा जीव अगदीं दडपून जातो ! [गाणें बंद करतात.]

शांती—ताईसाहेबाचा चेहेरा एकाएकी किती बदलला हें पाहिलेंस काय ? तोंड अगदीं उतरून गेलें आहे--किती फिक्कट दिसूं लागल्या ह्या ! आंग अगदीं गारठत चाललें ! पहा, ते डोळे पहा !

गिरजा—ताईसाहेब चालल्या, चालल्या ग बाई ! देवाचा धांवा कर !

शांती—देवा, दुखण्यांतून ह्या लवकर उठोत ! [जासूद येतो]

जासूद—बाईसाहेबांची मर्जी असेल तर—

पद्मावती—अरे दांडग्या, यापेक्षां जास्त सन्मानास मी योग्य नाहीं काय ?

गिरजा—आपल्या मोठेपणाचा त्या कधींही त्याग करणार नाहींत हें तुला ठाऊक असूनही असें दाडगाईचें वर्तन केलेंस ? तूं दोषी आहेस ? जा घट्ट पाय धर.

जासूद—राणी साहेबाची मी मोठ्या नम्रतेनें क्षमा मागतों. मी घाईघाईनें निरोप सांगूं लागलों ह्मणून असें बेअदबीचें वर्तन घडलें. आपल्यास भेटण्यासाठीं राजेसाहेबांकडून एक गृहस्थ आले आहेत. ते बाहेर वाट पहात आहेत.

पद्मावती—गिरजे, येऊं दे त्याला आंत. या गुलामाला मात्र माझ्या दृष्टीसमोर फिरून येऊं देऊं नकोस ? [गिरजा आणि जासूद जातात]

[पुनः गिरजा काशिनाथपंडितासहित येते]

माझ्या दृष्टीला जर कांहीं विकार झाला नसेल तर तुह्मी माझ्या पुतण्याचे वकील आहांत व तुमचें नांव काशिनाथपंडित आहे.

काशिनाथ०—होय, ताईसाहेब, तेंच या दासाचें नांव.

पद्मावती—पूर्वी तुह्मी मला भेटून गेलां, तेव्हांच्या व आतांच्या काळांत जमीन अस्मानूचा फरक आहे. तो काळ बदलला ! तेव्हांचा मानपानही बदलला ! सांगा, तुमची काय इच्छा आहे ?

काशिनाथ०—हे राजस्त्रिये, हा दास सेवेंत तत्पर आहे. राजेसाहेबांनीं मला आज्ञा केली आहे कीं म्यां जाऊन तुह्माला भेटून यावें. तुमची प्रकृति फार अशक्त झाली आहे हें ऐकून राजेसाहेबांस फार वाईट वाटलें, व मजबरोबर असा निरोप पाठविला आहे कीं धैर्य धरा ह्मणजे प्रकृति बरी होईल.

पद्मावती—हा धीराचा निरोप फार उशीरानें आला. प्राण गेल्यावर ज्याप्रमाणें एखाद्या फांशीं दिलेल्या मनुष्यास माफी मिळावी त्याप्रमाणेंच हा निरोप. हें सौम्य औषध जर वेळेवर दिलें असतें तर खचित त्यापासून फार गुण आला असता. आतां पल्ला धैर्यातीत होऊन चुकला. आतां देवाचा धांवाच केला पाहिजे. राजेसाहेबांची प्रकृति कशी काय आहे ?

काशिनाथ०—ताईसाहेब, त्यांची प्रकृति चांगली आहे.

पद्मावती—याप्रमाणें त्यांची प्रकृति सदैव चांगली राहो ! या माझ्या देहाची जेव्हां राखरांगोळी होईल, व या राष्ट्रांतील सर्व लोकांस जेव्हां माझा पूर्ण विसर पडेल तेव्हांही त्यांचा जयजयकार सारखा होवो! शांति, मी तुझ्या हातून लिहविलेलें पत्र पाठविलेंस काय?

शांति—नाहीं, ताईसाहेब, अझून नाहीं. [पद्मावतीजवळ देते.]

पद्मावती—पंडितजी, माझी एवढी प्रार्थना आहे कीं हें पत्र राजेसाहेबांस द्यावें.

काशिनाथ०—मोठ्या आनंदानें देईन, ताईसाहेब.

पद्मावती—ह्या पत्रांत माझ्या पातिव्रत्याच्या फळावर ह्मणजे राजेसाहेबांच्या मुलीवर राजेसाहेबांनीं प्रीति करावी ह्मणून त्यांचीं मीं प्रार्थना केली आहे. तिच्यावर परमेश्वर सुखाचा वर्षाव करो! ती लहान आहे तथापि मोठ्या नम्र स्वभावाची आहे व राजेसाहेबांच्या प्रीतीस पात्र आहे. तिला सुशिक्षण द्यावें व तिजवर तिच्या आईक-रितां तरी कीं जिचें प्रेम राजेसाहेबांवर किती होतें याला एक पर-मेश्वर साक्षी आहे—थोडी प्रीति करावी ह्मणून विनंति केली आहे. दुसरी विनंति ही कीं माझ्या दासी कीं ज्यांनीं सुखदुःखाच्या प्रसंगीं अगदीं मनोभावानें सेवा केली त्यांच्यावर दयेचा वर्षाव करावा. आतां मी मरणोन्मुख झालें आहे, मी खोटें कशाला बोलूं? माझ्या दासी अशा आहेत कीं त्या मोठ्या पदवीच्या सरदाराशीं लग्न करून देण्यास अपात्र नाहींत, कारण त्या तशाच सद्गुणी, प्रामाणिक, नि-ष्कलंक व थोर मनाच्या आहेत. ज्यांच्या त्या बायका होतील ते पुरुष फार भाग्यवान् समजले पाहिजेत. शेवटची प्रार्थना माझ्या चाकरमाणसांसंबंधानें आहे. ते अगदीं गरीब आहेत. माझ्या गरिबीं-तही मी त्यास कधीं नकोशी झालें नव्हतें. त्यांची बाकी त्यांस चुकती करून माझी त्यांस आठवण राहावी ह्मणून त्यांस आणखी कांहीं इनाम द्यावें. ईश्वरकृपेनें जर मी आणखी कांहीं दिवस जगतें, व चांगल्या स्थितींत असल्यें, तर त्यांचा माझा अशा तऱ्हेनें वियोग झाला नस-ता. हाच कायतो पत्रांतील मजकूर. माझा आत्मा सुखानें परलोकास जावा अशी तुमची इच्छा असेल तर तुम्हांस शपथ घालून हेंच मा-गणें आहे कीं या गरीबांना साहाय्य करा व राजेसाहेबांनीं मजवर ही शेवटची मेहेरबानी करावी ह्मणून आग्रह धरा.

काशिनाथ०—मी शपथपुरःसर करीन. न केल्यास माझ्या अंगीं माणुसकी नाहीं असें होईल.

पद्मावती—मी तुमची फार आभारी आहें. राजेसाहेबांस मीं फार फार नम्रतेनें पुसलें आहे ह्मणून सांगा. आणखी असेंही सांगा कीं त्यांच्या मागची फार दिवसांची कटकट आतां जगांतून लवकरच

नाहींशी होणार आहे. मीं मरतां मरतां देखील त्यांच्या कल्याणाची इच्छा केली असें सांगा, कारण तसें मी करीनच-माझ्या डोळ्यांपुढें अंधेऱ्या येऊं लागल्या. बरें, पंडितजी-गिरजे, मला आतां निरोप दे-नाहीं; शांति, तूं मात्र इतक्यांत मला सोडूं नकोस ? मला निजलें पाहिजे. आणखी दासींना बोलवा. जेव्हां माझा अंत होईल तेव्हां, हें बघ, माझा योग्य मानमरातब ठेवा. मजवर पुष्पांचा वर्षाव करा. त्याच्यायोगानें सर्वांस मशहूर होईल कीं मी मरेपर्यंत पातिव्रत्यानें वागलें. मला सुगंधि द्रव्यांनीं सजवा; जरी मी आतां राणी राहिलें नाहीं, तरी राणीप्रमाणें व राजाच्या मुलीप्रमाणें माझा अंत्यविधि करा. यापेक्षां अधिक बोलवत नाहीं ! [पद्मावतीला घेऊन जातात]

४ था अंक समाप्त.

अंक ५ वा. (प्रवेश १ ला.)

राजवाड्यांतील दिवाणखाना.

[गोवर्धनाचार्य, व एक मशाल हातीं घेतलेला पोऱ्या प्रवेश करतात व त्यांस सर वासुदेवराव भेटतो.]

गोवर्ध०—एक वाजला नाहींरे, पोऱ्या ?

पोऱ्या—होय वाजला.

गोवर्ध०—ही विश्रांति घेण्याची वेळ, खेळत बसण्याची वेळ नव्हे. या वेळीं झोंप घेऊन शरीराला विश्रांति द्यावी; हा वेळ फुकट घालवूं नये. नमस्कार, सर वासुदेवराव, एवढ्या रात्रीं कोणीकडे ?

सर वासु०—काय, तुह्मी राजेसाहेबांकडून येत आहां ?

गोवर्ध०—होय, राजेसाहेबांना तात्यासाहेबाशीं खेळत सोडून आलों.

सर वासु०—ते निजायाच्या पूर्वी मलाही त्यांच्याकडे गेले पाहिजे; मी येतो.

गोवर्ध० —अहो जरा थांबा. काय वर्तमान ? तुह्मी फार घाईत आहां असें दिसते. येवढ्या रात्रीं जें कांहीं तुह्मी करणार अहां त्याची

थोडी कल्पना तुमच्या मित्राला दिल्यापासून जर कांहीं नुकसान नसेल तर मला कळवा. असें ह्मणतात कीं मध्यरात्रीं करावयाच्या कामाचीं स्वरूपें दिवसाच्या कामापेक्षां अधिक उग्र असतात !

सर वासु०—तुह्मी तर माझे दोस्त, आतां जें काम करणार त्याहूनही महत्वाच्या व गुप्त गोष्टी तुह्माला सांगायाला हरकत नाहीं! राणीला प्रसूतिवेदना होऊं लागल्या, व ती फार विव्हळ झाली आहे. तिचा यांत अंत होईल अशी भीति पडली आहे !

गोवर्ध०—तिच्या फळाबद्दल मी मनापासून देवाची प्रार्थना करतों. त्याला चांगली वेळ लागो, व जगो, परंतु सर साहेब झाड निर्मूल होईल बरें !

सर वासु०—मला ' तथास्तु ' ह्मणवतें तर बरें होतें. पण माझें मन मला सांगतें कीं ती मोठी गोड व चांगली स्त्री आहे, व तिच्याविषयीं आमच्या इच्छा अधिक चांगल्या असाव्या.

गोवर्ध०—पण सर साहेब, ऐका तर खरें. तुह्मी माझ्याच मताचे अहांत. तुह्मी शहाणे अहांत व धार्मिकही अहांत. सर साहेब, मी खात्रीनें सांगतों कीं तिचा व तिचे दोन हस्तक, काशिराय, व त्रिविक्रमाचार्य यांचा शेवट झाल्याशिवाय कधींही चांगलें होणार नाहीं. नाहींच होणार हें पक्कें समजा.

सर वासु०—तुह्मी या राज्यांतील अत्यंत प्रसिद्ध अशा दोघांसंबंधानें बोलतां. त्रिविक्रमाचार्याची अशी गोष्ट आहे कीं त्याला जामदारखान्याचा अधिकार असून तो राजाचा चिटणीसही आहे. त्याच्या पुढें मानाचे ढीगच्या ढीग आहेत आणि होतां होतां ते त्याला मिळतीलही. मुख्य धर्माधिकारी तर राजाचा केवळ हात व वाणी होऊन बसला आहे. त्याच्या विरुद्ध बोलायाची कोणाची माय व्याली आहे ?

गोवर्ध०—होय, सर साहेब, त्यांच्या विरुद्ध बोलणारे आहेत. मीं आपलें मत त्यांच्या संबंधानें बोलून दाखविलेंही. आजच मी, तो सुधारक आहे, व या देशावर एक साथच आली आहे असें कळवून कौंसिलच्या सभासदांचीं मनें कुपित करून टाकलीं आहेत. तो

पक्का सुधारक आहे हें त्यांना व मला पक्कें ठाऊक आहे. त्यांचीं मनें इतकीं कलुषित झालीं आहेत कीं त्यांनीं ही गोष्ट राजाच्या कानावर घातली, व राजेसाहेबांनीं, आम्ही त्यांच्यापुढें मांडलेल्या कारणां-वरून, याचा मोठा अनर्थकारक परिणाम होईल हें जाणून कृपा करून आमची तक्रार कान देऊन ऐकली, व असा हुकूम फर्माविला आहे कीं उद्यां त्याला कौंसिलमध्यें पाचारण करावें. सर साहेब, ही मोठी पीडा आहे, व तिचा उच्छेद केलाच पाहिजे. तुमच्या कामाला मीं व्यत्यय आणला. नमस्कार, सर साहेब. [गोवर्ध० व पोऱ्या जा०]

[सर वासुदेवराव जात असतां राजा व तात्यासाहेब प्रवेश क०]

राजा—तात्यासाहेब, आज रात्रीं आतां यापुढें मी खेळणार नाहीं. तुम्हीं मजवर फार डाव केलेत; माझें लक्ष खेळांत नाहीं.

तात्या०—महाराज, यापूर्वी मीं तुमच्यावर कधींही डाव केला नाहीं.

राजा—हं एखादवेळ केला असेल; माझें लक्ष खेळांत असलें तर कधींही डाव होऊं देणार नाहीं; काय सर साहेब, राणीकडील काय हकीकत आहे ?

सर वासु०—आपला हुकूम मला स्वतः नाहीं सांगतां आला. त्यांच्या दासीकडून आपला निरोप पोंचता केला. त्यांनीं मोठ्या नम्रतेनें आपले आभार मानले, व आपण त्यांच्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करावी ह्मणून इच्छा प्रदर्शित केली.

राजा—काय ? तिच्याबद्दल प्रार्थना करूं काय ? ती रडकुंडीला आली ?

सर वासु०—त्यांची दासी असें ह्मणाली. प्रत्येक वेदना त्यांना मृत्युसमान वाटते.

राजा—हे सुशील स्त्रिये !

तात्या०—ईश्वर त्यांची लवकर सुटका करो, व आपल्यास पुत्रप्राप्ति होऊन संतोष देवो !

राजा—तात्यासाहेब, आतां मध्यरात्र झाली, निजा. बिचाऱ्या राणीची लवकर सुटका होवो ह्मणून देवाची प्रार्थना करा. मला जरा

एकटें राहूंद्या, कारण ज्या गोष्टींचा मला मंडळींत विचार करतां येत नाहीं त्याबद्दल मला आतां विचार केला पाहिजे.

तात्या०—आपण आतां स्वस्थ निजा; मी राणीसाहेबाबद्दल प्रार्थना करीन.

राजा—ठीक आहे. [तात्यासाहेब जातात]

[सर दिनकरराव प्रवेश करितात.]

कसें काय ? काय बातमी आहे ?

सर दिन०—महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें मुख्य धर्माध्यक्षांस मी घेऊन आलों आहें.

राजा—हं: मुख्य आचार्य,

सर दिन०—होय महाराज.

राजा—बरें ते कुठें आहेत.

सर दिन०—ते आपल्या आज्ञेची वाट पहात आहेत.

राजा—त्यांस आमच्याकडे घेऊन या. [दिन० जातो]

सर वासु०—(एकीकडे) त्या आचार्यानें जें कांहीं सांगितलें होतें त्यासंबंधानेंच हें कांहीं तरी आहे. मी मोठ्या सुदैवानें येथें आलों. [काशिरायला घेऊन सर दिनकरराव पुनः येतो.]

राजा—येथें कोणीही उभे राहूं नका. [वासुदेव० थांबल्यासारखें करतो] हं: मीं ह्मटलेंना निघून जा म्हणून—काय ? [वासु० व दिन० जातात]

काशिराय—मला भय वाटूं लागलें आहे. हे असे रागावले काय ह्मणून ? यांनीं भयंकर मुद्रा धारण केली आहे. चिन्ह कांहीं ठीक नाहीं !

राजा—कसें काय, आचार्य: मीं कां बोलावलें हें जाणण्याची तुमची इच्छा असलीच पाहिजे.

काशि०—आपली आज्ञा झाली कीं हजर होणें हा माझा धर्मच आहे.

राजा—उठा, उठा, आचार्य, तुह्मी व आह्मी कांहीं वेळ इकडे तिकडे हिंडूं या. मला तुह्माला कांहीं बातमी कळवावयाची आहे. या,

तुमचा हात माझ्या हातांत द्या. मी जें बोलतों व पुढें बोलणार त्या-बद्दल मला फार वाईट वाटतें. आचार्य, अलीकडे तुमच्याविरुद्ध मोठे भयंकर आरोप मला मोठ्या दिलगिरीनें ऐकावे लागले आहेत. त्या आरोपांचा विचार करितां, मी व माझ्या मंत्रिमंडळानें असें ठरविलें आहे कीं उद्यां सकाळीं तुह्मीं आमच्या पुढें हजर व्हावें. त्या ठिकाणीं तुह्माला आपल्या अपराधांसंबंधानें बोलण्याची तितकी सवड मिळणार नाहीं. तुमच्यावरच्या आरोपांचा निकाल लागेपर्यंत, व तुमचा जबाब होईपर्यंत तुह्माला धैर्याचें अवलंबन केलें पाहिजे व सरकारच्या कारागृहांत राहून समाधान मानलें पाहिजे. आम्हीं असें न केलें तर तुह्मी आमच्यापैकीं एक असल्यानें कोणीही तुमच्याविरुद्ध साक्ष देण्यास धजावणार नाहीं.

काशि०—मी महाराजांचा फार उपकारी आहें. मला आनंद वाटतो कीं या चांगल्या प्रसंगीं कोंडा वाऱ्यानें उडून जाऊन धान्य धान्य तेवढें राहील. मज गरीबावर लोक जितका वाक्प्रहार करितात तितका दुसऱ्या कोणावरही करीत नाहींत.

राजा—आचार्य, उभे रहा. मी तुमचा मित्र आहें. तुमचा प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा माझ्या हृदयांत पूर्णपणें बिंबलीं आहेत. उभे रहा, माझ्या हातांत हात द्या. अम्मळ फिरूं या. अरे, तुह्मी कसले मनुष्य आहां ? मला वाटलें होतें कीं, तुह्माला कैदेंत न टाकतां तुह्माला व तुमच्या निंदकांना एके ठिकाणीं करून, तुमचें ह्मणणें ऐकून घ्यावें ह्मणून तुह्मी मला अर्ज कराल.

काशि०—हे भयोत्पादका ! माझी इमारत सत्याच्या पायावर रचलेली आहे. जर तो पाया सत्याचा नाहीं असें ठरलें,तर माझ्या शत्रूंना व मला या माझ्या देहावर विजय मिळाला असें होईल; व सत्यशून्य देहाची मला कांहींच पर्वा नाहीं. माझ्याविरुद्ध कोणी कांहींही बोलले तरी मला त्याचें यत्किंचित्‌ही भय वाटत नाहीं.

राजा—हें जग तुमच्याशीं कोणच्या तऱ्हेनें वागतें हें तुम्हाला ठाऊक नाहीं काय ? तुह्माला शत्रु फार आहेत, व मोठे बलवान्‌ही आहेत. त्यांचें कौटिल्यही त्या मानानें तसेंच मोठें आहे. एखाद्या

गोष्टींचा योग्य निकाल, सत्य व न्याय यांवर नेहमींच अवलंबून असतो असें नाहीं. लबाड मनुष्य तुमच्याविरुद्ध साक्ष देण्याकरितां आपल्यासारख्याच लबाड मनुष्याला किती अनायासें आणूं शकेल! अशा गोष्टी घडून आल्या आहेत. तुमच्याशीं टक्कर देणारे फार बलवान् आहेत, व त्यांचा मत्सरही तसाच प्रबल आहे. तुह्माला असें वाटतें काय कीं ज्यांचे तुह्मी सेवक अहां त्या तुमच्या गुरूपेक्षां, खोट्या साक्षीदारासंबंधानें, तुह्मी अधिक भाग्यवान् आहांत? कड्यावरून उडी मारायची ह्मणजे कांहीं भयंकर गोष्ट नाहीं असें तुह्मी समजतां व आपल्या हातानें आपला नाश करून घेतां.

काशिराय—ईश्वर आणि महाराज मज निरापराधी मनुष्याचें रक्षण करोत, नाहीं तर मजसाठीं पसरून ठेवलेल्या जाळ्यांत मी सांपडतों!

राजा—भिऊं नका. त्यांचेंही कांहीं चालवयाचें नाहीं, व आह्मीही तुमचा त्याग करीत नाहीं, तुमचें मन स्वस्थ असूं द्या. सकाळीं त्यांच्यापुढें जाऊन हजर व्हा. ते तुमच्यावर आरोप ठेवून कारागृहांत पाठवूं लागतील तर तसें न करण्याबद्दल अत्युत्तम असें भाषण करण्यास चुकूं नका. वक्तृत्व किती जोराचें पाहिजे हें प्रसंगावरून लक्षांत येईल. विणवण्याकरून फायदा झाला नाहीं तर ही आंगठी त्यांना दाखवा, व त्यांच्यावर आमच्यापाशीं अपील करा. पहा, हा भला मनुष्य रडूं लागला! खरोखरीं इमानी माणूस! देवा, हा खऱ्या दिलाचा आहे, व याच्याहून खरा माणूस माझ्या सगळ्या राज्यांत नाहीं! जा व मी सांगितलें तसें करा. [काशिराय जातो] त्याला इतका गहिवर आला आहे कीं त्याच्या तोंडावाटें शब्दही बाहेर निघत नाहीं! [एक वृद्ध स्त्री प्रवेश करते]

सभ्य—[आंतून] फिर माघारी–याचा अर्थ काय?

बाई—मी नाहीं फिरणार. मीं जी खबर आणली आहे त्यामुळें माझ्या उद्धटपणाला मार्गमोळा ह्मणून समजतील. देवदूत तुमच्यावर चौऱ्या ढाळोत, व तुमच्यावर सुखाचा वर्षाव करोत!

राजा—तुझ्या चेहऱ्यावरूनच तुझ्या निरोपाची मी कल्पना करि-

तों. राणी प्रसूत झाली ? सांग झाली ह्मणून, व मुलगा झाला ह्मणून!

बाई—होय, महाराज, छानदार मुलगा झाला: ईश्वर तिला सदैव सुखांत ठेवो! मुलगी झाली, मुलगे मागाहून होतील. महाराज राणीसाहेब आपण या नव्या माणसाचें मुख पहावें ह्मणून आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत. बोरांप्रमाणें जसें बोर असतें तशी हुबेहुब ती तुमच्यासारखीं आहे !

राजा—वासुदेवराव-[वासुदेव० प्रवेश करतो]

वासु०—महाराज.

राजा—या बाईला ५०० रुपये इनाम द्या. मी राणीकडे जातों. [राजा जातो]

बाई—फक्त ५०० च रुपये ! मी जास्ती घेईन. एखादा सईस इतकें इनाम घेतो. मला जास्ती पाहिजे, न दिल्यास मी बळजोरीनें घेईन. येवढ्याकरितांच मी मुलगी हुबेहुब त्यांच्यासारखी आहे ह्मणून ह्मणालें काय ? मला जास्ती पाहिजे, नाहीं तर मी बोललेलें शब्द परत घेईन. गोष्ट ताजी आहे तोंवर कांहीं झालें तर होईल! [जातात]

प्रवेश १ ला समाप्त.

अंक ५ वा. प्रवेश २ रा.

कौंसिल भरण्याच्या वाड्यासमोरील जागा.

[काशिराय प्रवेश करतो. नौकर द्वारपाळ वगैरे त्याबरोबर येतात.]

काशिराय—मला उशीर झाला नसावा; तरी कौंसिलकडून जो गृहस्थ मला बोलवायला आला होता, त्यानें ' घाई करा, घाई करा ' ह्मणून सपाटा लावला. सर्व दरवाजे बंद आहेत, याचा अर्थ काय ? हं; कोण आहे रे येथें ? तूं तर मला जाणतोस ?

द्वारपाळ—होय महाराज, पण मला कांहीं करतां येत नाहीं.

काशि०—कां बरें ?

द्वारपाळ—आपल्याला आंत बोलावीपर्यंत येथेंच वाट पहात बसलें पाहिजे.

[डाक्टर बळवंतराव प्रवेश करतो.]

काशि०—बरें, तूं ह्मणतोस तसें.

डा० बळ०—हा मत्सर; बरें झालें मी याच रस्त्यानें आलों. मी हें वर्तमान राजाला आतां जाऊन सांगतों.

काशि०—[एकीकडे] हा राजवैद्य डाक्टर बळवंतराव. जातां जातां त्यानें किती तरी निरखून माझ्याकडे पाहिलें ! तो माझी फट्फजिती जगजाहीर न करो ह्मणजे झालें ! हें कृत्य माझा अपमान व्हावा ह्मणून खात्रीनें माझ्या द्वेष्ट्यांनीं आरंभिलें आहे. देवा तूं त्यांचीं मनें वळीव—त्यांनीं माझा हेवा कां करावा ? तसें नसतें तर, त्यांनीं मला—ह्मणजे त्यांच्यापैकीं एकाला—असें चाकरमाणसांत, व हुजऱ्यांत वाट पाहायाला लावलें नसतें व तसें करतांना त्यांना शरम वाटली असती. पण त्यांच्या इच्छेप्रमाणें होणार व मलाही धैर्य धरलें पाहिजे.

[राजा व डा० बळवंत० खिडकींत बसलेले प्रवेश करतात.]

डा० बळ०—मी आपल्याला एक विलक्षण प्रकार दाखवितों.

राजा—कोणता तो, डाक्टर साहेब ?

डा० बळ०—मला वाटतें आपण तो पुष्कळदां पाहिला असेल.

राजा—कुठें, कुठें आहे तो ?

डा० बळ०—तो पहा, मुख्य धर्माध्यक्षाचा आदरसत्कार कसा होत आहे; तो पहा तो दाराशीं, चाकरमाणसांत व प्याद्यांत वाट पहात उभा आहे.

राजा—होय, तोच तो; याप्रमाणेंच ते एकमेकांचा मान ठेवतात काय ? येवढें बरें आहे कीं त्या सर्वांवर एक वरिष्ठ अधिकारी आहे. मला असें वाटलें होतें कीं त्यांच्या अंगीं इतका प्रामाणिकपणा असेल, निदान त्यांची रीतभात तरी इतकी चांगली असेल कीं ज्यावर आमची कृपा, व जो एकढ्या पदवीचा मनुष्य त्याला तरी ते पोस्टाच्या शिपायाप्रमाणें आपल्या हुकुमाची वाट पाहायाला लावणार नाहींत. डाक्टर, ही सर्व लबाडी आहे. करूं द्या काय करतात तें; पडदा ओढून घ्या. आपल्याला लवकरच कळून येईल.

[जातात.]

कौन्सिल भरण्याची जागा.

(कोशाध्यक्ष, तात्यासाहेब, सखारामपंत, गोवर्धनाचार्य, आणि त्रिविक्रमाचार्य हे प्रवेश करतात. कोशाध्यक्ष मुख्य जागेच्या वरच्या बाजूस बसतो, मुख्य धर्माधिकाऱ्याची जागा रिकामी ठेवतात, बाकीचे कोशाध्यक्षाच्या दोन्ही बाजूंस ओळीनें बसतात. चिटनीस (सेक्रेटरी) त्रिविक्रमाचार्य सर्वांच्या खालच्या जागेवर बसतो.)

कोशाध्यक्ष—सेक्रेटरी सांगा, आजची सभा कशासाठीं भरविली आहे ती ?

त्रिविक्रमा०—महाराज, मुख्य धर्माध्यक्षासंबंधानें आजची सभा भरविली आहे.

गोवर्ध०—ही गोष्ट त्यांना माहित आहे काय ?

त्रिविक्रमा०—होय, माहित आहे.

गोवर्ध०--अरे, कोणी आला आहे काय ?

द्वारपाळ—कोठें महाराज, बाहेर ?

गोवर्ध०--होय.

द्वारपाळ—मुख्य धर्माध्यक्ष आले आहेत. आपल्या आज्ञेची वाट पहात ते अर्धा तास झाला उभे आहेत.

कोशाध्यक्ष—त्यांना आंत येऊं द्या.

द्वारपाळ—महाराज आतां आपण आंत जावें. [काशिराय कौन्सिलच्या मेजाजवळ जातो.]

कोशाध्यक्ष—आचार्य, आजच्या प्रसंगीं ग्यां येथें बसावें, व ती खुर्ची रिकामी पहावी याबद्दल मला फार वाईट वाटतें. परंतु आपण सर्व मर्त्य आहोंत, व मनोनिग्रहाच्या अभावामुळें आपल्या हातून सदैव प्रमाद घडून येतात. देवदूतांची ज्यांस उपमा साजेल असे फारच थोडे लोक आहेत. आह्माला असें कळलें आहे कीं तुह्मी सर्वांहून श्रेष्ठ असून आह्मांस शिक्षा लावावयाची सोडून, विकारवश होऊन असमंजसपणानें असें वर्तन केलें आहे कीं त्यामुळें तुह्मी राजाचे गुन्हेगार झालां आहां, व नानाप्रकारच्या भयंकर धर्ममतांचा

या राष्ट्रांत चोंहीकडे प्रसार केल्यानें कायद्याच्या विरुद्ध तुमचें वर्तन घडून आलें आहे. ही मतें पाखंडी आहेत, व त्यांचा जर बीमोड केला नाहीं तर त्यांचा परिणाम फार अनिष्टकारक होईल !

गोवर्ध०—या मतांचा नाश तात्काळ केला पाहिजे. रानटी घोड्याला आस्ते आस्ते चालवून माणसाळीत नाहींत, तर त्याच्या तोंडांत कांटेरी लगाम देतात, व त्यास इतका चोपतात कीं तो अगदीं हुकुमांत येतो. आह्मीं आळसानें व व्यक्तिविशेषाच्या मानापमानाकडे लहान पोरासारखी नजर देऊन कींव केली, व हा स्पर्शजन्य रोग वाढूं दिला, तर मागाहून कितीही औषधोपचार केले तरी ते व्यर्थच ! यांचा परिणाम काय होईल ? जिकडे तिकडे बंडाळी व धामधूम, व सगळें राष्ट्र त्यांत बुडून जाईल. आमच्या शेजारच्या मुलखाची जी दशा झाली व ज्याबद्दलचें आमचें दुःख अजूनही ताजें आहे तीच दशा आमचीही होईल.

काशि०—सरदारहो, आजपर्यंत माझ्या आयुष्यक्रमांत मीं ज्या ज्या मतांचें प्रतिपादन केलें त्याप्रमाणेंच माझ्या हातून वर्तन व्हावें ह्मणून मी अत्यंत श्रम केले व असें करण्यांत माझा हेतु नेहेमीं चांगला असे. मीं मोकळ्या मनानें सांगतों कीं लोकांच्या शांततेचा नाश करणारे जे असतील त्यांचा माझा जितका विरोध आहे, किंवा मी जितका द्वेष करितों, त्याहून अधिक विरोध अथवा द्वेष करणारा माझ्याशिवाय दुसरा मनुष्य सांपडणें कठिण. माझ्या अंतःकरणांत जितकी स्वामिभक्ति जागरूक आहे तितकी स्वराजनिष्ठा ज्याच्या हृदयांत नाहीं असा मनुष्य राजास कधींही न मिळो ! ज्यांचीं अंतःकरणें मत्सरानें व द्वेषानें पुष्ट झालीं आहेत ते अत्यंत सरळ पुरुषांचीही मानखंडना करतात. तर सरदारहो, माझी अशी इच्छा आहे कीं माझे द्वेष्टे कोणीही असोत, त्यांनीं माझ्या समक्ष येऊन जें कांहीं बोलावयाचें असेल तें मोकळ्या मनानें बोलून दाखवावें.

तात्या०—नाहीं, तसें होऊं शकत नाहीं—तुह्मी मंत्रिस्थानापन्न, आणि ह्मणूनच कोणीही तुमच्याविरुद्ध बोलण्यास धजत नाहीं.

गोवर्ध०—आह्मास दुसरीं आणखी महत्वाचीं कामें आहेत, ह्म-

णून आह्मी थोडक्यांत सांगतों. राजाची अशी इच्छा आंहे—व त्यास आमची पूर्ण संमति आहे—कीं तुमची चौकशी योग्यरीतीनें व्हावी ह्मणून तुह्मीं कारागृहांत जावें ! तेथें तुह्मी अधिकारशून्य असें दृष्टीस पडतांच जेवढ्यांना जबाब देण्याची तुमची तयारी असेल त्यांच्याहूनही अधिक लोक पुढें येऊन उघडपणें तुमच्यावर दोषारोप करतील!

काशि०—मी तुमचा फार आभारी आहें. तुह्मी माझ्याशीं नेहेंमीं सख्यत्वानें वागतां. तुह्मी मनावर आणलें तर माझा निवाडा जज्ज व जूरी या नात्यानें मोठ्या चोख रीतीनें व दयाळुपणानें कराल. आतां तुमचा सर्वांचा बेत कळून आला. माझा नाश व्हावा ही तुमची इच्छा. पण, आचार्य, महत्त्वाकांक्षेपेक्षां, भूतदया व नम्रता यांनीं तुमच्यासारख्यांस विशेष शोभा आहे. मार्गभ्रष्ट झालेल्या जीवास सौम्य उपायांनीं ताळ्यावर आणावें; कोणाचाही त्याग करूं नये. नित्यशः वेड्यावांकड्या गोष्टी करतांना तुह्मांला जशी बिलकुल परवा वाटत नाहीं, त्याप्रमाणें माझ्या धैर्यावर कितीही बोजा ठेवून तें तुह्मीं कसोटीला लावलें तरी मी निःसंशय धुतल्या मोत्याप्रमाणें बाहेर निघेन. मला आणखीही बोलतां येईल, पण तुमच्या वृत्तीकडे पाहून मला मौन धरावें लागतें !

गोवर्ध०—आचार्य, खरी गोष्ट ही आहे कीं तुह्मी मताभिमानी आहां. ज्यांना ह्मणून तुमच्या या डौलदार भाषणाचा खरा रोंख समजतो त्यांना त्यांत केवळ शब्दपांडित्य व दुर्बलता यांशिवाय दुसरें काय सांपडणार आहे ?

त्रिविक्रमा०—गोवर्धनाचार्य, तुह्मी फार कडक बोललां. अशा थोर पुरुषांच्या हातून कितीही दोष घडले तरी त्यांच्या पूर्व स्थितीकडे पाहून त्यांना योग्य असा मान दिलाच पाहिजे. पतन पावणाऱ्या मनुष्याच्या दुःखावर डाग देणें ही क्रूरता नव्हे काय ?

गोवर्ध०—सेक्रेटरीसाहेब, माफ करा. या जमलेल्या मंडळीपैकीं तुह्मास तरी हें ह्मणणें उचित नाहीं.

त्रिविक्रमा०—कां, कां तें?

गोवर्ध०—तुह्मी या नव्या मताचे अभिमानी आहांत हें मला माहित नाहीं काय ? तुमच्याही मतांची चलबिचल झाली आहे.

त्रिविक्रमा०—काय मतांची चलबिचल झाली ?

गोवर्ध०—होय, होय, झाली.

त्रिविक्रमा०—तुमच्या अंगीं आहे त्याच्या निम्मे जरी प्रामाणिकपणा असता तरी बरें होतें ! तसें असतें तर लोकांनीं तुमचा स्तुतिवाद गायला असता; ते तुह्मांला भ्यायले नसते.

गोवर्ध०—हें तुमचें उद्धत भाषण मी ध्यानांत ठेवीन.

त्रिविक्रमा०—ठेवा, तसेंच आपलें उद्धटपणाचें आचरणही ध्यानांत ठेवा.

कोषाध्यक्ष—पुरे, पुरे, हें फारच झालें; सरदारहो, मेहेरबानी करा.

गोवर्ध०—झालें, माझें संपलें.

त्रिविक्रमा०—माझेंही संपलें.

कोषाध्यक्ष—आचार्य, हें पहा. आमच्या सर्वांच्या मतें हें ठरलें आहे कीं यांनीं कैद्याप्रमाणें तुरुंगांत जावें, आणि राजाचा दुसरा हुकूम होईपर्यंत तेथेंच रहावें. काय सरदारहो, असेंच ना ? याला तुमची सम्मति आहे ना ?

सर्व—होय आहे.

काशिराय—मला तुरुंगांतच गेलें पाहिजे काय ? याहून दुसरा सौम्य उपाय नाहीं काय ?

गोवर्ध०—दुसऱ्या कोणत्या उपायाची आशा करता ? तुमचा लोकांस फार त्रास झाला आहे. अरे, कोणी पहारेकरी तयार व्हा.

[पहारेकरी येतो.]

काशि०—काय, माझ्याकरतां पहारेकरी ? राजद्रोह्याप्रमाणें माझी धिंड काढणार ?

गोवर्ध०—अरे, यांना ताब्यांत घे, आणि तुरुंगांत सुरक्षितपणें घेऊन चल.

काशिराय—जरा थांबा, मला थोडें बोलावयाचें आहे. ही पहा

आंगठी. माझा वाद मी अशा क्रूर लोकांपुढें न मांडतां, माझ्या उदार अन्तःकरणाच्या यजमानापुढें ह्मणजे खुद्द राजेसाहेबांपुढें मांडून न्याय मागणार आहें.

कोषाध्यक्ष—अरे, ही अंगठी राजेसाहेबांचीच.

सखा०—ती कांहीं बनावट नाहीं.

तात्या०—खरोखरी, त्यांचीच ती. मीं प्रथमतःच तुह्मांला सांगितलें होतें कीं आपण हा घातुक धोंडा उंच फेंकतों खरा, पण तो कदाचित् आपल्याच डोक्यावर पडेल.

नाना०—तुह्मांला असें वाटतें काय कीं राजेसाहेब यांच्या केसाला तरी धक्का लागूं देतील.

कोषाध्यक्ष—आतां हें खास ठरलें. यांचा जीव राजेसाहेबांस किती प्यार आहे ! मी या कामांत न पडतो तर बरें होते.

त्रिविक्रमा०—ज्या वेळेस तुम्ही या मनुष्याच्या विरुद्ध पुरावा गोळा करायाला लागलां–याचा प्रामाणिकपणा सैतानाला थक्क करून सोडतो–त्यावेळेसच माझें मन मला सांगूं लागलें कीं आपण अग्नि प्रज्वलित करतों खरा, पण त्यांत आपलीच आहुति पडेल. आतां आली तुमची पाळी. [राजा रागवतच प्रवेश करतो, व खालीं बसतो.]

गोवर्ध०—हे भयकृत् भयनाशना राजा, आह्मी अशा राजाच्या छत्राखालीं आहोंत याबद्दल ईश्वराचे आमच्यावर किती उपकार आहेत. आमचे राजे नुसते शहाणे व चांगले आहेत इतकेंच नाहीं तर परमधार्मिकही आहेत. धर्मांचें रक्षण हेंच यांचें मुख्य कर्तव्य, आणि ह्मणूनच हे, या धर्माविरुद्ध आचरण करणाऱ्या गुन्हेगाराला शासन करण्याकरितां स्वतः येऊन बसले आहेत.

राजा—आचार्य, समयोचित भाषण करण्यांत तुमची हद्द आहे. परंतु आतां मी स्तुतिवाद ऐकण्याकरितां आलों नाहीं व अशा स्तुतिवादानें अपराधांचें गोपनही होणार नाहीं. माझ्या मनाचा ठाव तुह्माला लागणें कठिण आहे. अशा मधुर भाषणांनीं व श्ववृत्तीनें मी वश होईन असें तुह्माला वाटतें. माझ्याबद्दल तुमचें मत कसेंही असो; हें अगदीं खरें आहे कीं तुह्मी अति निर्दय अंतःकरणाचे आहांत. हे

भल्या गृहस्था (काशिरायास) बैस, खालीं बैस. आतां पाहूं दे मला कोणता वीर पुढें येऊन तुमच्या विरुद्ध भाषण करतो. तुह्मी या अधिकाराला योग्य नाहीं असें ह्मणणाराला उपाशीच ठेवलें पाहिजे.

सखा०—राजेसाहेबांची सम्मति असेल तर—

राजा—नाहीं, नाहीं, माझी बिलकुल संमति नाहीं. आजपर्यंत माझा समज होता कीं माझ्या कौंसिलचे सभासद शहाणे व विचारी आहेत, पण आतां कळून आलें कीं ते तसें नाहींत. या मनुष्यास, या सद्गृहस्थास, व तुमच्यापैकीं थोडेच या मानास योग्य आहेत— या इमानी मनुष्यास, या दिवाणखान्याच्या दाराशीं खिदमतगाराप्रमाणें वाट पाहत उभें करावें हा तुमचा शहाणपणाच काय ? हा मनुष्यही पण तुमच्यापैकींच एकजण ! हें किती लजास्पद आहे ! माझी आज्ञा अशी होती काय कीं तुह्मीं आपल्याला अगदीं येथवर विसरून जावें ? माझा हुकूम सभासद या नात्यानें यांची चौकशी करावी असा होता, एखाद्या घोडेवाल्याप्रमाणें चौकशी करावी असा नव्हता. आतां मला कळून आलें आहे कीं तुमच्या अंगीं तितकें सामर्थ्य असतें, तर तुमच्यापैकीं कांहींजणांची इच्छा—प्रामाणिकपणानें नव्हे तर केवळ मत्सरानें, करवेल तितकी चौकशी करावी ही आहे; पण जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी असें कधींही होऊं देणार नाहीं !

कोशाध्यक्ष—महाराज, मी जें सांगतों तेवढ्यावरून आपण सर्वांस क्षमा कराल. यांना कैद करण्याचा हेतु, यांची चौकशी योग्य तऱ्हेनें व्हावी, व पुरावा पुढें यावा येवढाच होता, यांत मत्सराचा अंशही नाहीं. निदान माझा हेतु तरी असाच होता.

राजा—पुरे, पुरे, सरदारहो, पुरे. यांना सन्मान द्या—यांना जवळ बसवा व यांच्याशीं योग्य रीतीनें वागा, कारण तो योग्य मनुष्य आहे. एखाद्या प्रजाजनानें जर आपल्या राजाची प्रीतीनें आणि एकनिष्ठपणें सेवा करून त्याच्यावर उपकार केले असतील तर ते या पुरुषानें मजवर केले आहेत, येवढें मीं तुह्मास सांगितलें ह्मणजे बस आहे. आतां यापुढें मला त्रास देऊं नका, सर्वजण त्याला आलिंगन

द्या, व त्यांशीं स्नेह करा. आचार्य, माझी एक विनंति आहे, ती तुह्मी मान्य केलीच पाहिजे. माझ्या कन्येच्या नामकरणाचा सोहाळा व्हावयाचा आहे, त्या वेळीं तुह्मी आलेंच पाहिजे.

काशि०—अत्यंत प्रतापवान् राजालाही या सन्मानापासून गौरव वाटेल. मी कोण यःकश्चित् प्रजाजन, या सन्मानास मी योग्य आहें काय ?

राजा—पुरे, पुरे, तुह्मांला नजराण्याची भीति नको पडायाला—तुमच्याबरोबर आणखी दोघेजण आहेत; नानासाहेब, व दादासाहेब; आतां तर कांहीं हरकत नाहीं. आचार्य, पुनः एकवार मी तुह्माला सांगतों कीं यांना आलिंगन द्या व यांच्यावर प्रीति करा.

गोवर्धना०—मी मनापासून यांच्यावर प्रीति करीन.

काशि०—हा स्नेहसंबंध मला किती प्रिय आहे याला एक देवच साक्षी !

राजा—हे साधुपुरुषा, तुमच्या आनंदाश्रूंनीं तुमचें सत्य अन्तःकरण अगदीं उघडें करून दाखविलें. तुमच्यासंबंधानें जो लौकिकवाद आहे कीं "आचार्याला त्रास दिला तरी तो तुमचा सदैव मित्र आहे" याचा मला आज प्रत्यय आला. चला, सरदारहो, आपला वेळ फुकट चालला. बारशाचा सोहाळा लवकर व्हावा अशी माझी इच्छा आहे. आज म्यां तुमची सर्वांची एकी केली, तशाच एकीनें तुह्मी नेहेमीं रहा, कारण अशानेंच मी बलाढ्य होईन, व तुमचीही योग्यता वाढेल ! (जातात.)

प्रवेश २ रा समाप्त.

अंक ५ वा. प्रवेश ३ रा.

राजवाड्यांतील आंगण.

[आंतून गडबड ऐकूं येते. शिपाई व त्याचा माणुस येतात.]

शिपाई—अरे, ए लुच्यानों, गप बसा, गप. अरे हा राजवाडा ह्मणजे पशुपक्षी ठेवण्याची बाग आहे ? अरे ए दांडग्यानों गप बसा !

(आंतूनच) अहो शिपाईबुवा, मी कोठींतला माणूस आहें.

शिपाई—तुला सुळावर चढविला पाहिजे. फांशींच दिला पाहिजे ! लुच्चा ही काय दंगा करावयाची जागा आहे ? आणारे आणा, दहा बारा चिंचेचे फोक आणा, आणि मजबूत फोक आणा; पण ते मजबूत असले ह्मणून यांना काय ? गवताच्या काड्याप्रमाणेंच ! थांबा तुमचीं डोंकींच फोडून टाकतों. मेजवान्या पाहिजेत नाहीं; गुलामानों, येथें तुह्मी पक्वान्नाच्या आशेनें आला नाहीं ?

मनुष्य—रावसाहेब, जरा थंड व्हा. यांना दूर करावयाचें काम फार कठीण आहे. सणाच्या दिवशीं पहाटेस निजायाला सांगितलें तर कोणी निजतो कां ? हं, एक युक्ति आहे, तोफा लावून यांना उडवून टाकले तर हे येथून नाहींसे होतील. डोंगर कितीही जोरानें ढकलला तरी ढकलला जातो कां ? हेही तसेच आहेत, पहा.

शिपाई—हे येथें आंत आले कसे ? मरायला ?

माणूस—मला ठाऊक नाहीं. समुद्राला भरती कशी येते ? चार इंच जाड काठी. ही पहा त्यांतून किती शिल्लक राहिली ? झोडपून काढले, आणखी काय करूं ?

शिपाई—त्वां कांहीं केलें नाहींस ?

माणूस—मी कांहीं भीम नाहीं, कुंभकर्ण नाहीं कीं जे येथील ते ठेंचून फेंकून द्यायला-पण ह्मातारा असो तरणा असो, पुरुष असो, बायको असो, ज्यांना ज्यांना ह्मणून डोकें होतें त्या सगळ्यांना बदडून काढलें; आणि असें जर केलें नसेल तर जी पाहिजे ती शिक्षा करा. [आंतून] अहो शिपाईबुवा, ऐकूं येतें कां ?

शिपाई—आलों, आलों तुझ्याकडेच येतों.

माणूस—मीं आतां काय करावें ह्मणून तुमचें म्हणणें आहे.

शिपाई—अरे काय ह्मणजे ? धरावेत आणि वदडावेत ! अरे ही काय मजा पाहायची जागा आहे कीं जमलेत सगळे !

माणूस—तो पहा दरवाजापाशीं एक माणुस आहे. त्याचें तोंड निखाऱ्यांत तापविलेल्या तव्याप्रमाणें तांबडें लाल आहे. मला वाटतें कीं २० सूर्यांची उष्णता त्याच्या एकट्याच्या नाकावर पसरली आहे त्याच्या शेजारीं पाजारीं जे उभे आहेत त्यांना दुसरी शिक्षा नको;

त्याच्या नाकाच्या उष्णतेनेंच ते भाजून करपून जातील. तो पहा तो आग्या वेताळ, त्याच्या डोक्यावर मीं तीनदां मारले, व तीनदां त्याच्या नाकांतून रक्त निघालें, पण तो हलतो आहे कीं जागेवरून ? तो आपला गिळून टाकायला बसला आहे. त्याच्याच जवळ एका कोष्टयाची भिकारडी बायको होती. तिनें जें माझ्यावर तोंड सोडलें व आग पांखडली ती पुसूंच नये. शेवटीं तिच्या डोक्यावरची कापडाची गठडी खालीं पडली, आणि माझा हात चुकून आग्या वेताळाला न लागतां तिला मार लागला, तों काय गहजब करून दिला तिनें! बोंब ठोकली आणि 'धांवा, धांवा' ह्मणून ओरडत सुटली. त्यासरसें ३०।४० कोष्ट्यांचीं पोरें चट्दिशीं तिच्या मदतीला आलीं, व माझ्या अंगावर येऊन पडलीं, पण मी कांहीं डगमगलों नाहीं. शेवटीं माझ्या अंगावर त्यांनीं काठ्या चालविल्या तरी मीं त्यांना दाद दिली नाहीं. तितक्यांत कांहीं पोरें माझ्या मागच्या बाजूला गेलीं, व लहान लहान धोंडे घेऊन त्यांनीं माझ्यावर सारखी वृष्टि केली, मग मला आंत जाणें भागच पडलें, व त्यांनीं खूप वंडाळी माजविलीं. त्यांच्या अंगांत सैतानानेंच संचार केला होता, दुसरें काय ?

शिपाई—अरे हींच तीं पोरें, जीं नाटकगृहांत अगर वक्तृत्व-समारंभांत जातात व एवढ्या तेवढ्यावरून दंगा करीत सुटतात. अशीं कांहीं पोरें मी कैद करून ठेवलीं आहेत, आणि मी त्यांस तीन दिवस तसेंच नाचविणार आहे.

[रावसाहेब प्रवेश करतो.]

राव०—अरे काय, हें काय ? किती तरी लोक जमले आहेत हे. आणखीही येतच आहेत चोहींकडून. जशी काय येथें जत्रा आहे. अरे शिपाई कोठें आहेत ? सुस्त लुच्चे. चांगला बंदोबस्त ठेवला !— पाहिजे त्याला आंत सोडलें ? हे काय तुमचे दोस्त आहेत सगळे ? नांव ठेवायचा सोहाळा आटपल्यावर सर्व स्त्रिया आतां इकडून जातील त्यांना जायला चांगलाच रस्ता मिळेल !

शिपाई—काय करावें महाराज; आह्मीही पण माणसेंच पडलों

आमच्या इतक्यांच्या हातून आमचा जीव संभाळून जें करवले तें केलें. एक मोठें सैन्य आणले तरी हीं माणसें ऐकत नाहींत.

राव०—राजानें याबद्दल जर मजवर ठपका ठेवला तर मी तुह्मां सगळ्यांना पुढें करीन, व तुमच्या हलगरजीपणाबद्दल खूप शिक्षा देववीन. तुह्मी फारच सुस्त आहांत. काम करायाचें सोडून तुह्मी पुरखा झोडीत बसलां अहांत—ऐका—वाद्यांचा गजर ऐकू येतो—आली—नांव ठेवून मंडळी परत आली—जा गर्दी मोडा, आणि मंडळीला जायाला वाट करा, नाहींतर तुह्मांला दोन दोन महिने तुरुंग पाहयाला लावीन!

शिपाई—राजकन्येसाठीं वाट करा.

माणूस—ए बंब्या, बाजूला हो, नाहींतर डोकें फोडीन.

शिपाई—अरे, ए, घोंगडीवाल्या, कठडा सोडून दूर उभा रहा; हांकून देईन नाहींतर येथून. [जातात.]

प्रवेश ३ रा समाप्त.

अंक ९ वा. प्रवेश ४ था.

राजवाडा.

[कर्णे वाजतात. नंतर शहरचे दोन मुख्य अधिकारी, शहरचा कोतवाल, त्याचा मदतगार, नानासाहेब, तात्यासाहेब, ५।६ आणखी सरदार, नानासाहेबांचें कुटुंब व तिच्या हातांत उंची वस्त्रांत गुंढाळलेलें तान्हें मूल व इतर स्त्रिया हे प्रवेश करतात. ही मंडळी रंगभूमीवर एक्या बाजूनें येऊन दुसऱ्या बाजूनें जाते. नंतर भालदार बोलतो.]

भालदार—देवा, या अत्युच्च व बलिष्ट राजकन्येवर सुखाचा वर्षाव कर, व तिला दीर्घायुषी कर!

[राजा, व त्याच्याबरोबरची मंडळी प्रवेश करतात.]

कारा०—हे उच्चपदाधिकारी सरदार व मी, राजेसाहेब व सुशील राज्ञी यांच्याकरितां देवाची प्रार्थना करतों. आईबापांला सं-

तोष देणाऱ्या या शुभलक्षणी कन्येच्या आनंदाचा व सुखाचा प्रतिक्षणीं तुमच्यावर वर्षाव होवो !

राजा—हे भल्या आचार्या, तुमचा मी फार आभारी आहें. या मुलीचें नांव काय ठेविलें.

काशिराय—मनोरमा.

राजा—उभे रहा. (राजा मुलीचे मुके घेतो) मुली, देव तुझें रक्षण करो !

काशि०—तथास्तु.

राजा—सरदारहो, तुह्मी फार उधळे आहां. तुह्मी आणलेल्या नजराण्याबद्दल मी फार आभारी आहें. या मुलीला बोलतां येऊं लागलें ह्मणजे हीही तुमचे आभार मानील.

काशि०—महाराज मला जरा बोलूंद्या—मी जें बोलणार तें केवळ दैविक स्फूर्तीनेंच बोलणार. माझें भाषण ह्मणजे स्तुतिवाद आहे असें समजूं नका, कारण या गोष्टी सर्व तशाच घडून येणार आहेत. ईश्वर या राजकन्येचें सदैव रक्षण करो ! ही जरी आतां पाळण्यांत आहे तरी या राज्यावर अपरिमित सुखाचा वर्षाव करील. हिची राज्यपद्धति इतकी उत्तम होईल कीं हिच्याशीं समकालीन असणाऱ्या सर्व राजांनीं व हिच्या मागून होणाऱ्या राजांनीं हिचा कित्ताच उचलावा. परंतु आतां जीवंत असलेल्या लोकांपैकीं फारच थोड्या लोकांस या गोष्टीचा लाभ होईल. ही मोठी सद्गुणी होईल व पुष्कळ ज्ञान संपादन करील. हिच्या अंगीं सर्व राजचिन्हें वास करतील, व ही सर्व गुणांचें अधिष्ठानच होईल. ही सत्यप्रिय होईल व हिचें अन्तःकरण शुद्ध व पवित्र विचारांनीं सदैव भरलेलें असेल. ही मोठी लोकप्रिय होईल, व हिचे शत्रू हिला भितील. हिच्यावर हिचे आप्तवर्ग नेहेमीं प्रीति करतील. हिच्या शत्रूंची अगदीं धूळधाण होईल व त्यांचीं शिरें दुःखानें अगदीं अवनत होतील. ही राज्य करीत असतां लोकांचे दिवस अगदीं स्वस्थपणांत जातील व देशांत शांतता राहील. लोकांची सद्धर्मावर निष्ठा राहील. हिचे आप्तवर्ग हिच्या वर्तनाचा कित्ता गिरवतील, व केवळ नात्यानें नव्हे तर आपल्या सद्गुणा-

नी थोरपणास चढतील. हिच्या राज्यांतील शांततेचा हिच्याबरोबर लोप होणार नाहीं, परंतु जसा तो अद्भुत पक्षी फीनिक्स मरतो व त्याच्या राखेपासून दुसरा अद्भुत पक्षी उत्पन्न होतो तद्वत्च जेव्हां अज्ञानांधकारांनीं व्याप्त अशा जगांतून ईश्वर हिला घेऊन जाईल, तेंव्हां हिच्यासारखाच सद्गुणी व सन्माननीय असा राजपुत्र हिच्या मागून गादीवर बसेल. त्याचा उदय नक्षत्राप्रमाणें होऊन त्याची कीर्तीही हिच्याच सारखी होईल व चिरकाल राहील. शांतता, सम्रृद्धि, प्रीति, सत्य, भीति वगैरे ज्या ज्या गोष्टींची हिच्या राज्यसमयीं सम्रृद्धि असेल त्या त्या सर्व गोष्टींचा लाभ त्याच्या वेळेसही लोकांस होईल, व त्या सर्व केवळ वृक्षवल्लीच्या न्यायानें त्याच्या ठायीं वास करतील. पृथ्वीच्या ज्या ज्या भागांवर सूर्याचा प्रकाश पडतो त्यां त्या सर्व ठिकाणीं त्याची कीर्ति पसरेल, व नव्या नव्या राष्ट्रांचा अभ्युदय होईल. त्या राजाचा उत्कर्ष होईल व पर्वतावर वाढलेल्या देवदाराच्या झाडाप्रमाणें याच्या सर्व शाखा भोंवतालच्या प्रदेशावर पसरतील--पण त्या सर्व गोष्टी आमच्या मुलांचीं मुलें पाहतील व ईश्वराचे आभार मानतील !

राजा--फारच आश्चर्यकारक गोष्टी तुह्मी सांगितल्या.

काशि०--ही कन्या दीर्घायुषी होईल. हिच्या हातून प्रत्येक दिवशीं कांहीं तरी महत्वाची गोष्ट घडून येईल. हिच्यासंबंधानें मला यापुढें भविष्य न समजतें तर बरें होतें. हिचें मरण—साधूंची तशीच इच्छा आहे—अविवाहित स्थितींतच होईल तरी शुद्ध अशा कमलपुष्पाप्रमाणें ती या जगांतून परलोकास जाईल, व सर्व लोक तिजबद्दल शोक करतील !

राजा—हे आचार्य, तुह्मी मला केवळ नवीनच बनवून टाकलें. ही शुभलक्षणी मुलगी मला होण्याच्या पूर्वी मला कोणताही लाभ झाला नव्हता. या तुमच्या भाकितानें मला इतका संतोष वाटतो कीं ज्या वेळीं मी परलोकीं जाईन तेव्हां माझी कन्या कशी वागते हें पाहीन व ईश्वराची स्तुति करीन. मी तुह्मा सर्वांचा आभारी आहें. कोतवालसाहेब, व सद्गृहस्थहो, तुह्मी मजवर फारच अनुग्रह केला.

तुह्मी येऊन माझा बहुमान केला यावद्दल मी तुमचा फार फार आभारी आहें. सरदारहो चला, तुह्मी सर्वजण राणीला भेटा. तिलाही तुमचे आभार मानले पाहिजेत, नाहींतर तिला वाईट वाटेल. आज सर्व लोकांस या बाळाच्या जन्मोत्सवानिमित्त सुट्टी आहे. कोणीही घरीं जाऊं नये, सर्वांनीं येथेंच राहावें. (जातात)

पांचवा अंक समाप्त.

उपसंहार.

येथें जमलेल्या सर्व मंडळीस हा खेळ पसंत पडेल असें पुष्कळ अंशांनीं होणार नाहींच, कारण कांहीं लोक केवळ मौजेकरतांच नाटकगृहांत येतात व एक दोन अंक होईपर्यंत झोंपही घेतात, व आह्माला भीति वाटते कीं, अशा लोकांचा निद्राभंग वाद्यांच्या गजरानें झाला असेल. आणि हें उघड आहे कीं ही मंडळी हा खेळ अगदीं भिकार ह्मणून म्हणतीलही. कांहीं लोक नगरवासी लोकांची निंदा झालेली पहावी व हुर्यो उडवावी व "हां, काय खुबिदार टीका" असे उद्गार काढावे म्हणून येतात; पण आमच्या खेळांत असाही कांहीं प्रकार नव्हता. आमचा खेळ बरा होता असेच आह्माला ह्मणवून घ्यायाचें असेल तर सर्व सभ्य स्त्रियांच्या शिफारशीवर अवलंबून आहे आणि आह्मी सभ्य स्त्रियांना आवडण्यासारखाच प्रयोग करून दाखविला. तर त्यांनींच जर स्मितहास्य करून हा खेळ बरा होता ह्मणून ह्मटलें तर मला वाटतें कीं सर्व चांगले लोक एका क्षणांत आमचे होतील, व सभ्य स्त्रिया वाखाणणी करीत असतांना जर सभ्य गृहस्थ पुढें सरसावणार नाहींत तर मग आमचें मोठेंच दुर्दैव समजावयाचें !

सूचना.

तिरपतीचा बालाजी अथवा **गिरीचा व्यंकोबा**-(ह० बा० अत्रे, बी. ए. यांनीं लिहिलेलें व कोल्हापुरच्या ग्रंथमालेंतून प्रसिद्ध झालेलें प्रकरण.) किं० व ट० ख० ८४.

—"भाविक लोकांस आणि निव्वळ प्रवासासाठीं जाणाऱ्या लोकांसही या पुस्तकापासून फार उपयोग होईल." विविधज्ञानविस्तार, जानेवारी, १९०४.

राजा रघुनाथराव अथवा शेक्सपीअरनें रचलेल्या **आठवा हेन्री** या इंग्रजी नाटकाचें मराठी भाषांतर. किंमत व ट० ख० १ रु०

हीं पुस्तकें पुणें येथें जगद्धितेच्छु छापखान्यांत अथवा म्यानेजर नवीन किताबखाना यांजकडे, मुंबईत मेसर्स डी. व्ही. साधले आणि कंपनी व मिसेस राधाबाई आत्माराम सगुण यांजकडे व दक्षिण हैदराबाद येथें रेसिडेन्सि बाजारांत खालीं सही करणाराकडे विकत मिळतील.

हणमंत बापूराव अत्रे, बी. ए.